भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा
२०२४ - २०२५ वर्षाचा राज्य वित्तव्यवस्थेवरील
अहवाल....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक क. भानिम २०२६ / प्र.क्र.६२ /लोलेस,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक १४ जुलै, २०२६.

परिपत्रक

संदर्भ :- शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक भानिम १२००/प्र.क्र.२०५ / लोलेस दि.१८ जानेवारी २००१.

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा २०२४ - २०२५ वर्षाचा राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवाल. महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाची एक प्रत PDF स्वरुपात या परिपत्रकासोबत आवश्यक त्या समयबद्ध कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.सदर अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयाच्या https://cag.gov.in/ag/mumbai-i/en या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

२. संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना सूचीत करण्यात येते की,भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा २०२४ - २०२५ वर्षाचा राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवालात अंतर्भुत असलेल्या त्यांच्या विभागाशी / कार्यासनांशी संबंधित मुद्यांसंदर्भात स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती, संबंधित विभागांच्या सचिवांच्या मान्यतेने तसेच प्रधान महालेखापाल कार्यालयाची संमती (Vetting) घेऊन परस्पर लोक लेखा समिती कक्ष ,विधानमंडळ सचिवालय , विधानभवन ,मुंबई यांच्याकडे पाठविण्यात याव्यात व त्याची एक प्रत या कार्यासनास अग्रेषित करावी.तदनंतर विभागातील संबंधीत कार्यासनांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या प्रती या कार्यासनास सादर कराव्यात. सदर अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती तीन महिन्यांच्या विहित मुदतीत लोक लेखा समितीस सादर करण्यात याव्यात.

३. लोक लेखा समितीच्या यापूर्वी झालेल्या साक्षींदरम्यान प्रशासकीय विभागांकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने पाठविण्याबाबत होणारा विलंब आणि त्यामध्ये असलेल्या त्रुटी यांचा लोक लेखा समितीने गांभिर्यपूर्वक विचार केलेला आहे व त्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. यास्तव या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १८ जानेवारी, २००१ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचे कोटेकोरपणे पालन करावे, तसेच खालील सूचना प्रकर्षाने ध्यानात घ्याव्यात.

I स्पष्टीकरणात्मक ज्ञापने परिपूर्ण आणि स्वयंस्पष्ट असावीत. त्यामध्ये चूकीची माहिती दिलेली नसावी. स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या २० इंग्रजी प्रती व तसेच ४० मराठी प्रती लोक लेखा समिती, विधानमंडळ सचिवालयास पाठवाव्यात. तसेच त्या पत्राची व स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची प्रत्येकी १ प्रत लोलेस कार्यासन, वित्त विभाग यांचेकडे पाठवावी

II. उपरोक्त प्रयोजनासाठी विभाग प्रमुखांकडून/नियंत्रण अधिकाऱ्यांकडून काही माहिती मागविणे आवश्यक असेल तर ती माहिती "अत्यंत तातडीने पाठवावी" अशी त्यांना सूचना करावी.

III. या मध्ये क्षेत्रीय कार्यालयांकडून दिरंगाई झाल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती संबंधित सचिवांच्या तात्काळ निदर्शनास आणावी.

IV. कोणत्याही परिस्थितीत स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोक लेखा समितीकडे पाठविण्याबाबत विलंब होता कामा नये, याची सर्व संबंधीत विभागांनी कटाक्षाने काळजी घ्यावी.

V. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून लोक लेखा समितीला स्पष्टीकरणात्मक ज्ञापने फार विलंबाने प्राप्त होतात. याबाबत लोक लेखा समितीच्या अध्यक्षांनी शासनाकडे वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे लोक लेखा समिती विषयक कामकाज गांभिर्याने व तत्परतेने हाताळण्यात यावे.

४. यासंदर्भात असेही निदर्शनास आणून देण्यात येते की, जर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या सदर अहवालातील परिच्छेदांची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापालांच्या मान्यतेने लोक लेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांच्याकडे व त्याची एक प्रत वित्त विभागाकडे विहित मुदतीत पाठविण्यास संबंधितांकडून विलंब झाला, तर संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७१४१४५९३०९५०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.07.14 15:06:07 +05'30'

(रविकुमार लिंगनवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत :- अहवालाची प्रत PDF स्वरुपात.(online)

प्रतिः- सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई -३२
सर्व सह सचिव / उप सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

प्रत :- माहितीसाठी:-
संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई.
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र मुंबई
प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ महाराष्ट्र मुंबई
उप सचिव, लोक लेखा समिती कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा 2024-25 वर्षाचा राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवाल

Report of the Comptroller and Auditor General of India on State Finances for the year 2024-25

Marathi

English

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra

2026 या वर्षाचा अहवाल क्रमांक 1
Report No. 1 of 2026

(राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवाल)
(State Finances Audit Report)

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा 2024-25 वर्षाचा राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवाल

महाराष्ट्र शासन

2026 या वर्षाचा अहवाल क्रमांक 1

(राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवाल)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

यांचा 2024-25 वर्षाचा

राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवाल

महाराष्ट्र शासन

2026 या वर्षाचा अहवाल क्रमांक 1

उपोद्घात

संविधानाच्या अनुच्छेद 151 अन्वये राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्राच्या राज्यपाल महोदयांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवालात वित्तीय वर्ष 2024-25 मधील राज्याच्या वित्तीय कामगिरीचे मूल्यांकन करण्याचा आणि वित्तीय आकडेवारीच्या लेखापरीक्षण विश्लेषणाच्या आधारे राज्य विधिमंडळाला माहिती सादर करण्याचा हेतू आहे. या अहवालात तीन प्रकरणे आहेत.

प्रकरण I - राज्याच्या वित्तीय स्थितीचा आढावा

हे प्रकरण अहवालाचा पाया आणि दृष्टीकोन यांचे वर्णन करते आणि राज्याच्या वित्तीय स्थितीचा व्यापक दृष्टीकोन सादर करते. यामध्ये प्रमुख निर्देशांक आणि राज्याची वित्तीय स्थिती, ज्यात तूट/ अधिशेष, कर्ज रूपरेषा आणि मुख्य लोक लेखा व्यवहार यांच्या सूक्ष्मवित्तीय विश्लेषणाचा समावेश आहे.

प्रकरण II - अर्थसंकल्पीय व्यवस्थापन

हे प्रकरण राज्याच्या विनियोजन लेख्यावर आधारित आहे आणि राज्य शासनाच्या विनियोग आणि वितरण प्राधान्यक्रमांचा आढावा घेऊन अर्थसंकल्पीय व्यवस्थापनाशी संबंधित घटनात्मक तरतुदींमधील विचलनाचा अहवाल देते.

प्रकरण III - वित्तीय प्रतिवेदन पद्धती

या प्रकरणात राज्य शासनाच्या विविध प्राधिकाऱ्यांनी सादर केलेल्या लेख्यांचा दर्जा आणि राज्य शासनाच्या विविध विभागांनी विहित वित्तीय नियम व विनियमांचे अनुपालन न केल्याच्या मुद्द्यांवर भाष्य केले आहे.

विविध विभागांमधील व्यवहारांचे लेखापरीक्षण आणि कामगिरीचे लेखापरीक्षण आणि वैधानिक महामंडळे, मंडळे आणि शासकीय कंपन्यांच्या लेखापरीक्षणावेळी निदर्शनास आलेली अभिक्षणे आणि महसुली जमांवरील अभिक्षणे असलेला अहवाल स्वतंत्रपणे सादर केला जातो.

राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवालाचा पाया/आधार आणि दृष्टीकोन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 (2) नुसार, एखाद्या राज्याच्या लेख्यांशी संबंधित भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा अहवाल राज्याच्या राज्यपालांना सादर करणे आवश्यक आहे, जो त्यांनी राज्याच्या विधिमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे.

प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोषागार, कार्यालये आणि विभागांनी सादर केलेली प्राथमिक आणि सहाय्यक देयके, चलने तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या आधारे राज्याचे वार्षिक वित्तीय लेखे आणि विनियोजन लेखे/तयार करतात. या लेख्यांचे प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र यांच्याद्वारे स्वतंत्रपणे लेखापरीक्षण केले जाते आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांद्वारे त्या लेख्यांना प्रमाणित केले जाते.

राज्याचे वित्तीय लेखे आणि विनियोजन लेखे हे या अहवालाची मुख्य माहिती आहे. इतर स्त्रोतांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे:

- राज्याचा अर्थसंकल्प: वित्तीय मापदंड आणि प्रक्षेपणाच्या तुलनेत वितरणाचे प्राधान्यक्रम आणि अंदाजांचे मूल्यांकन करण्यासाठी, तसेच त्याच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करण्यासाठी आणि संबंधित नियम आणि विहित कार्यपद्धतींचे पालन करणे.
- प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयांनी केलेल्या लेखापरीक्षणाचे निष्कर्ष.
- विभागीय अधिकारी आणि कोषागारे (लेखा तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली) यांच्याकडील इतर विदा.
- स्थूल राज्य उत्पन्न विदा आणि राज्याशी संबंधित इतर सांख्यिकी,
- महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005.
- वित्त आयोगाच्या शिफारशी.
- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे विविध लेखापरीक्षण अहवाल.
- भारत सरकारने नमूद केलेल्या सर्वोत्तम पद्धती आणि मार्गदर्शक तत्त्वे.

22 ऑगस्ट 2025 रोजी राज्याच्या वित्त विभागासोबत प्रवेश बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षण दृष्टीकोन स्पष्ट करण्यात आला. हा मसुदा अहवाल राज्य शासनाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आला होता. अहवालातील निष्कर्षांवर चर्चा करण्यासाठी 11 फेब्रुवारी 2026 रोजी निर्गमन बैठक आयोजित करण्यात आली होती. शासनाकडून मिळालेली उत्तरे या अहवालात योग्य ठिकाणी समाविष्ट केली आहेत.

शासकीय लेख्यांची रचना :

राज्य शासनाचे लेखे तीन भागांत तयार करण्यात येतात.

1. राज्याचा एकत्रित निधी {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 266 (1)}

या निधीमध्ये राज्य शासनाला मिळणारा सर्व महसूल, राज्य शासनाने घेतलेली सर्व कर्जे (बाजार कर्जे, रोखे, केंद्र सरकारकडून घेतलेली कर्जे, वित्तीय संस्थांकडून घेतलेली कर्जे, राष्ट्रीय अल्पबचत निधीला देण्यात आलेले विशेष रोखे इ.), भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले अर्थोपाय अग्रिमे आणि राज्य शासनाला कर्जाच्या परतफेडीसाठी प्राप्त झालेल्या सर्व रकमा यांचा समावेश होतो. अधिनियमानुसार आणि भारतीय संविधानात दिलेल्या उद्देशांसाठी आणि पद्धतीने नसल्यास या निधीतून कोणत्याही रकमेचा विनियोग करता येणार नाही. खर्चाच्या काही श्रेणी (उदा. घटनात्मक अधिकाऱ्यांचे वेतन, कर्जाची परतफेड इ.) या राज्याच्या एकत्रित निधीवर भारित असतात (भारीत खर्च) आणि विधिमंडळाच्या मतदानाच्या अधीन नसतात. इतर सर्व खर्च (दत्तमत खर्च) विधिमंडळाद्वारे मतदानाने केले जातात.


2. राज्याचा आकस्मिक निधी {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 267 (2)}

हा निधी अग्रधन स्वरूपाचा असतो, जो राज्य विधिमंडळाने कायद्याने स्थापन केलेला आणि राज्य विधिमंडळाकडून अशा खर्चास मान्यता मिळेपर्यंत अनपेक्षित खर्च भागविण्यासाठी अग्रिम देता यावा यासाठी राज्यपालांच्या ताब्यात ठेवला जातो. झालेला खर्च हा राज्याच्या एकत्रित निधीच्या संबंधित कार्यात्मक मुख्यशीर्षामधून वजा करून हा निधी परतफेड केला जातो.

3. राज्याचे लोक लेखे {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 266 (2)}

उपरोक्त दिलेल्या व्यतिरिक्त, जेथे शासन बँकर किंवा विश्वस्त म्हणून कार्य करते तेथे शासनाला किंवा त्यांच्यावतीने प्राप्त होणाऱ्या इतर सर्व सार्वजनिक रकमा या लोक लेख्यांमध्ये जमा केल्या जातात. अल्पबचत आणि भविष्य निर्वाह निधी, ठेवी


(व्याजासहित आणि व्याजविरहित), अग्रिमे, राखीव निधी (व्याजसहित आणि व्याजविरहित), वित्तप्रेषण आणि निलंबन शीर्ष (अंतिम नोंद प्रलंबित असेपर्यंत हे दोन्ही तात्पुरते शीर्ष आहेत) यांसारख्या परतफेडीचा लोक लेख्यात समावेश आहे. शासनाकडे उपलब्ध निव्वळ रोख शिल्लक देखील लोक लेख्यात समाविष्ट केली जाते. लोक लेखे विधिमंडळाच्या मतदानाच्या अधीन नसतात.




कार्यकारी सारांश

कार्यकारी सारांश

महाराष्ट्र राज्याच्या वित्त व्यवस्थेवरील हा अहवाल वित्तीय वर्ष 2024-25 साठी महाराष्ट्राच्या वित्तीय स्थितीचे स्वतंत्र निर्धारण करतो.





2024-25 या वित्तीय वर्षादरम्यान महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये मध्यम वाढ दिसून आली, देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नातील वाढ 11.38 *टक्के* (2023-24) वरून 11.73 *टक्के* (2024-25) झाली. भारताच्या स्थूल राज्य उत्पन्नामध्ये राज्याचे योगदान 13.70 *टक्के* होते.





राज्याच्या वित्तीय उत्पन्नात महसुली जमेची वाढ स्थिर दिसून आली, जी 2023-24 च्या तुलनेत 2024-25 मध्ये 11.92 *टक्क्यांनी* वाढली. करेतर संकलन आणि केंद्रीय कर हस्तांतरण यांच्या सहाय्यामुळे कर महसूल हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत राहिला, तर भारत सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाने घटता कल दर्शविला.


राज्याच्या खर्चावर महसुली खर्चात (84.36 *टक्के)* विशेषत: वचनबद्ध खर्च (वेतन, मजुरी आणि व्याज) आणि अनुदानात वाढ झाली होती, तर भांडवली खर्च जरी निखालसपणे वाढत असला तरी एकूण खर्चाच्या केवळ 14 *टक्के* होता.














2024-25 मध्ये, राज्याने महसुली तूट ₹ 29,994.76 कोटी (देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या 0.66 *टक्के),* वित्तीय तूट ₹ 1,24,208.74 कोटी (देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या 2.74 *टक्के*) आणि प्राथमिक तूट ₹ 70,753.63 कोटी (देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या 1.56 *टक्के*) नोंदवली. वित्तीय तूट राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन मर्यादेत राहिली, तरी राज्याने वर्षभरात राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन लक्ष्यापेक्षा जास्त महसुली तूट नोंदवणे सुरूच ठेवले, अंशतः लोक लेख्यांतर्गत आभासी वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये खर्च न केलेली मोठ्या प्रमाणात शिल्लक कायम राहिल्यामुळे महसुली आणि वित्तीय तूट वाढली.


ऋण शाश्वतता

2024-25










मागील वर्षीची आकडेवारी बरी होती तरी ऋण शाश्वतता निर्देशक संमिश्र चित्र सादर करतात. त्यामुळे, पुढील वर्षांत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

31 मार्च 2025 पर्यंतची वित्तीय स्थिती



उच्च प्राधान्य निर्देशक *(महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी अधिनियम, 2005 नुसार)*			
मापदंड	**वित्तीय वर्ष: 2024-25 मूल्य**	**निकष**	**शेरा**
महसुली तूट (देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी)	0.66%	≥ 0 (राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन उद्देश)	महसुली तुटीमधील सातत्य मर्यादित वित्तीय कक्षा (space) आणि चालू खर्चासाठी कर्जावरील वाढते अवलंबित्व दर्शवते.
एकूण वित्तीय तूट (देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी)	2.74%	≤ 3% (राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन मर्यादा)	राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन लक्षणीय वित्तीय क्षमता .
लोक ऋण / देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न	18.96%	<25 % (राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन उद्देश)	वित्तीय वर्ष 2023-24 पासून (18.11%); पतदारी प्रतिबंध सुधारणे

इतर प्राधान्य निर्देशक

मापदंड	वित्तीय वर्ष: 2024-25 मूल्य	निकष	शेरा
प्राथमिक शिल्लक देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी) = (एकूण जमा - व्याजविरहित खर्च)/देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न	(-) 1.56%	> 0 उत्कृष्ठ (आंतरराष्ट्रीय नाणे निधी)	नकारात्मक सूचित करते की कर्ज स्थिरता संभाव्य जोखमींचा सामना करते.
व्याज प्रदाने/महसुली जमा	11.09%	कमी असल्यास उत्तम; रिझर्व्ह बँकेकडून जोखीम >15% (अर्थ मंत्रालय)	व्याजाच्या बोजाकडे लक्ष देणे आवश्यक
ऋण सेवा/महसुली जमा (लोक ऋण मूळ रक्कम+ व्याज/महसुली जमा	34.97%	कमी असल्यास उत्तम; 25% पेक्षा जास्त असल्यास कायम लक्ष ठेवणे (जागतिक बँक)	उच्च; संभाव्य वित्तीय असुरक्षितता दर्शवते.

मापदंड	वित्तीय वर्ष: 2024-25 मूल्य	निकष	शेरा
वाढ-व्याज विभेदक (वास्तविक देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न वाढ – वास्तविक प्रभावी व्याज दर)	4.27%	> 0 ऋण गतिशीलतेस सहाय्य करते (आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि डोमार मॉडेल)	वित्तीय वर्ष 2023-24 पेक्षा कमी/लहान (6.20%) असली तरी सकारात्मक राखीव निधी/आधार
भांडवली खर्चाचा हिस्सा = भांडवली खर्च/ एकूण खर्च	13.64%	मोठा हिस्सा = उत्तम गुणवत्ता मिश्रण (भारतीय रिझर्व्ह बँक)	एकूण खर्चातील (भांडवली खर्च/एकूण खर्च) भांडवली खर्चाचा वाटा *2020*-21 मधील नऊ *टक्क्यां*वरून 2024-25 मध्ये 14 *टक्क्यांपर्यंत* वाढला, जो खर्चाच्या गुणवत्तेत हळूहळू सुधारणा दर्शवतो.
स्वत:ची -महसुली ताकद = राज्याचा स्वत:चा महसूल/ महसुली खर्च	71.75%	मोठी व्याप्ती चांगली (अर्थ मंत्रालय)	स्वत:चे महसूल सुधारित खर्चाच्या 71.75% व्यापतात; उर्वरित हस्तांतरण/अनुदानाद्वारे

महाराष्ट्राची वित्तीय स्थिती मजबूत देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नामधील वाढीमुळे स्थिर आहे. तथापि, वाढत्या महसुली तुटीमुळे भांडवली खर्चासाठी बाजारातील कर्जावर अवलंबून राहणे आवश्यक आहे. यामुळे दीर्घकालीन कर्जाच्या स्थिरतेसाठी संभाव्य धोका निर्माण होतो. ₹ 27,184 कोटीपेक्षा जास्त न फेडलेल्या दायित्वांबाबत लेखापरीक्षण निरीक्षणांमुळे वित्तीय शिल्लक आणखी वाढली, ज्यामुळे वित्तीय तूट आणि महसुली तूट आणखी वाढण्याचा धोका आहे.

परिणामी, वित्तीय मजबुतीकरणाच्या दिशेने सध्याच्या प्रवासात संभाव्य संरचनात्मक अडथळ्यांना सामोरे जावे लागू शकतो, यामुळे सावधगिरी बाळगणे आणि संसाधन व्यवस्थापनात वाटप कार्यक्षमता आवश्यक आहे.

प्रकरण I

राज्याच्या वित्तव्यवस्थेचा आढावा

प्रकरण – I: राज्याच्या वित्तव्यवस्थेचा आढावा

या प्रकरणात 2024-25 साठी महाराष्ट्राच्या वित्तीय स्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये लोकसंख्याशास्त्र, आर्थिक निर्देशक आणि राज्याची वित्तीय रचना यांचा समावेश आहे. यात महसूल आणि खर्च, कर्जाची पातळी आणि वित्तीय तूट यातील कलांचे विश्लेषण केले आहे, ज्यामध्ये सततचे असंतुलन आणि कर्जावरील अवलंबित्व अधोरेखित केले आहे. या प्रकरणात उच्च वचनबद्ध खर्च, गुंतवणुकीचा कमी परतावा इत्यादी मुद्दे अधोरेखित केले आहेत.

1.1 राज्याची रूपरेषा

महाराष्ट्र भारताच्या पश्चिम भागात वसलेला असून त्याच्या पश्चिम सीमेला अरबी समुद्र आहे. याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेला तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्ये आहेत. याला 720 किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने (3.08 लाख चौरस किलोमीटर) हे तिसरे सर्वात मोठे राज्य आहे आणि देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्येचे राज्य आहे.

2011 मधील राज्याची लोकसंख्या 11.24 कोटींवरून वाढून 2025 मध्ये 12.83 कोटी (भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 9.10 *टक्के*) झाली. राज्याची या दशकातील (2015-25) लोकसंख्येची वाढ 9.26 *टक्के* नोंदवली गेली. लोकसंख्येची घनता 2011 मधील 365 व्यक्ती प्रती चौरस किलोमीटर वरून वाढून 417 व्यक्ती प्रती चौरस किलोमीटर इतकी झाली. हा विभाग राज्याचे लोकसंख्याशास्त्र, राज्याचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न आणि राज्याचे दरडोई उत्पन्न यांचे विहंगावलोकन प्रदान करतो.

1.1.1 राज्याचे लोकसंख्याशास्त्र

राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत राज्याची लोकसंख्या **तक्ता 1.1** मध्ये सादर केली आहे.

तक्ता 1.1: राज्याची लोकसंख्याशात्रीय चित्र/रूपरेषा

	महाराष्ट्र	भारत
क्षेत्रफळ (चौरस किलोमीटर मध्ये)	307713	3287469
वनाच्छादित क्षेत्र (चौरस किलोमीटर मध्ये)	50632	698712
ग्रामीण लोकसंख्या (*टक्क्यांत*)*	54.78	68.86
शहरी लोकसंख्या (*टक्क्यांत*)*	45.22	31.14
लोकसंख्या घनता	417	430
लिंग गुणोत्तर प्रती 1,000 पुरुष (*2011 ची भारताची जनगणना*)	922	947
नवजात मृत्यू दर प्रती 1,000 जिवंत जन्म *(नमूना नोंदणी प्रणाली, 2020 सांख्यिकी अहवाल) (2023)*	14	25

	महाराष्ट्र	**भारत**
माता मृत्यू दर प्रती 1,00,000 जिवंत जन्म *(नमूना नोंदणी प्रणाली भारतातील माता मृत्यू विशेष बातमीपत्र 2021-23)*	02	05
एकूण प्रजनन दर (प्रती महिला मुले) (*राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-5, 2019-21)*	1.71	1.99
जन्माच्या वेळचे आयुर्मान*(तांत्रिक लोकसंख्या अहवाल 2020) (2019-23)*	72.8	70.3
दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या *(बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक 2023, निती आयोग)*	7.81	14.96
साक्षरता दर *(राष्ट्रीय सांख्यिकी आयोग अहवाल, 2012-18) (टक्क्यांत)*	87.3	80.9
कामगार बल सहभाग दर *(टक्क्यांत)* (2023-24)	63.9	64.3

**लोकसंख्या तांत्रिक समूह अहवालानुसार*

स्रोत: सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबाजवणी मंत्रालय, भारत सरकार आणि सावधिक कामगार सर्वेक्षण 2023-24, क्षेत्रफळ: इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट अहवाल 2023, भारताचे वन सर्वेक्षण, वनाच्छादित क्षेत्र: इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट अहवाल 2023, भारताचे वन सर्वेक्षण, लोकसंख्या घनता आणि लिंग गुणोत्तर: 2011 ची भारताची जनगणना (भारत आणि राज्यांची लोकसंख्या प्रक्षेपणे 2011-2036) आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार.

1.1.2 राज्याची अर्थव्यवस्था

राज्याचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे निर्देशक आहेत, ज्याची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे.


1.1.2.1 राज्याचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न आणि दरडोई देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न

देशांतर्गत स्थूल उत्पन्न म्हणजे देशात उत्पादित वस्तू आणि सेवांचे एकूण मूल्य, तर राज्याचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न तेच राज्य स्तरावर मोजते आणि दोन्ही आर्थिक विकास आणि एकूण प्रगती दर्शवितात. राज्याचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न आणि देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा कल **तक्ता 1.2** मध्ये दर्शविला आहे. राज्याचे दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्न आणि देशांतर्गत स्थूल उत्पन्न यांची वर्षानुवर्षे होणारी वाढ आणि स्थूल राज्य उत्पन्नामधील योगदान **आलेख 1.1** मध्ये दर्शविले आहे आणि राज्याचे दरडोई स्थूल राज्य उत्पन्न **आलेख 1.2** मध्ये चित्रित केले आहे.


तक्ता 1.2: देशांतर्गत स्थूल उत्पन्न आणि राज्याचे दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्न (चालू किमतीवर 2011-12 मालिका)

(₹ कोटीत)

वर्ष	2020-21	2021-22	2022-23 अंतिम अंदाज	2023-24 प्रथम सुधारित अंदाज	2024-25 तात्पुरते अंदाज
भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न	19854096	23597399	26890473	30122956	33068145
महाराष्ट्राचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न	2610651	3143821	3641543	4055847	4531518
भारताचे दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पन्न (₹ मध्ये)	146480	172422	194451	215935	234859
महाराष्ट्राचे दरडोई देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न (₹ मध्ये)	210603	251496	289060	319474	354224
स्रोत: सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार					



आलेख 1.1: स्थूल राज्य उत्पन्न आणि देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाची वर्ष-दर-वर्ष वाढ आणि स्थूल राज्य उत्पन्नामध्ये देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाचा हिस्सा



आलेख 1.2: भारताचे दरडोई स्थूल राज्य उत्पन्न आणि महाराष्ट्राचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न

स्रोत: सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार


राज्याचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न वाढीचे स्थूल राज्य उत्पन्न वाढीशी गुणोत्तर 13 *टक्के* ते 14 *टक्क्यांच्या* दरम्यान स्थिर राहिले आहे, जे हे दर्शविते की महाराष्ट्राचा विकास अधूनमधून चांगल्या कामगिरीसह मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय विकास पद्धतीशी सुसंगत आहे.


2020-21 मध्ये महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत नाममात्र घट झाली, त्यानंतर 2021-22 आणि 2022-23 मधील राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत तीव्र सुधारणा झाली. त्यानंतरच्या वर्षांत, वाढ राष्ट्रीय कलाशी अधिक जवळून जुळली.

गेल्या काही वर्षांत ही दरी वाढत असताना, महाराष्ट्राने राष्ट्रीय सरासरीपेक्षा राज्याचे दरडोई देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न मजबूत राखले आहे. हा कल राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत राज्याचे महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित करतो.

1.1.2.2 स्थूल राज्य मूल्यवृद्धीमध्ये क्षेत्रीय योगदान

2024-25 मध्ये विविध क्षेत्रांचे क्षेत्रीय योगदान आणि गेल्या पाच वर्षांतील राज्याच्या देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नामधील क्षेत्रीय वाढ अनुक्रमे **आलेख 1.3** आणि **आलेख 1.4** मध्ये दर्शविली आहे.





स्रोत: सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार


2021-22 मध्ये तिन्ही क्षेत्रांनी जोरदार सुधारणा अनुभवली, तृतीयक क्षेत्र महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात गतिमान घटक म्हणून उदयास आले.


वरील आलेखावरून असे दिसून येते की:


- आधीच्या वर्षांमध्ये अस्थिरतेचा अनुभव घेतल्यानंतर, 2024-25 मध्ये प्राथमिक क्षेत्राने स्पष्ट प्रगती दर्शवली, जी एकूण वर्षांतील राज्याच्या देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नामधील वाढीत सकारात्मक योगदान देते.
- दुय्यम क्षेत्रात 4.9 टक्क्यांनी वाढ झाली, जरी एकूण वेग मध्यम राहिला 2021-22 मध्ये महामारीनंतर तीव्र उसळी घेतल्यानंतर, औद्योगिक वाढ कमी परंतु स्थिर पातळीवर स्थिर झाली, जी गुंतवणुकीची सुधारित गती आणि उत्पादकता सुधारणेची आवश्यकता दर्शवते.
- सेवा क्षेत्र हे 7.8 *टक्क्यांच्या* वाढीसह मुख्य वाढीचे घटक राहिले. स्थूल राज्य मूल्यवृद्धीमध्ये त्याचा 64 *टक्के* हिस्सा लक्षात घेता, सेवा वाढीतील माफक गती देखील राज्याच्या एकूण आर्थिक विस्तारावर लक्षणीय परिणाम करते.

आलेख 1.5 वित्तीय वर्ष 2024-25 दरम्यान प्रत्येक क्षेत्राची त्याच्या प्रमुख योगदान विभागांच्या संदर्भात रचना दर्शवितो.

आलेख 1.5: क्षेत्रीय विभागणी वित्तीय वर्ष 2024-25







स्रोत: सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार

वरील आलेख हे दर्शवतो की 2024-25 दरम्यान:

- पावसाची परिवर्तनशीलता, निविष्ठा खर्च आणि बाजाराची परिस्थिती हे प्राथमिक क्षेत्राच्या वाढीचे प्रमुख निर्धारक असले तरीही प्राथमिक क्षेत्र कृषी आणि संलग्न कामांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.
- दुय्यम क्षेत्राची रचना उत्पादन हा प्रमुख चालक म्हणून अधोरेखित करते, तर औद्योगिक नियंत्रणाच्या काळात बांधकाम हे एक स्थिर उप-क्षेत्र म्हणून कार्य करते.
- तृतीयक क्षेत्र वैविध्यपूर्ण रचना दर्शविते. मालमत्ता आणि वित्तीय सेवांचे वर्चस्व शहरीकरण आणि आर्थिक विस्ताराचे उच्च प्रमाण प्रतिबिंबित करते.

1.1.3 विताचे संक्षिप्त चित्रण

तक्ता 1.3 मध्ये 2023-24 आणि 2024-25 या वर्षासाठी प्रत्यक्ष आर्थिक निकाल तसेच 2024-25 या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज आणि देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न यांचा तपशील दर्शविला आहे.

तक्ता 1.3: वित्ताचे संक्षिप्त चित्रण

(₹ कोटीत)

अनु. क्र.	घटक	2023-24 (प्रत्यक्ष)	2024-25 (अर्थसंकल्पीय अंदाज)	2024-25 (सुधारित)	2024-25 (प्रत्यक्ष)	प्रत्यक्षाची अर्थसंकल्पीय अंदाजाशी टक्केवारी	प्रत्यक्षाची स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी
1	कर महसूल	373693.12	419972.28	448630.57	426291.34	101.50	9.41
(i)	स्वत:चा कर महसूल	302343.37	343040.32	367467.23	344998.5	100.57	7.61
(ii)	केंद्रीय कर/शुल्काचा हिस्सा	71349.75	76931.96	81163.34	81292.84	105.67	1.79
2	करेतर महसूल	20857.94	26775.18	30140.33	22284.38	83.23	0.49
3	सहाय्यक अनुदान व अंशदान	36045.4	52010.66	57692.35	33330.71	64.08	0.74
4	**महसुली जमा (1+2+3)**	**430596.46**	**498758.12**	**536463.25**	**481906.43**	96.62	10.63
5	कर्जे व अग्रिमे वसुली	742.2	2475.1	2693.45	694.39	28.06	0.02
6	इतर जमा	0	0	0	0	0.00	0.00
7	कर्जे आणि इतर दायित्वे[(अ)]	90559.36	99288.46	132873.3	124208.74	125.10	2.74
8	**भांडवली जमा (5+6+7)**	**91301.56**	**101763.56**	**135566.75**	**124903.13**	122.74	2.76
9	**एकूण जमा (4+8)**	**521898.02**	**600521.68**	**672030.00**	**606809.56**	101.05	13.39
10	**महसुली खर्च**	**444350.46**	**508491.88**	**562998.52**	**511901.19**	100.67	11.30
11	व्याज प्रदाने	45651.91	56727.20	54687.38	53455.11	94.23	1.18
12	**भांडवली खर्च**	77547.56	92029.8	109031.48	94908.37	103.13	2.09
13	भांडवली खर्च	72573.40	84542.33	95022.14	82773.32	97.91	1.83
14	कर्जे आणि अग्रिमे	4974.16	7487.47	14009.34	12135.05	162.07	0.27
15	**एकूण खर्च (10+12)**	**521898.02**	**600521.68**	**672030**	**606809.56**	101.05	13.39
16	**महसुली तूट (4-10)**	**(-)13754**	**(-)9733.76**	**(-)26535.27**	**(-)29994.76**	308.15	-0.66
17	**राजकोषीय तूट {(4+5+6)-15}**	**(-)90559.36**	**(-)99288.46**	**(-)132873.3**	**(-)124208.74**	125.10	-2.74
18	**प्राथमिक तूट (17-11)**	**(-)44907.45**	**(-)42561.26**	**(-)78185.92**	**(-)70753.63**	166.24	-1.56

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

(अ) कर्जे व इतर दायित्वे: लोक ऋणांचे निव्वळ (जमा-संवितरणे) + आकस्मिक निधीचे निव्वळ + लोक लेख्याचे निव्वळ (जमा-संवितरणे) + आरंभिक व अंतिम रोख शिल्लकीचे निव्वळ.

2024-25 दरम्यान, महसुली तूट झपाट्याने वाढली आणि कर्जावरील अवलंबित्व वाढले. जरी वाढती प्राथमिक तूट ऋणाचा वाढता बोजा दर्शवीत होती तरी वित्तीय तूट राजकोषीय जबाबदाऱ्या आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन निकषात (देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन *टक्क्या*पेक्षा कमी) राहिली.

- कर महसूल अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा किंचित जास्त होता, परंतु करेतर महसूल आणि अनुदानातील लक्षणीय कमतरतेमुळे एकूण महसुली जमा अर्थसंकल्पीय पातळीपेक्षा कमी झाल्या.

- राज्य कर्जावर अवलंबून होते, याबरोबरच अर्थसंकल्पीय अंदाजाहून 25 *टक्क्यांनी* जास्त असलेली इतर दायित्वे, हे दर्शवितात की राजकोषीय समतोल मोठ्या प्रमाणात महसूल वाढीऐवजी कर्जाद्वारे टिकली होती.
- एकूण खर्च अर्थसंकल्पीय मर्यादेत राहिला, परंतु महसुली खर्चाचे वर्चस्व कायम राहिले, जे वचनबद्ध आणि कार्यचालन खर्चाचा सततचा दबाव दर्शविते.
- भांडवली खर्चाने एक रचनात्मक बदल दर्शविला, भांडवली खर्च अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा किंचित कमी होता, तर कर्ज आणि अग्रिमे वेगाने वाढली, जे मालमत्ता निर्मितीपासून आर्थिक समर्थनाकडे जाण्याचे संकेत देते.
- वाढता महसूल आणि प्राथमिक तूट यामुळे संरचनात्मक असंतुलन आणि चालू खर्चासाठी कर्जावरील अवलंबित्व वाढत असल्याने सर्व प्रमुख तूट निर्देशक खालावले.


1.1.4 निधीचे स्त्रोत आणि विनियोग


चालू वर्षात राज्याच्या निधीच्या स्रोतांच्या घटकांची मागील वर्षाच्या निधीशी तुलना **आलेख 1.6** मध्ये दिली आहे.

आलेख 1.6: 2024-25 दरम्यान निधीचे स्त्रोत आणि विनियोगाचे तपशील

(₹ कोटीत)

निधीचे स्त्रोत





स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25

परिशिष्ट 1.2 मध्ये जमा आणि संवितरणाचा तपशील तसेच चालू वर्ष व मागील वर्षातील राज्याची एकूण वित्तीय स्थिती दिली आहे.

विश्लेषणातून असे निदर्शनास आले की 2024-25 मध्ये महसुली जमा वाढल्या, ज्या प्रामुख्याने उच्च कर महसूल आणि केंद्रीय करांमध्ये राज्याचा हिस्सा यामुळे होत्या, परंतु करेतर महसूल आणि अनुदानांमधील कमकुवतपणामुळे एकूण प्लावकतेवर मर्यादा आल्या, तर सामाजिक आणि आर्थिक सेवा, विशेषत: शिक्षण, आरोग्य, कल्याण, कृषी, पाटबंधारे, ऊर्जा आणि दळणवळण यावर निरंतर खर्च केल्यामुळे महसुली खर्च झपाट्याने वाढला.

महसुली खर्च महसुली जमांपेक्षा जास्त झाल्याने, महसुली तूट मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणीयरीत्या वाढली, जी राज्याच्या वित्तपुरवठ्यातील वाढत्या संरचनात्मक असमतोलाचे द्योतक आहे. कर्ज आणि आगाऊ रकमेच्या कमी वसुलीमुळे भांडवली जमांवर मर्यादा आली. वाहतूक, पाटबंधारे आणि शहरी पायाभूत सुविधांनी मोठ्या प्रमाणात खर्च केल्याने भांडवली खर्चात वाढ झाली, परिणामी निर्माण झालेली आर्थिक दरी मोठ्या प्रमाणात उच्च अंतर्गत कर्जे आणि विस्तारित लोक लेखा व्यवहारांद्वारे भरून काढण्यात आली, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोख शिल्लक असूनही कर्ज आणि दायित्वांवरील अवलंबित्व वाढले, ज्यामुळे मध्यम-मुदतीच्या वित्तीय शाश्वततेची चिंता वाढली.

1.1.5 शासनाच्या मत्ता आणि दायित्व याचे संक्षिप्त चित्रण

शासकीय लेख्यांमध्ये शासनाची आर्थिक दायित्वे आणि केलेल्या खर्चातून निर्माण झालेली मत्ता यांचा समावेश असतो. **परिशिष्ट 1.3** मध्ये मागील वर्षाच्या संबंधित स्थितीच्या तुलनेत 31 मार्च 2025 रोजी अशा दायित्वे आणि मालमत्तेचा गोषवारा दिला आहे. यामध्ये प्रामुख्याने अंतर्गत कर्जे, केंद्र सरकारकडून कर्जे आणि अग्रिमे, लोक लेख्यांमधून जमा व राखीव निधी आणि मत्तांमध्ये प्रामुख्याने भांडवली खर्च आणि राज्य शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे आणि रोख शिल्लक यांचा समावेश आहे. वित्तीय वर्ष 2023-24 आणि 2024-25 साठी मालमत्ता आणि दायित्वांची संक्षिप्त स्थिती **तक्ता 1.4** मध्ये दिली आहे.

तक्ता 1.4: मत्ता आणि दायित्वांची संक्षिप्त स्थिती

(₹ कोटीत)

दायित्वे					मत्ता				
		2023-24	**2024-25**	***टक्के* वाढ/घट**			**2023-24**	**2024-25**	***टक्के* वाढ/घट**
एकत्रित निधी									
अ	अंतर्गत कर्ज	562854.45	653262.89	16.06	अ	स्थूल भांडवली खर्च	570106.21	652879.53	14.43
ब	केंद्र सरकारकडून कर्जे आणि अग्रिमे	47276.41*	58697.10	24.16	ब	कर्जे आणि अग्रिमे	36340.95	47781.61	31.48
आकस्मिक निधी		150	150	0					
लोक लेखे									
अ	अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इ.	30259.90	30622.93	1.2	अ	अग्रिमे	7.11	7.76	9.14
ब	ठेवी	95598.10	119199.92	24.69	ब	वित्तप्रेषण	0	0	0
क	राखीव निधी	83180.35	91715.09	10.26	क	निलंबन आणि संकीर्ण	0	0	0
ड	वित्तप्रेषणे	1249.91	4266.14	241.32	**रोख शिल्लक**		20356.31	20564.71	1.02
					नियोजित निधीमध्ये गुंतवणूक		68890.43	76623.61	11.23
इ	निलंबन आणि संकीर्ण	23804.88	18610.85	-21.82	**एकूण**		**89246.74**	**97188.32**	8.9
					महसुली लेख्यातील तूट		149206.71*	179201.42	20.1
					संकीर्ण भांडवली जमा		(-)533.72	(-)533.72	0
एकंदर एकूण		**844374.00**	**976524.92**	**15.7**	**एकंदर एकूण**		**844374.00**	**976524.92**	**15.7**

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

** केंद्र सरकारने दिलेल्या लागोपाठ कर्जाच्या परतफेडीसाठी केलेल्या ₹ 7982.17 कोटी प्रारूप सुधारणेमुळे आणि ₹ 0.01 कोटी संपूर्ण आकडेवारी पूर्णांकित केल्यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत फरक पडला आहे.*

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, 2024-25 मध्ये मत्तांत 14.62 *टक्क्यांनी* वाढ झाली, तर मागील वर्षाच्या तुलनेत दायित्व 15.7 *टक्क्यांनी* वाढले. वित्तीय वर्ष 2024-25 च्या अखेरीस राज्याची रोख शिल्लक ₹ 20,564.71 कोटी होती. राखून

ठेवलेल्या निधीच्या गुंतवणुकीसह रोख शिल्लक 8.9 *टक्क्यांनी* वाढली आणि मार्च 2025 च्या अखेरीस ती ₹ 97,188.32 कोटी होती.

सर्वसाधारण राज्यांच्या आणि अखिल भारतीय सरासरीच्या तुलनेत राज्याचे राजकोषीय प्राधान्य **परिशिष्ट 1.4** मध्ये दाखवले आहेत.

1.2 राज्याचा एकत्रित निधी

राज्य शासनाला मिळालेला सर्व महसूल, राज्य शासनाने उभारलेली सर्व कर्जे, भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेली अर्थोपाय अग्रिमे आणि कर्जाच्या परतफेडीसाठी राज्य शासनाला प्राप्त झालेल्या सर्व रकमा हा राज्याच्या एकत्रित निधीचा भाग असतो.

1.2.1 महसुली जमा

पाच वर्षांच्या कालावधीत (2020-25) देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या संदर्भात महसुली जमांचा कल आणि वाढ **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.5: महसुली जमांचा कल


(₹ कोटीत)

मापदंड	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
महसुली जमा	**269467.91**	**333311.57**	**405677.93**	**430596.46**	**481906.43**
कर महसूल	**200758.99**	**275245.19**	**337487.28**	**373693.12**	**426291.34**
स्वत:चा कर महसूल	*164254.98*	*220927.13*	*277486.31*	*302343.37*	*344998.50*
केंद्रीय कर आणि शुल्कामध्ये राज्याचा हिस्सा	*36504.01*	*54318.06*	*60000.97*	*71349.75*	*81292.84*
करेतर महसूल	**15975.46**	**19306.70**	**16776.41**	**20857.94**	**22284.38**
भारत सरकारकडून सहाय्यक अनुदाने	**52733.46**	**38759.68**	**51414.24**	**36045.40**	**33330.71**
स्वत:चा महसूल (स्वत:चा कर आणि करेतर महसूल)	180230.44	240233.83	294262.72	323201.31	367282.88
देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न (2011-12 मालिका)	2610651	3143821	3641543	4055847	4531518
वर्षानुवर्ष वाढीचा दर (*टक्क्यात*)					
महसुली जमा	(-)4.85	23.69	21.71	6.14	11.92
स्वत:चा कर महसूल	(-)13.07	34.50	25.60	8.96	14.11
देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न	(-)1.74	20.42	15.83	11.38	11.73
महसुली जमा/देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न	10.32	10.60	11.14	10.62	10.63
प्लावकता गुणोत्तर					
देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या संदर्भात राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाची प्लावकता	*	**1.690**	**1.617**	**0.787**	**1.203**


** 2020-21 दरम्यान महसुली जमा आणि देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न वाढ नकारात्मक असल्याने प्लावकता गुणोत्तराची गणना केली गेली नाही.*

स्रोत: संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार (देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्न विदासाठी)

तसेच, गेल्या 10 वर्षांतील (2015-16 ते 2024-25) महसुली जमांचा कल **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविला आहे. देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाशी महसुली जमांची *टक्के*वारी आणि महसुली जमांमध्ये विविध स्त्रोतांचे योगदान **आलेख 1.7** आणि **आलेख 1.8** मध्ये दिले आहे.



स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे



स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

राज्याच्या महसुली जमांनी सातत्याने वाढता कल दर्शविला, महसुली जमांमध्ये 2015-16 मधील ₹ 1,85,035.68 कोटी वरून 2024-25 मध्ये ₹ 4,81,906.43 कोटी पर्यंत वाढ झाली. ही वाढ गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत 160.43 *टक्के* होती, **परिशिष्ट 1.1** मध्ये दाखवल्याप्रमाणे. 2020-21 पासून महसुली जमेचे देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाशी असलेले गुणोत्तर 10-11 *टक्क्यांवर* स्थिर राहिले.


कर महसूल हा प्रमुख स्रोत कायम राहिला आहे. स्वत:च्या कर महसुलाचा मोठा हिस्सा असून केंद्रीय करांमध्ये राज्याच्या हिश्श्यात चढ-उतार दिसून आला. करेतर महसूल, तुलनेने कमी असला तरी, अलीकडे लक्षणीय वाढ दर्शवत 2024-25 मध्ये तो ₹ 22,284.38 कोटी वर पोहोचला. 2020-21 ते 2024-25 या कालावधीत भारत सरकारकडून मिळणाऱ्या सहायक अनुदानात चढउतार आणि एकूणच घसरता कल दिसून आला. 2021-22 मधील 26 *टक्क्यांच्या* तुलनेत 2022-23 मध्ये त्यात 33 *टक्क्यांनी* लक्षणीय वाढ झाली आणि त्यानंतर 2023-24 आणि 2024-25 मध्ये त्यात लक्षणीय घट झाली, त्यामुळे राज्यांचे केंद्रीय हस्तांतरणावरील अवलंबित्व कमी झाले.

देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नामधील बदलांना महसूल वाढीच्या प्रतिसादाचे मोजमाप करणारी महसूल प्लावकता आर्थिक वाढीच्या संदर्भात महसूल एकत्रीकरणाच्या कार्यक्षमतेचे संकेत देते. एकापेक्षा जास्त प्लावकता गुणोत्तर म्हणजे अर्थव्यवस्थेपेक्षा महसूल वेगाने वाढत आहे, तर एकपेक्षा कमी गुणोत्तर देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत महसुलाची मंद वाढ दर्शवते.

देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाशी राज्याच्या महसुलाची प्लावकता 2021-22 मध्ये 1.160 होती आणि पुढे सुधारून 2022-23 मध्ये ती 1.371 झाली. तथापि, 2023-24 मध्ये, हे प्रमाण झपाट्याने घसरून 0.787 वर आले, जे सतत आर्थिक वाढ असूनही कर आणि करेतर महसूल संकलनातील मंदी दर्शवते. 2024-25 मध्ये प्लावकता 1.016 पर्यंत सुधारली जे महसूल निदान माफक प्रमाणात पुन्हा एकदा अर्थव्यवस्थेशी जुळवून घेत राहिला हे दर्शविते.

ए. राज्याचे स्वत:चे स्रोत

आलेख 1.9: राज्याच्या स्वत:च्या कर महसुलाचे तपशील



(i) स्वत:चा कर महसूल

स्वत:चा कर महसूल हा राज्य शासनाद्वारे कराद्वारे संकलित केलेला महसूल आहे, जो त्याला संविधानानुसार आकारण्याचा अधिकार आहे. राज्याचा स्वत: चा कर महसूल वित्तीय वर्ष 2023-24 साठी प्रत्यक्ष आणि वित्तीय वर्ष 2024-25 साठी अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज आणि प्रत्यक्ष **तक्ता 1.6** मध्ये दिले आहेत.

तक्ता 1.6: राज्याचा कर महसूल: 2023-24 (प्रत्यक्ष) आणि 2024-25 (अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज आणि प्रत्यक्ष)

(₹ कोटीत)


कर महसूल	2023-24 (प्रत्यक्ष रकमा)	2024-25 (अर्थसंकल्पीय अंदाज)	2024-25 (सुधारित अंदाज)	2024-25 (प्रत्यक्ष रकमा)
विक्री, व्यापार इत्यादीवरील कर	53380.47	62500.00	67375.00	58935.94
राज्य वस्तू व सेवा कर	141978.59	155755.59	167905.00	163150.99
राज्य उत्पादन शुल्क	23322.35	30500.00	30500.00	25465.95
वाहनांवरील कर	12969.32	14875.00	14875.00	14714.57
मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क	50824.48	55000.00	60000.00	59149.91
जमीन महसूल	2689.76	3000.00	5000.00	3855.49
माल व प्रवासी कर	498.14	1760.00	1760.00	846.93
इतर कर	16680.26	19649.73	20052.23	18878.72
एकूण	**302343.37**	**343040.32**	**367467.23**	**344998.50**

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे आणि अर्थसंकल्प दस्तऐवज

तक्ता 1.6 दर्शवितो की 2024-25 मध्ये राज्य कर महसूल ₹ 3.45 लाख कोटी पर्यंत वाढला, जो अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा किंचित जास्त परंतु सुधारित अंदाजापेक्षा कमी होता, जो वर्षाच्या उत्तरार्धात संथ झालेली कर कामगिरी दर्शवतो. ही वाढ प्रामुख्याने राज्य वस्तू व सेवा कराद्वारे झाली, जी सर्वात जास्त योगदान देणारी राहिली आणि सुधारित अंदाजाचा जास्त हिस्सा होती, जे स्थिर उपभोग-आधारित कर एकत्रीकरण प्रतिबिंबित करते. मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क यांनीही अर्थसंकल्पीय अंदाज ओलांडत चांगली कामगिरी केली, आणि सुधारित अंदाजाशी समतोल साधला, जे मालमत्ता आणि मत्ता व्यवहारातील प्लावकता दर्शविते. याउलट, विक्री आणि व्यापार आणि राज्य उत्पादन शुल्कावरील कर यांनी सुधारित अंदाजांच्या तुलनेत कमी कामगिरी केली, जे एकतर सुधारित अंदाजाच्या टप्प्यावर जास्त अंदाज दर्शवितात किंवा विवेकपूर्ण वापरात घट करतात. वाहनांवरील कर मोठ्या प्रमाणात स्थिर आणि अंदाजपत्रकीय पातळीच्या जवळ राहिले, तर जमीन महसूल आणि वस्तू आणि प्रवाशांवरील कर, जरी निखालसपणे कमी होते तरी, अर्थसंकल्पीय अंदाज आणि सुधारित अंदाजापासून लक्षणीय विचलन दर्शविले, जे गौण कर शीर्षांमधील अस्थिरता दर्शविते.

2020-21 ते 2024-25 या कालावधीत स्वत:च्या कर महसुलाचा कल आणि त्याच्या घटकांचे विश्लेषण अनुक्रमे **आलेख 1.10** आणि **आलेख 1.11** मध्ये दर्शविले आहे.


आलेख 1.10: वित्तीय वर्ष 2020-21 ते वित्तीय वर्ष 2024-25 मधील स्वतःचा कर महसुलाचा कल





स्त्रोत: 2024-25 चे वित्तीय लेखे


आलेख 1.11: राज्य कर महसुलाचे प्रमुख घटक


(₹ कोटीत)














स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25

राज्याच्या स्वतःच्या कर महसुलात 14.11 *टक्क्यांची* वाढ नोंदवली गेली, 2023-24 दरम्यान ₹ 3,02,343.37 कोटी वरून तो 2024-25 मध्ये ₹ 3,44,998.50 कोटींवर पोहोचला. एकूणच, अलीकडच्या वर्षात वेगापेक्षा, एकत्रीकरणाचे संकेत देत कल स्वतःच्या महसुली कामगिरीत वाढ झाल्याचे दर्शवतो. खालील शीर्षांत प्रामुख्याने वाढ दिसून आली:

- 2024-25 या वर्षात राज्य वस्तू व सेवा करात मागील वर्षाच्या तुलनेत 14.91 *टक्के* वाढ नोंदवण्यात आली. ही वाढ प्रामुख्याने कर संकलनातील 12.06 *टक्के* वाढ आणि राज्य वस्तू व सेवा कर व एकात्मिक राज्य वस्तू व सेवा करामधील इनपुट टॅक्स क्रेडिटच्या परस्पर वापरामध्ये झालेल्या 21.20 *टक्के* वाढीमुळे झाली होती.
- कोकण विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या इतर जमा रकमेमध्ये 63 *टक्क्यांनी* वाढ झाल्यामुळे, प्रामुख्याने जमीन महसुलात 43.34 *टक्क्यांनी* वाढ झाली."

- 2024-25 मध्ये मुद्रांकांच्या विक्रीत 2023-24 च्या तुलनेत 17 *टक्के* वाढ झाल्यामुळे मुद्रांक आणि नोंदणी शुल्काची वसुली अधिक झाली.
- 'भारतात उत्पादित केलेल्या आणि विदेशी मद्य म्हणून वर्गीकृत केलेल्या वाइन आणि स्पिरिटवरील उत्पादन शुल्क'यातून मिळालेल्या अधिक महसुलामुळे, राज्य उत्पादन शुल्क महसुलात 9.19 *टक्क्यांनी* वाढ झाली.
- विक्री, व्यापार इत्यादींवरील करात मागील वर्षाच्या वसुलीच्या तुलनेत 10.41 *टक्क्यांनी* वाढ झाली असून, याचे मुख्य कारण मूल्यवर्धित कर संकलनातील 12.28 *टक्के* वाढ हे होते.

(ii) करेतर महसूल

राज्याच्या करेतर महसुलामध्ये राज्य शासनाला करांव्यतिरिक्त इतर स्रोतांमधून मिळणारे भाडे, शुल्क, स्वामित्व धन आणि इतर जमा यांचा समावेश होतो.

वित्तीय वर्ष 2023-24 साठी प्रत्यक्ष, अर्थसंकल्पीय अंदाज , सुधारित अंदाज आणि वित्तीय वर्ष 2024- 25 साठी राज्याच्या करेतर महसुलासाठी प्रत्यक्ष आकडेवारी **तक्ता 1.7** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.7: करेतर महसूल: 2023-24 (प्रत्यक्ष) आणि 2024-25 (अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज आणि प्रत्यक्ष)

(₹ कोटींत)

करेतर महसूल	2023-24 (प्रत्यक्ष)	2024-25 (अर्थसंकल्पीय अंदाज)	2024-25 (सुधारित अंदाज)	2024-25 (प्रत्यक्ष)
व्याज जमा	2328.73	3150.00	3150.00	2808.99
लाभांश आणि नफा	72.10	105.00	105.00	48.14
वापरकर्ता शुल्क[1]	2178.46	5454.69	5941.14	1757.47
इतर	16278.66	18065.00	20944.00	17669.78
एकूण	**20857.95**	**26774.69**	**30140.14**	**22284.38**
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्त लेखे आणि अर्थसंकल्प दस्तऐवज				


2024-25 दरम्यान करेतर महसूल ₹ 22,284.38 कोटी होता, जो अर्थसंकल्पीय आणि सुधारित अंदाजांपेक्षा कमी होता; हे दर्शवते की त्या वर्षात करेतर जमामधील अंदाजित वाढ पूर्णपणे प्रत्यक्षात आली नाही.व्याज जमांनी तुलनेने चांगली कामगिरी दर्शविली आणि करेतर महसुलाचा एक स्थिर घटक ठरला, तर लाभांश आणि नफा अपेक्षेपेक्षा कमी होता, जे राज्य गुंतवणूक आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधून मिळणाऱ्या माफक परताव्याचे प्रतिबिंब आहे. वापरकर्ता शुल्कामध्ये अर्थसंकल्पीय अंदाज आणि सुधारित अंदाज या दोन्हीच्या तुलनेत मोठी तूट दिसून आली, ज्यावरून असे सूचित होते की शुल्क आणि सेवा शुल्कामधून अपेक्षित असलेली वसुली विहित प्रमाणात होऊ

[1] शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, पाटबंधारे, परिवहन आणि पर्यटन या प्रमुख विभागांशी संबंधित 0202, 0210, 0215, 0700, 0701, 1054 आणि 1452 या प्रधान शीर्षांशी संबंधित सर्व करेतर महसूल वापरकर्ता शुल्क आहे.

शकली नाही. 'इतर' हा प्रवर्ग, ज्याचा करेतर महसुलात मोठा वाटा आहे, तो देखील सुधारित अंदाजापेक्षा कमी राहिला, जे संकीर्ण जमा मधील अस्थिरता दर्शवते. एकंदरीत, हा कल असे दर्शवतो की करेतर महसुलात चढ-उतार होत आहेत आणि सुधारित अंदाज व महसूल संकलनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे त्यात हळूहळू बळकटी आणण्यास वाव आहे.

2020-21 ते 2024-25 या कालावधीतील राज्याच्या करेतर महसुलाच्या घटकांमधील कल अनुक्रमे **आलेख 1.12** आणि **आलेख 1.13** मध्ये दर्शविले आहेत.

आलेख 1.12: करेतर महसुलातील कल




(स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25)

2020-21 मधील ₹ 15,975.46 कोटींवरून 2024-25 मधील ₹ 22,284.38 कोटींपर्यंत करेतर महसूल वाढला, ज्यावरून या कालावधीत संकलनात हळूहळू सुधारणा झाल्याचे दिसून येते. तथापि, ही वाढ असमान होती, 2022-23 मध्ये त्यात लक्षणीय घट झाली आणि त्यानंतरच्या वर्षांमध्ये त्यात सुधारणा झाली. स्थूल राज्य उत्पन्नाच्या संदर्भात पाहिल्यास, करेतर महसूल 2020-21 आणि 2021- 22 दरम्यान 0.61 *टक्क्यांवरून* 2024-25 मध्ये 0.49 *टक्क्यांपर्यंत* घसरला, यावरून असे दिसून येते की करेतर जमा राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या एकूण वाढीशी सुसंगत नाही. यावरून असे दिसून येते की, जरी नाममात्र संकलन वाढले असले तरी, राज्याच्या संसाधन आधारातील करेतर महसुलाचे सापेक्ष योगदान कालांतराने कमी झाले असून ही जमा स्थिर करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज अधोरेखित होते.

आलेख 1.13: करेतर महसुलाचे प्रमुख घटक

(₹ कोटीत)



स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

2020-21 ते 2024-25 या कालावधीत राज्याच्या एकूण महसुली जमापैकी करेतर महसुलाचा हिस्सा पाच ते सात *टक्के* होता. 2024-25 दरम्यान झालेली वाढ ही शहरी विकास अंतर्गत (₹ 1,902 कोटी) आणि अलोह खनिकर्म व धातुकाम उद्योगाअंतर्गत ₹ 145 कोटी होती. ही वाढ प्रामुख्याने अ-लोहीय खनिकर्म व धातुकर्म उद्योगांतर्गत

उद्योग विभागाकडून खनिज सवलत नियम, 1960 अंतर्गत अधिक जमा संकलन आणि महसूल व वन विभागाकडून गौण खनिज उत्खनन नियमांतर्गत वाढीव जमा यामुळे झाली.

व्याजाची जमा हा करेतर महसुलाचा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. भारतीय रिझर्व्ह बँक नियमांनुसार, अतिरिक्त रोख रक्कमेची केंद्र शासनाच्या कोषागार देयकामध्ये गुंतवणूक केल्यामुळे ही प्राप्ती प्रामुख्याने होते. 31 मार्च 2025 रोजी, रोख शिल्लक अंतर्गत ₹ 19,640.97 कोटींची गुंतवणूक करण्यात आली होती, ज्यावर ₹ 1272.90 कोटींचे व्याज मिळत होते.

ब. केंद्रीय कर व शुल्कात राज्याचा हिस्सा


केंद्रीय कर व शुल्कातील राज्यांच्या हिश्श्याच्या घटकांमधील कल **तक्ता 1.8** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.8: केंद्रीय कर व शुल्कात हिस्सा

(₹ कोटींत)

घटक	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
केंद्रीय वस्तू व सेवा कर	10894.03	16016.73	16950.64	21653.88	23742.39
एकात्मिक वस्तू व सेवा कर	0.00	0.00	0.00	0.00	0.00
निगम कर	10979.94	15127.69	20125.45	21415.89	23067.22
निगम कराव्यतिरिक्त उत्पन्नावरील कर	11252.46	16519.71	19634.49	24732.80	29417.92
सीमा शुल्क	1969.98	3910.76	2358.10	2500.38	4135.87
केंद्रीय उत्पादन शुल्क	1231.49	2057.21	739.80	946.20	795.97
सेवा कर	151.51	627.83	93.76	13.30	2.66
विक्रेय वस्तू व सेवांवरील इतर कर व शुल्क	24.60	58.13	98.73	87.30	130.81
एकूण	**36504.01**	**54318.06**	**60000.97**	**71349.75**	**81292.84**
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्त लेखे					

केंद्रीय कर आणि शुल्क यातील राज्यांच्या एकूण हिश्श्याची देशांतर्गत स्थूल राज्य उत्पादनाशी *टक्केवारी* **आलेख 1.14** मध्ये दर्शविली आहे.



(स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25)

2024-25 दरम्यान, मागील वर्षाच्या तुलनेत केंद्रीय कर हस्तांतरणात ₹ 9,943.09 कोटी (13.94 *टक्के*) वाढ झाली आहे. ही वाढ निगम कराव्यतिरिक्त 'इतर उत्पन्नावरील कर' अंतर्गत 18.94 *टक्के* आणि 'केंद्रीय वस्तू व सेवा कर' अंतर्गत 9.64 *टक्के* होती. महसूल जमामध्ये केंद्रीय कर हस्तांतरणाची *टक्केवारी* 2023-24 मधील 16.57 *टक्क्यांवरून* किंचित वाढून 2024-25 मध्ये 16.87 *टक्के* झाली आहे. हे केंद्रीय कर हस्तांतरणाची सुधारित प्लावकता आणि सापेक्ष स्थिरता दर्शवते.

सी केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदाने

केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदाने आणि त्याचे घटक यांचा कल **तक्ता 1.9** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.9: केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदाने


(₹ कोटींत)

शीर्ष	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
योजनेतर अनुदाने	310.92[ab]	1.01	0.00	0.00	0.00
राज्य योजनांतर्गत योजनांसाठी अनुदाने	0	0.00	0.00	0.00	0.00
केंद्रीय योजनांतर्गत योजनांसाठी अनुदाने	0.20	2.32	0.33	0.00	0.00
केंद्रीय पुरस्कृत योजनांतर्गत योजनांसाठी अनुदाने	(-)12	-0.48	0.00	0.00	0.00
केंद्र पुरस्कृत योजनांसाठी अनुदाने	13733.52	11782.83	16240.57	17700.18	22191.56
वित्त आयोग अनुदाने	11550.00[a]	7693.12	9968.35	8840.63	7518.18
इतर हस्तांतरणे/राज्य/विधानमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशांसाठी अनुदाने	27152.06[b]	19280.88	25204.99	9504.59	3620.97
एकूण	**52733**	**38759.68**	**51414.24**	**36045.40**	**33330.71**

अब) 2021-22 मध्ये वर्गीकरणात बदल केल्यामुळे अनुदाने 07 वित्त आयोग अनुदाने व 08 इतर हस्तांतरण यांत हस्तांतरण
अ) 2021-22 मध्ये वर्गीकरणात बदल झाल्यामुळे 07 - वित्त आयोग अनुदाने - 104- राज्य आपत्ती प्रतिसाद निधीसाठी सहाय्यक अनुदाने अंतर्गत घेतलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमध्ये सहाय्यक अनुदानापोटी योगदान (₹ 3,222.00 कोटी)
ब) 2021-22 मध्ये वर्गीकरणात बदल झाल्यामुळे 08-इतर हस्तांतरण/विधीमंडळे असलेली राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना अनुदान 106- राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीत योगदानासाठी अनुदानापोटी अर्थसहाय्य (₹ 420.12 कोटी)
स्त्रोत*:* संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

स्थूल राज्य उत्पन्नाला केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची *टक्के*वारी **आलेख 1.15** मध्ये दर्शविली आहे.

आलेख 1.15: भारत सरकारकडून मिळणाऱ्या सहाय्यक अनुदानाची देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी



(स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25)

2024-25 दरम्यान केंद्र शासनाकडून मिळणारे सहाय्यक अनुदान हे एकूण महसुली जमेच्या 6.92 *टक्के* होते. केंद्रीय पुरस्कृत योजनांतर्गत योजनांसाठी अनुदाने (₹ 22,191.56 कोटी) हे केंद्र शासनाकडून मिळालेल्या एकूण अनुदानाच्या 66.58 *टक्के* होते. 'इतर हस्तांतरणां'मध्ये केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधीतून मिळणाऱ्या अनुदानाचा समावेश होता, जे 2023-24 दरम्यान ₹ 886.63 कोटींवरून 2024-25 दरम्यान किंचित वाढून ₹ 891.52 कोटी झाले. वस्तू व सेवा कर लागू झाल्यामुळे महसुलाच्या नुकसानीची भरपाई 2023-24 दरम्यान ₹ 8,617.96 कोटीवरून लक्षणीय घट होऊन 2024-25 दरम्यान ₹ 2,504.45 कोटी झाली आहे. याव्यतिरिक्त, राज्य शासनाला 2024-25 दरम्यान राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीसाठी ₹ 225 कोटी प्राप्त झाले.

केंद्र हस्तांतरण अधिकाधिक प्रमाणात सशर्त, योजना-आधारित समर्थनाकडे वळले असून एकूण सहाय्यामध्ये केंद्रीय पुरस्कृत योजना अनुदानांचा हिस्सा वाढत आहे. वित्त आयोग आणि इतर हस्तांतरणांमधील घट राज्याची वित्तीय लवचिकता कमी करू शकते, कारण केंद्रीय पुरस्कृत योजना निधी सामान्यतः विशिष्ट उद्दिष्टे आणि अंमलबजावणीच्या अटींशी जोडलेला असतो. वाढत्या केंद्रीय पुरस्कृत योजना समर्थनानंतरही अनुदानांमध्ये झालेली एकूण घट, खर्चातील वाढीला वित्तपुरवठा करण्यासाठी राज्याच्या स्वतःच्या संसाधनांवर आणि करांच्या विकेंद्रीकरणावर अधिक अवलंबित्व असल्याचे सूचित करते.

(i) केंद्रीय पुरस्कृत योजनांसाठी अनुदान

2024-25 दरम्यान केंद्रीय पुरस्कृत योजनांसाठी ₹ 22,191.56 कोटी अनुदानापैकी ₹ 500 कोटी वरील योजनांसाठी प्रमुख तरतूद **तक्ता 1.10** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.10: ₹ 500 कोटी पेक्षा जास्त अनुदान प्राप्त करणाऱ्या प्रमुख योजना

(₹ कोटींत)

योजनेचे नाव	2024-25	2023-24	मागील वर्षाच्या तुलनेत टक्केवारीतील बदल
प्रधानमंत्री आवास योजना	4980.58	785.21	534.30
प्रजोत्पत्ती व बाल आरोग्य आणि आरोग्य प्रणाली बळकटीकरणाला राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियन लवचिक संचय	1950.60	1624.21	20.10
सक्षम अंगणवाडी आणि पोषण	1368.84	1699.43	(-)19.45
नागरी पुनरुज्जीवन अभियान - 500 शहरे	1345.69	205.14	555.99
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना	1247.17	1090.49	14.37
राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान	1164.27	973.57	19.59
समग्र शिक्षण अभियान	1126.27	1001.19	12.49
प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण	1054.08	793.72	32.80
प्रधानमंत्री ग्राम सडक योजना	854.93	1110.8	(-)23.03
राष्ट्रीय कृषी विकास योजना	719.92	255.06	182.26
राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत पायाभूत सुविधा, अन्नधान्याची राज्यस्तरीय वाहतूक, हाताळणी आणि रास्त भाव दुकानदारांचा नफा यांवरील खर्च भागवण्यासाठी राज्य/केंद्रशासित प्रदेशांना दिल्या जाणाऱ्या केंद्रीय सहाय्यासाठीच्या निकषांची सुधारणा.	844.58	703.54	20.05
पायाभूत सुविधांची देखभाल	590.94	1087.74	(-) 45.67
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे			

2024-25 दरम्यान प्रमुख केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत वितरित केलेल्या निधीमध्ये योजनांनुसार तीव्र तफावत दिसून आली, ज्यामध्ये गृहनिर्माण आणि शहरी अभियानांमध्ये भरीव वाढ झाली, तर रस्ते जोडणी, पोषण आणि पायाभूत सुविधा देखभाल योजनांमध्ये घट किंवा कपात झाली.

(ii) पंधरावा वित्त आयोग अनुदाने

पंधराव्या वित्त आयोगाअंतर्गत राज्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी, तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद निधी, राज्य आपत्ती निवारण निधी आणि आरोग्य क्षेत्रासाठी अनुदान देण्यात आले.

केंद्र शासनाकडून दिलेल्या अनुदानाचा तपशील **तक्ता 1.11** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.11: सहायक अनुदानाची शिफारस केलेली रक्कम, प्रत्यक्ष मुक्त केलेले आणि हस्तांतरण

(₹ कोटीत)

हस्तांतरण	2024-25 साठी 15^{व्या} वित्त आयोगाची शिफारस	2024-25* दरम्यान भारत सरकारकडून प्रत्यक्ष मुक्त केलेले	राज्य शासनाद्वारे मुक्त (भारत सरकारने मुक्त केलेल्या रकमेची एकूण टक्केवारी)
1	2	3	4
(i) पंचायती राज संस्थांना अनुदाने	**4776.00**	**3329.06**	**3329.06 (100)**
(अ) कामगिरी/बद्ध अनुदान	2865.60	2061.17	2061.17 (100)
(ब) अवबद्ध अनुदान	1910.40	1267.89	1267.89 (100)
(ii) नागरी स्थानिक संस्थांना अनुदान	**2461.00**	**494.72**	**494.72(100)**
(अ) दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे (वातावरणातील हवेची गुणवत्ता तसेच घन कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेसाठी)	1391.00	0.00	0.00 (100)
(ब) दशलक्षाहून कमी लोकसंख्या असलेली शहरे (पिण्याचे पाणी, पर्जन्यजल संचयन, घनकचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता यासाठी बद्ध अनुदान)	642.00	296.83	296.83 (100)
(क) दशलक्षाहून कमी उत्पन्न असलेली शहरे (स्थानिक गरजांसाठी अवबद्ध अनुदान)	428.00	197.89	197.89 (100)
स्थानिक संस्थांसाठी एकूण	**7237.00**	**3823.78**	**3823.78 (100)**
राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी (केंद्राचा हिस्सा)	3730.00	3694.00	3694.00 (100)
राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी (राज्याचा हिस्सा)	1243.00	1231.00	1231.00 (100)
आरोग्य क्षेत्रासाठी अनुदान	1467.00	1160.33	1160.33 (100)
एकंदर एकूण	**13677.00**	**9909.11**	**9909.11 (100)**
स्रोत: पंधरावा वित्त आयोग अहवाल व महाराष्ट्र शासनाने सादर केलेली माहिती, वित्तीय लेखे 2024-25			

वरील तक्त्यावरून निदर्शनास आले की, भारत सरकारने दिलेले प्रत्यक्ष अनुदान 15^{व्या} वित्त आयोगाने शिफारस केलेल्या रक्कमेपेक्षा कमी होते. नागरी स्थानिक संस्थांच्या अनुदानाच्या संदर्भात, 2024-25 दरम्यान मुक्त करण्यात आलेली ₹ 494.72 कोटी रक्कम संपूर्णपणे 2023-24 या वर्षासाठी अनुदानाच्या रोखून धरलेल्या हिश्श्याशी संबंधित आहे. यावरून असे दिसून येते की, वर्ष 2024-25 साठी नागरी स्थानिक संस्थांसाठी शिफारस केलेल्या 15^{व्या} वित्त आयोगाच्या अनुदानासाठी भारत सरकारकडून कोणताही निधी देण्यात आलेला नाही.

तसेच, दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे यासाठी शिफारस केलेल्या ₹ 1,391 कोटी रक्कमेच्या तुलनेत 2024-25 दरम्यान कोणतीही रक्कम मुक्त

करण्यात आली नाही. महाराष्ट्रात या श्रेणीअंतर्गत सहा[2] नागरी समूह अनुदानास पात्र आहेत. वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांसाठीचे अनुदान 100 *टक्के* कामगिरीवर आधारित असून, ते दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे आव्हान निधी मार्फत वितरित केले जाते. शहरनिहाय दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेली शहरे आव्हान निधीच्या वाटपापैकी एक तृतीयांश रक्कम वातावरणातील हवेच्या गुणवत्तेचे मानक साध्य करण्यासाठी राखून ठेवण्यात आली आहे, तर उर्वरित दोन तृतीयांश रक्कम पिण्याच्या पाण्याची (पावसाचे पाणी साठवणे आणि त्याचा पुनर्वापर करणे यासह) आणि घनकचरा व्यवस्थापनाची सेवा पातळीच्या मानकांवरील कामगिरीशी जोडलेली आहे.

पंचायती राज संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानांसंदर्भात, भारत सरकारने 2024-25 दरम्यान वितरित केलेल्या ₹ 1,267.89 कोटींच्या 'बद्ध अनुदाना'मध्ये, 2021-22 या वर्षासाठीच्या अनुदानाच्या रोखून ठेवलेल्या हिश्श्याच्या ₹ 159.34 कोटींचा समावेश होता.

1.2.2 भांडवली जमा

भांडवली जमांमध्ये निर्गुंतवणुकीतून मिळालेली रक्कम, कर्ज आणि अग्रिमे वसूली, अंतर्गत स्त्रोतांकडून कर्जाची प्राप्ती (बाजार कर्ज, वित्तीय संस्था/व्यावसायिक बँकांकडून घेतलेले कर्ज) आणि भारत सरकारकडून घेतलेली कर्जे आणि अग्रिमे यांचा समावेश होतो. वर्ष 2020-21 ते 2024-25 दरम्यान भांडवली जमा आणि त्यातील घटकांचा कल **तक्ता 1.12** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.12: भांडवली जमेच्या वाढीचा आणि रचनेचा कल

(₹ कोटीत)

राज्याच्या जमेचे स्त्रोत	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
भांडवली जमा	**88969.00**	**91667.06**	**88215.46**	**126562.90**	**144329.30**
कर्ज आणि अग्रिमांची वसुली	1612.35	1178.88	642.62	742.20	694.39
लोक ऋण जमा	87356.65	90488.18	87572.84	125820.67	143634.90
*अंतर्गत कर्ज**	*72360.25*	*71863.03*	*77336.95*	*115174.67*	*130848.61*
भारत सरकारकडून कर्जे आणि अग्रिमे	*14996.40*	*18625.15*	*10235.89*	*10646.00*	*12786.29*
वार्षिक वाढीचे मूल्यांकन (टक्केवारीत)					
स्थूल राज्य उत्पन्न	(-)1.74	20.42	***15.83***	11.38	11.73
भांडवली जमा (टक्केवारी)	56.06	3.03	(-)3.77	43.47	14.04
लोक ऋण जमा	57.70	3.58	-3.22	43.68	14.16
अंतर्गत कर्ज	*32.87*	*(-)0.69*	*7.62*	*48.93*	*13.61*
भारत सरकारकडून कर्ज आणि अग्रिमे	*1501.32*	*24.20*	*(-)45.04*	*4.01*	*20.10*

* अर्थोपाय अग्रिमे रक्कम वगळून


स्रोत: संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे

2 छत्रपती संभाजी नगर नागरी समूह, बृहन्मुंबई नागरी समूह, नागपूर नागरी समूह, नाशिक नागरी समूह, पुणे नागरी समूह, वसई-विरार नागरी समूह

तसेच, दहा वर्षांच्या कालावधीसाठी (2015-16 ते 2024-25) भांडवली जमांचा कल **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविला आहे. भांडवली जमा 2015-16 मधील ₹ 38,841.52 कोटी वरून 2024-25 मध्ये ₹ 1,44,329.30 कोटी पर्यंत वाढली, जी या कालावधीत 271.59 *टक्के* वाढीचा दर दर्शवते.

2020-21 ते 2024-25 दरम्यान स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार भांडवली जमा आणि ऋण जमा **आलेख 1.16** मध्ये दर्शविली आहे.

आलेख 1.16: देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार भांडवली जमा आणि ऋण जमा



स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

एकूण लोक ऋणाच्या सुमारे 91 *टक्के* वाटा असलेले अंतर्गत ऋण 2020-21 मधील ₹ 72,360.25 कोटींवरून 81 *टक्क्यांनी* वाढून 2024-25 मध्ये ₹ 1,30,848.61 कोटी झाले. हे कर्जावरील अधिक अवलंबित्व दर्शवते. ऋणाच्या जमांनी एकूण भांडवली जमेच्या हालचालींचे बारकाईने प्रतिबिंब दाखवले, आणि हे दर्शविते की कर्ज हा भांडवली वित्तपुरवठ्याचा मुख्य स्रोत राहिला.

वस्तू व सेवा कराच्या भरपाईच्या तुटीच्या बदल्यात भारत सरकारकडून लागोपाठ ₹ 25,759.36 कोटी (2020-21 मध्ये 11,977 कोटी आणि 2021-22 मध्ये 13,782.36 कोटी) कर्जाच्या प्राप्तीमुळे भारत सरकारकडून कर्ज आणि अग्रिमांमध्ये वाढ झाली आहे. राज्य शासनाला स्वतःच्या स्त्रोतांकडून याची परतफेड करायची नाही. 2024-25 मध्ये, केंद्र सरकारने ₹ 7,982.17 कोटींची परतफेड केल्यानंतर ही रक्कम ₹ 17,777.19 कोटी होती. 2024-25 मध्ये, महाराष्ट्र शासनाला ₹ 6,726.64 कोटी प्राप्त झाले, भांडवली खर्च/गुंतवणुकीसाठी भारत सरकारकडून विशेष सहाय्य[3] (50 वर्षांसाठी व्याजमुक्त कर्ज) मुक्त करण्यात आले. ही परिवर्तनशीलता त्यांचे

[3] या योजनेंतर्गत, महाराष्ट्र शासनास 2000-21 मध्ये ₹ 514 कोटी, 2021-22 मध्ये ₹ 771.73 कोटी, 2022-23 मध्ये ₹ 6,744.16 कोटी, 2023-24 मध्ये ₹ 5,376.31 कोटी व 2024-25 मध्ये ₹ 6,726.64 कोटी प्राप्त झाले.

प्रासंगिक व योजनाबद्ध स्वरूप प्रतिबिंबीत करते जी अधिक नियोजित वित्तपुरवठा करणाऱ्या अंतर्गत ऋणांप्रमाणे नसते.

स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्जात झपाट्याने वाढ ही कर्जाच्या स्थिरतेवरील वाढता ताण दर्शवते. कर्जाच्या रकमेत वाढ झाल्यामुळे व्याज देयकाच्या जबाबदाऱ्या वाढू शकतात, ज्यामुळे विकासात्मक खर्चासाठी वित्तीय कक्षा कमी होऊ शकते.

1.2.3 वित्त आयोगाची प्रक्षेपणे आणि प्रत्यक्ष

वित्तीय वर्ष 2020- 21 ते 2024-25 साठी 15व्या वित्त आयोगाचा प्रक्षेपित महसूल, तूट आणि स्थूल राज्य उत्पन्न आणि प्रत्यक्ष आकडेवारी **तक्ता 1.13** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.13: 15व्या वित्त आयोगाचे प्रक्षेपण आणि प्रत्यक्ष

	2020-21		2021-22		2022-23		2023-24		2024-25	
	प्रक्षेपण	प्रत्यक्ष	प्रक्षेपण	प्रत्यक्ष	प्रक्षेपण	प्रत्यक्ष	प्रक्षेपण	प्रत्यक्ष	प्रक्षेपण	प्रत्यक्ष
स्थूल राज्य उत्पन्न (2011-12 मालिका- चालू किंमती)	3197657	2610651	2798375	3143821	3022845	3641543	3316610	4055847	4083534	4531518
स्वत:च्या महसुली जमा	274977	269468	208230	333312	227899	405678	253989	430596	323858	481906
राज्याचा स्वत:चा कर महसूल	253587	164255	191582	220927	209782	277486	233935	302343	262455	344999
राज्याचा स्वत:चा करेतर महसूल	21391	15975	16648	19307	18117	16776	20054	20858	22323	22284
केंद्रीय कर/शुल्कात राज्याचा हिस्सा	52465	36504	41603	54318	46280	60001	52076	71350	59163	81293
स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार महसुली तूट	1.73	1.58	0.61	0.52	0.94	0.053	1.36	0.34	1.78	0.66
स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार वित्तीय तूट	4.5	2.74	4.0	2.05	3.5	1.86	3.0	2.23	3.0	2.74

स्रोत: 15व्या वित्त आयोगाचा अहवाल आणि संबंधित वर्षांचे वित्त लेखे

2020-25 मधील प्रत्यक्ष वित्तीय निष्कर्ष सातत्याने पंधराव्या वित्त आयोगाच्या प्रक्षेपणापेक्षा जास्त आहेत, स्थूल राज्य उत्पन्न वाढ आणि महसुलाची प्लावकता यामुळे राज्याला महसूल आणि वित्तीय तूट अंदाजित पातळीपेक्षा कमी राखता आली.

1.2.4 खर्च

शासकीय खर्चाचे महसुली खर्च, भांडवली खर्च आणि कर्ज व अग्रिमे असे वर्गीकरण केले जाते. महसुली खर्चामध्ये प्रशासकीय आणि आस्थापना खर्चासह विभागांच्या देखभाल, दुरुस्ती आणि दैनंदिन कामकाजाच्या खर्चाचा समावेश होतो. भांडवली खर्च प्रकल्पांच्या प्रारंभिक बांधकामाशी आणि मालमत्तेत मंजूर सुधारणा किंवा वाढीशी संबंधित आहे. कर्ज

आणि अग्रिमांमध्ये शासनाने सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि इतर संस्थांना प्रदान केलेल्या निधीचा समावेश असतो, जो कालांतराने वसूल करता येतो. खर्च, स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी आणि त्याच्या घटकांचा हिस्सा यांचा तपशील अनुक्रमे **तक्ता 1.14**, **आलेख 1.17** आणि **आलेख 1.18** मध्ये दर्शविला आहे.


तक्ता 1.14: एकूण खर्च आणि त्याची संरचना

(₹ कोटीत)

मापदंड	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
एकूण खर्च	**342638.31**	**398792.31**	**473922.42**	**521898.02**	**606809.56**
महसुली खर्च	310609.76	349685.89	407614.40	444350.46	511901.19
भांडवली खर्च	29686.70	46670.39	61643.61	72573.40	82773.32
कर्जे आणि अग्रिमे	2341.85	2436.03	4664.41	4974.16	12135.05
आकस्मिक निधीत विनियोजन	1500.00	0.00	200.00	0.00	0.00
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तिय लेखे					


एकूण खर्च 2020-21 मधील ₹ 3.43 लाख कोटींवरून सातत्याने वाढून 2024-25 मध्ये ₹ 6.07 लाख कोटी पर्यंत पोहोचला. यातून या कालावधीत शासकीय कामकाजाच्या विस्ताराचे प्रतिबिंब दिसून येते. 2020-21 मधील सुमारे 91 *टक्क्यांवरून* 2024-25 मध्ये सुमारे 84 *टक्क्यांपर्यंत* महसुली खर्चाचा सातत्यपूर्ण प्रमुख हिस्सा आहे. भांडवली खर्चात लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे, अजून ती पाच वर्षात जवळजवळ तिप्पट झाली आहे, जी विशेषत: 2021-22 पासून मालमत्ता निर्मिती खर्चाच्या हळूहळू सशक्तीकरणाकडे लक्ष वेधते. 2023-24 पर्यंत कर्ज आणि अग्रिमे हा तुलनेने अल्प घटक राहिला परंतु 2024-25 मध्ये त्यात झपाट्याने वाढ झाली, ज्यामुळे अधिक आर्थिक सहाय्याकरीता खर्च करण्याच्या संरचनेत बदल झाल्याचे निदर्शनास आले. एकंदरीत, भांडवली खर्चाचा हिस्सा कालांतराने सुधारला असला तरी, खर्चाची संरचना मोठ्या प्रमाणात महसूल-आधारित राहिली आहे, जी विकासात्मक खर्च आणि वित्तीय स्थिरता यांच्यात संतुलन राखण्याची गरज अधोरेखित करते.

आलेख 1.17: देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार एकूण खर्च



आलेख 1.18: एकूण खर्चातील घटकांचा वाटा

(टक्क्यांत)



स्त्रोत : संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

2024-25 या आर्थिक वर्षात राज्याने केलेल्या एकूण ₹ 6,06,809.56 कोटींच्या खर्चापैकी ₹ 29,709.74 कोटींचा काही भाग वित्त आयोगाकडून मिळणारे अनुदान आणि केंद्रीय पुरस्कृत योजनेतील केंद्र सरकारचा हिस्सा यांसारख्या जमांमधून केलेला आहे.

क्षेत्र-निहाय एकूण खर्च


2020-21 ते 2024-25 दरम्यान एकूण खर्चाची क्षेत्र-निहाय संरचना **तक्ता 1.15** मध्ये आणि दहा वर्षांसाठी **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविले आहे. याशिवाय, एकूण खर्चातील विविध क्षेत्रांचा तुलनात्मक हिस्सा **आलेख 1.19** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.15: एकूण खर्चाची क्षेत्र-निहाय संरचना

(₹ कोटीत)

मापदंड	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
सर्वसाधारण सेवा	105350.14	124426.53	134117.37	145454.60	159490.96
सामाजिक सेवा	127591.26	148469.10	175509.53	206967.85	249305.90
आर्थिक सेवा	89073.92	99449.15	130712.98	136753.97	161242.60
स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने	20396.38	25962.54	32874.49	31888.67	35780.02
शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे आणि अग्रिमे	226.61	484.99	708.05	832.93	990.08
स्त्रोत : संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे					

आलेख 1.19: एकूण खर्चात विविध क्षेत्रांचा हिस्सा



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

राज्याचा एकूण खर्च 2020-21 मधील ₹ 3,42,638.31 कोटींवरून वाढून 2024-25 मध्ये ₹ 6,06,809.56 कोटी झाला. खर्चाची रचना सर्वसाधारण, सामाजिक आणि आर्थिक सेवा या सर्व क्षेत्रांमधील महसुली खर्चाचे स्पष्ट प्राबल्य दर्शवते - ज्यावरून

सूचित होते की राज्याच्या खर्चाचा एक मोठा हिस्सा वेतन, निवृत्तीवेतन आणि देखभाल यासारख्या आवर्ती आणि उपभोग-संबंधित दायित्वे पूर्ण करण्यासाठी निर्देशित केला जातो. सर्वसाधारण सेवांमध्ये, महसुली खर्च हा जवळजवळ संपूर्ण खर्च असून सामाजिक आणि आर्थिक सेवांमध्ये तो अनुक्रमे सुमारे 90 *टक्के* आणि 70 *टक्के* आहे.

याउलट, मत्ता निर्मिती आणि दीर्घकालीन उत्पादक क्षमतेत योगदान देणारा भांडवली खर्च तुलनेने कमी असून वर्षानुवर्षे अस्थिरता दर्शवतो. जरी निरपेक्ष अटींमध्ये एकूण वाढ झाली असली तरी, विशेषत: आर्थिक आणि सामाजिक सेवांमध्ये, वर्षानुवर्षे चढ-उतार गुंतवणूकीच्या प्राधान्यक्रमांमध्ये विसंगती दर्शवितात. कर्ज आणि अग्रिमांवरील खर्च नगण्य असून विकासात्मक कर्जाला प्रोत्साहन देण्यासाठी या साधनाचा मर्यादित वापर दर्शवितो.

विशेषत: सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील भांडवली खर्चात अधिक शाश्वत आणि स्थिर वाढ झाल्यास खर्चाची गुणवत्ता वाढेल आणि दीर्घकालीन वाढ आणि विकास उपक्रमांना समर्थन मिळेल.

1.2.4.1 महसुली खर्च

मागील थकीत सेवा आणि दायित्वे यांचा सध्याचा स्तर राखण्यासाठी महसूल खर्च केला जातो. त्यामुळे राज्याच्या पायाभूत सुविधा आणि सेवा जाळ्यात कोणतीही भर पडत नाही. महसुली खर्चातील वाढ, एकूण खर्चाशी त्याचे गुणोत्तर, स्थूल राज्य उत्पन्न आणि महसुली जमा **तक्ता 1.16** मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 1.16: महसुली खर्च - मूळ मापदंड

(₹ कोटीत)

मापदंड	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
एकूण खर्च	342638.31	398792.31	473922.42	521898.02	606809.56
महसुली खर्च	310609.76	349685.89	407614.40	444350.46	511901.19
महसुली जमेच्या टक्केवारीत महसुली खर्च	115.27	104.91	100.48	103.19	106.22
एकूण खर्चाच्या टक्केवारीत महसुली खर्च	90.65	87.69	86.01	85.14	84.36
महसुली खर्च /स्थूल राज्य उत्पन्न (*टक्के*)	11.90	11.12	11.19	10.96	11.30
वार्षिक प्रगती (*टक्केवारीत*)					
महसुली खर्च	3.43	12.58	16.57	9.01	15.20
स्थूल राज्य उत्पन्न वाढ/प्रगती	-1.74	20.42	15.83	11.38	11.73
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे					

दहा वर्षांच्या कालावधीतील (2015-16 ते 2024-25) एकूण खर्च आणि महसूल खर्चाचा कल **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविला आहे.

एकूण खर्चाच्या हिश्शात हळूहळू घट होत असूनही, बहुतेक वर्षांमध्ये महसुली खर्च महसुली जमेपेक्षा जास्त राहिला, 2024-25 मध्ये त्याची वाढ स्थूल राज्य उत्पन्नापेक्षा अधिक असल्यामुळे महसूल शिलकीवर सातत्याने ताण असल्याचे दिसून येते.

अ. क्षेत्र-निहाय महसुली खर्च


महसुली खर्चाची क्षेत्र-निहाय संरचना **तक्ता 1.17** मध्ये दर्शविली आहे आणि महसुली खर्चातील विविध क्षेत्रांचा सापेक्ष हिस्सा **आलेख 1.20** मध्ये दर्शविला आहे. क्षेत्र-निहाय तपशीलवार खर्च **परिशिष्ट 1.2** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.17: क्षेत्र-निहाय महसुली खर्च

(₹ कोटीत)

मापदंड	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
सर्वसाधारण सेवा	103853.75	121745.32	130590.81	139874.71	154221.72
सामाजिक सेवा	122023.44	142523.26	163329.15	189224.05	226084.95
आर्थिक सेवा	64336.19	59454.77	80819.94	83363.03	95814.50
सहाय्यक अनुदाने आणि अंशदान	20396.38	25962.54	32874.49	31888.67	35780.02
स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे					

आलेख 1.20: महसुली खर्चात विविध क्षेत्रांचा हिस्सा



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

2024-25 मध्ये सामाजिक सेवा अंतर्गत महसुली खर्च वाढून ₹ 2,26,084.95 कोटी झाला, कारण सामान्य शिक्षण (₹ 83,879.64 कोटी) आणि सामाजिक सुरक्षा आणि कल्याण (₹ 45,760.13 कोटी) वर भरीव खर्च झाला. महिला कल्याणअंतर्गत 2023-24 मधील ₹261.78 कोटींवरून 2024- 25 मध्ये ₹ 33,554.36 कोटी इतकी तीव्र वाढ

दिसून आली, विशेषत: *'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'* या योजनेअंतर्गत, ज्यात भांडवल निर्मितीऐवजी लोककल्याणाभिमुख हस्तांतरणाकडे मोठा कल दिसून आला. 2023-24 च्या तुलनेत गृहनिर्माण (54.69 *टक्के)* आणि पाणीपुरवठा आणि स्वच्छता (31.81 *टक्के)* या खर्चात लक्षणीय घट झाली आहे, ज्यामुळे सामाजिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांशी संबंधित गुंतवणूकीत घट झाली आहे, ज्यामुळे सेवा वितरणाच्या शाश्वततेवर विपरित परिणाम होऊ शकतो.

आर्थिक सेवा अंतर्गत महसूल खर्च 2023-24 ते 2024-25 पर्यंत 14.94 *टक्क्यांनी* वाढून ₹ 95,814.50 कोटींवर पोहोचला. *जवाहर ग्राम समृद्धी योजना* आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी लक्ष्यित कार्यक्रमांसह केंद्रीय सहाय्य योजनांशी संबंधित वाढीसह कृषी आणि संलग्न सेवा आणि ग्रामीण विकासावरील खर्चाचा वाढता कल निदर्शनास येतो.

ऊर्जा क्षेत्रातील खर्चात 40.54 *टक्क्यांची* भरीव वाढ (₹ 18,396.57 कोटी) मुख्यत्वे कृषी पंप ग्राहकांसाठी ऊर्जा दरातील सवलतींमुळे झाली. यामुळे ग्रामीण उपजीविकेचे समर्थन होत असताना, यामुळे वारंवार देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात देखील भर पडते, ज्यामुळे पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी वित्तीय कक्षेवर संभाव्यत: ताण येतो.

ब वचनबद्ध खर्च

महसूल लेख्यावरील राज्य शासनाच्या वचनबद्ध खर्चामध्ये व्याज देयके, वेतन आणि मजुरी आणि निवृत्तीवेतनावरील खर्च यांचा समावेश आहे. शासकीय संसाधनांवर त्याचा पहिला प्रभार आहे. वचनबद्ध खर्चाचे घटक **तक्ता 1.18** मध्ये दर्शविला आहे आणि महसूल जमेची *टक्केवारी* म्हणून वचनबद्ध खर्च आणि इतर खर्चासाठी उर्वरित वित्तीय कक्षा **आलेख 1.21** मध्ये दर्शविली आहे

तक्ता 1.18: वचनबद्ध खर्चाचे घटक


(₹ कोटीत)

वचनबद्ध खर्चाचे घटक	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
वेतन आणि मजुरी*	100529.17	108791.45	125409.39	135044.82	137979.17
निवृत्ती वेतनावरील खर्च	41194.31	49112.25	54575.45	56598.13	58262.46
व्याज प्रदाने	36969.77	40158.04	41689.16	45651.91	53455.11
एकूण	**178693.25**	**198061.74**	**221674.00**	**237294.86**	**249696.74**
महसुली खर्चाची टक्केवारी म्हणून वचनबद्ध खर्च	**57.53**	**56.64**	**54.38**	**53.40**	**48.78**

** सहाय्यक अनुदानातून प्रदान केलेली वेतने समाविष्ट*

स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

आलेख 1.21: महसूल जमेची टक्केवारी आणि उर्वरित वित्तीय क्षेत्र म्हणून वचनबद्ध खर्च



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

वेतन आणि मजुरी, निवृत्तीवेतन आणि व्याज देयके यांचा समावेश असलेला वचनबद्ध खर्च राज्याच्या महसुली जमेतून बराचसा केला जातो. 2020-21 आणि 2024-25 दरम्यान, महसुली जमा ₹ 2,69,467.91 कोटींवरून ₹ 4,81,906.43 कोटी (सुमारे 79 *टक्क्यांनी* वाढ) पर्यंत वाढली, तर वचनबद्ध खर्च ₹ 1,78,693.25 कोटींवरून ₹ 2,49,696.74 कोटी (सुमारे 40 *टक्क्यांनी* वाढ) पर्यंत वाढला. महसुली जमेमध्ये वचनबद्ध खर्चाचा वाटा, जरी 2020-21 मधील 66.31 *टक्क्यांवरून* 2024-25 मध्ये 51.81 *टक्क्यांपर्यंत* किरकोळ घट दर्शवत असला तरी, लक्षणीय राहिला.

स्थूल राज्य उत्पन्न *टक्केवारीनुसार* वचनबद्ध खर्च 2020-21 मधील 6.84 *टक्क्यां*वरून 2024- 25 मध्ये 5.51 *टक्क्यांवर* घसरला. अलिकडच्या वर्षांत राज्याने वित्तीय कक्षेत काही सुधारणा दर्शविली आहे, परंतु वचनबद्ध खर्च जास्त असून वित्तीय लवचिकतेवर मर्यादा आणत आहे. दीर्घकालीन वित्तीय शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी उत्पादक आणि भांडवली खर्चाला प्राधान्य देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे.

क. अर्थसहाय्य

मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षात अनुदानात ₹ 8,035.68 कोटी (16.72 *टक्के)* वाढ झाली. ही वाढ प्रामुख्याने कृषी पंप ग्राहकांना ऊर्जा दरातील सवलतीवर ₹ 5,629.09 कोटी आणि कापूस, सोयाबीन आणि इतर तेलबिया पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेवर ₹ 2,601 कोटींची वाढ झाल्यामुळे झाली होती.

2020-21 ते 2024-25 साठी विभाग-निहाय प्रमुख अर्थसहाय्य **तक्ता 1.19** मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 1.19: वित्तीय वर्ष 2020-21 ते 2024-25 दरम्यान विभाग-निहाय अर्थसहाय्य

(₹ कोटीत)

अनु. क्र.	वचनबद्ध खर्चाचे घटक	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
1	कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय	4653.18	5419.01	6696.60	15561.84	19545.78
2	उद्योग, ऊर्जा आणि कामगार	10351.51	15143.42	18377.24	17314.45	21881.82
3	सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य	1924.21	1593.41	2299.47	2606.76	2304.34
4	अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण	2125.25	2399.96	3587.06	2956.97	2269.45
5	सहकार, विपणन आणि वस्त्रोद्योग	17333.20	1203.70	6641.38	2539.11	1421.91
6	गृह	2321.08	2130.00	3303.00	3960.00	3890.01
7	ग्राम विकास	208.08	262.60	378.58	2305.36	1626.90
8	आदिवासी विकास	1725.04	868.69	1771.26	666.30	3021.56
9	अन्य विभाग	220.03	116.41	103.78	142.70	127.42
एकूण अर्थसहाय्य		**40861.58**	**29137.20**	**43158.36**	**48053.49**	**56089.18**
स्त्रोत: 2024-25 साठीचे वित्तीय लेखे						

2024-25 मध्ये ₹ 1,000 कोटी पेक्षा जास्त प्रमुख अर्थसहाय्य योजना **तक्ता 1.19** मध्ये दर्शविल्या आहेत.

तक्ता: 1.19 (अ): 2024-25 मध्ये ₹ 1,000 कोटी पेक्षा जास्त प्रमुख अर्थसहाय्य योजना


अनु. क्र.	योजनेचे वर्णन	रक्कम (₹ कोटीत)
1	कृषी पंप ग्राहकांसाठी ऊर्जा दरात सवलत	12985.00
2	नमो शेतकरी महासन्मान निधी योजना (100 *टक्के* राज्य योजना)	5975.28
3	प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत हप्त्यावर अर्थसहाय्य	5814.56
4	प्रोत्साहन पॅकेज योजनेअंतर्गत प्रोत्साहन[4]	5600.00
5	आस्थापना- परिवहन आयुक्त (महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला झालेल्या तोट्याची भरपाई करण्यासाठी)	3820.00
6	कापूस, सोयाबीन आणि इतर तेलबिया पिकांची उत्पादकता आणि मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना	3116.87
7	अतिरिक्त दुधाचे रूपांतरण आणि निर्यातीसाठी अनुदान	1399.36
8	केंद्रीय आधारभूत किंमत योजनेंतर्गत तूट भरून काढण्यासाठी अनुदान	1380.19
9	औद्योगिक ग्राहकांना ऊर्जा दरात सवलत	1200.00
10	प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (केंद्राचा हिस्सा 60 *टक्के)*	1179.35
11	यंत्रमाग ग्राहकांसाठी ऊर्जा दरात सवलत	1100.00
स्त्रोत: 2024-25 साठीचे वित्तीय लेखे		

[4] कमी विकसित भागात उद्योगांचा प्रसार करण्यास वितरण करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी शासन प्रोत्साहन पॅकेज योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजने अंतर्गत 1964 पासून राज्यातील विकसनशील प्रदेशात नवीन/ विस्तारित घटक स्थापन करण्यासाठी प्रोत्साहनांचे पॅकेज देत आहे.

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे, 2024-25 मधील सर्वात मोठा अर्थसहाय्याचा हिस्सा घेणारा घटक म्हणजे कृषी पंप ग्राहकांना ऊर्जा दरातील सवलत, जी एकूण अनुदान वितरणाच्या 23 *टक्के* होती. नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, पीक विमा प्रीमियम आणि पॅकेज योजना या चार योजनांना दिलेल्या अर्थसहाय्यासह या चार योजनांचा हिस्सा वर्षभरातील एकूण अर्थसहाय्याच्या 54 *टक्के* आहे.

2020-21 ते 2024-25 दरम्यान महसुली जमा, महसुली खर्च, एकूण खर्च आणि स्थूल राज्य उत्पन्न यांच्या टक्केवारीनुसार अर्थसहाय्याचा कल **आलेख 1.22** मध्ये दर्शविला आहे.

आलेख 1.22: अर्थसहाय्याचे कल विश्लेषण



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

2022-23 पासून राज्याच्या जमा आणि खर्चातील अनुदानाचा मदतीचा हिस्सा वाढला, जो अर्थसहाय्य वचनबद्धतेमुळे वाढता वित्तीय ताण सूचित करतो. सामाजिक-आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यात अर्थसहाय्य महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असताना, महसुली जमा आणि एकूण खर्चाच्या प्रमाणात अर्थसहाय्याचा खर्चाचा वाढता कल वाढता वित्तीय भार दर्शवतो. या अर्थसहाय्याचा महत्त्वपूर्ण हिस्सा, विशेषत: वीज दर सवलती आणि कृषी सहाय्य योजनांशी संबंधित अर्थसहाय्ये वारंवार येतात, ज्यामुळे वित्तीय लवचिकता मर्यादित होते.

शासनाने, लक्ष्यित अर्थसहाय्याला प्राधान्य देणे, गळती कमी करणे आणि आर्थिक संसाधने सामाजिक आणि आर्थिक परिणाम असलेल्या योजनांकडे वळवली जातील याची खात्री करण्यासाठी मोठ्या अर्थसहाय्य योजनांचे मूल्यांकन करावे.

डी. स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संस्थांना राज्य शासनाकडून वित्तीय सहाय्य

2020-21 ते 2024-25 दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संस्थांना अनुदानाद्वारे प्रदान केलेले सहाय्य **तक्ता 1.20** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 1.20: स्थानिक स्वराज्य संस्था व इतर संस्थांना वित्तीय सहाय्य

(₹ कोटीत)

संस्था	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
(अ) स्थानिक स्वराज्य संस्था					
महानगरपालिका आणि नगरपालिका	30101.99	36340.72	40832.22	52755.18	50608.71
महानगरपालिका आणि नगरपालिकांना भांडवली मालमत्ता निर्माण करण्यासाठी अनुदाने	**0**	**84**	**140**	**193**	**250.32**
जिल्हा परिषद आणि इतर पंचायती राज संस्था	28724.25	29417.83	37504.47	42463.31	45757.56
पंचायती राज संस्थांसाठी भांडवली मालमत्ता निर्माण करण्यासाठी अनुदाने	**350**	**113**	**213**	**120**	**139.82**
एकूण (अ)	**58826.24**	**65758.55**	**78336.69**	**95218.49**	**96366.27**
(ब) अन्य					
शैक्षणिक संस्था (अनुदानित शाळा, अनुदानित महाविद्यालये, विद्यापीठे इ.)	35899.78	39536.97	47821.21	54108.80	53746.17
विकास प्राधिकरण	2303.49	1631.33	4511.15	3302.54	4560.92
रुग्णालये आणि इतर धर्मादाय संस्था	7345.86	9693.05	8030.81	10054.35	11226.91
इतर संस्था	29405.90	38152.96	49090.03	42184.68	77395.87
एकूण (ब)	**74955.03**	**89014.31**	**109453.2**	**109650.37**	**146659.87**
एकूण (अ+ब)	**133781.27**	**154772.86**	**187789.89**	**204868.86**	**243026.14**
भांडवली मालमत्ता निर्मितीसाठी एकूण सहाय्य अनुदाने	1686.84	1254.48	1891.15	2018.02	2851.55
महसुली खर्च	310609.76	349685.89	407614.40	444350.46	511901.19
महसुली खर्चाच्या टक्केवारीनुसार सहाय्य	43.07	44.26	46.07	46.11	47.48

स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

2020-21 ते 2024-25 दरम्यान संस्थांना दिल्या जाणाऱ्या शासकीय सहाय्यात स्थिर आणि लक्षणीय वाढ झाली आहे. एकूण सहाय्य 2020-21 मधील ₹ 1,33,781.27 कोटींवरून वाढून 2024- 25 मध्ये ₹ 2,43,026.14 कोटींवर पोहोचले. त्याचबरोबर, महसुली खर्चाच्या *टक्केवारीत* 43.07 *टक्क्यांवरून* 47.48 *टक्क्यांपर्यंत* वाढ झाली.

महसुली खर्चात संस्थात्मक सहाय्याचा वाढता हिस्सा स्थानिक संस्था आणि इतर संस्थांचे राज्याच्या सहाय्यावरील वाढते अवलंबित्व दर्शवते. भांडवली अनुदानापेक्षा महसुली सहाय्याचे प्राबल्य मालमत्ता निर्मितीवर मर्यादित भर दर्शविते, ज्यामुळे दीर्घकालीन सेवा वितरण आणि वित्तीय स्थिरतेवर संभाव्य परिणाम होतात.


वर्ष 2024- 25 मध्ये, राज्य शासनाने जकात कर रद्द केल्यामुळे नगरपरिषदांना ₹ 2,717.40 कोटी आणि वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या महसुलाच्या नुकसानीसाठी महानगरपालिकांना सहाय्य म्हणून ₹ 28,607.34 कोटी दिले.

'इतर' श्रेणी अंतर्गत अनुदानधारक संस्थांना 2020-21 ते 2024-25 दरम्यान लक्षणीय मदत मिळाली. 'इतर' श्रेणी अंतर्गत अनुदानप्राप्त संस्थांची नोंद करणे आणि राज्य शासनाच्या संबंधित अनुदान वितरण विभागांकडे तयार केलेल्या मालमत्तेचा तपशील नसणे ही चिंतेची बाब आहे, कारण यामुळे असे व्यवहार अपारदर्शक ठरतात.

1.2.4.2 भांडवली खर्च

भांडवली खर्च हा प्रामुख्याने रस्ते, इमारती इत्यादी अचल पायाभूत सुविधांच्या निर्मितीवरील खर्च आहे. केंद्र आणि राज्य या दोन्ही ठिकाणी, भांडवली खर्च हा अर्थसंकल्पीय सहाय्य आणि अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधने/ अर्थसंकल्पबाहय कर्जातून पूर्ण केला जात आहे. यात राज्य शासनाने कंपन्या/महामंडळांमध्ये केलेल्या गुंतवणुकीचाही समावेश आहे. गेल्या पाच वर्षांतील म्हणजेच 2020- 21 ते 2024-25 या कालावधीतील भांडवली खर्चाचा कल **आलेख 1.23** मध्ये दर्शविला आहे. गेल्या दहा वर्षांतील (2015-16 ते 2024-25) भांडवली खर्चाचा कल **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविला आहे.

आलेख 1.23: राज्यातील भांडवली खर्च



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

₹ 82,773.32 कोटींच्या भांडवली खर्चाव्यतिरिक्त, राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संस्थांना भांडवली मालमत्ता निर्मितीसाठी अनुदान सहाय्य म्हणून ₹ 2,851.55 कोटी हस्तांतरित केले. कर्ज जमेच्या तुलनेत भांडवली खर्चाची टक्केवारी 57.63 *टक्के* होती, ज्यावरून हे सूचित होते की कर्जाचे पायाभूत सुविधांच्या विकासात योग्य प्रमाणात रूपांतर झाले नाही.

राज्याचा भांडवली खर्च 2020-21 मधील ₹ 29,686.70 कोटींवरून वाढून 2024-25 मध्ये ₹ 82,773.32 कोटी झाला आहे. 2020-21 मध्ये 18 *टक्क्यांच्या* घसरणीनंतर, मुख्यत्वे कोविड- 19 महामारीमुळे उद्‌भवलेल्या वितीय ताणामुळे, भांडवली खर्चाने 2021-22 मध्ये 57 *टक्क्यांच्या* वाढीसह जोरदार उसळी घेतली आणि त्यानंतर मात्र मध्यम दराने वाढ सुरूच राहिली. स्थूल राज्य उत्पन्नाचा हिस्सा म्हणून, भांडवली खर्च 2020-21 मधील 1.14 *टक्क्यांवरून* 2024- 25 मध्ये 1.83 *टक्क्यांपर्यंत* वाढला. एकूण खर्चातील भांडवली खर्चाचा वाटा 2020-21 मधील *नऊ* टक्क्यांवरून 2024-25 मध्ये 14 *टक्क्यांपर्यंत* वाढला आहे, जो खर्चाच्या गुणवत्तेत हळूहळू सुधारणा दर्शवतो.

स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत निव्वळ रूपात व स्थूल राज्य उत्पन्नाच्या सापेक्ष असलेली भांडवली खर्चातील स्थिर वाढ सार्वजनिक खर्चाच्या गुणवत्तेत सुधारणा दर्शवते. तथापि, हा कल टिकवून ठेवणे, अलिकडच्या वर्षांत भांडवली जमेमध्ये कर्जामुळे झालेल्या वाढीसह निरंतर महसूल प्लावकतेत आणि विवेकी कर्ज व्यवस्थापनावर अवलंबून असेल.

ए. क्षेत्र-निहाय भांडवली खर्च

भांडवली खर्चाची क्षेत्र-निहाय रचना **तक्ता 1.21** मध्ये दिली आहे. क्षेत्र-निहाय तपशीलवार खर्च **परिशिष्ट 1.2** मध्ये दर्शविला आहे.


तक्ता 1.21: क्षेत्र-निहाय भांडवली खर्च

(₹ कोटीत)

मापदंड	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
सर्वसाधारण सेवा	1496.39	2681.21	3526.56	5579.89	5269.24
सामाजिक सेवा	3593.24	4082.09	9134.20	15243.68	16781.30
आर्थिक सेवा	24597.07	39907.09	48982.85	51749.83	60722.78
कर्ज आणि अग्रिमे*	2115.24	1951.04	3956.36	4141.23	11144.97

*शासकीय कर्मचाऱ्यांना दिलेल्या कर्जाचा समावेश नाही

स्त्रोत: संबंधित वर्षांचे वितीय लेखे



(स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

एकूण ₹ 82,773.32 कोटींच्या भांडवली खर्चापैकी, सामाजिक सेवा क्षेत्रांतर्गत ₹ 16,781.30 कोटी खर्च झाला आहे, ज्यामध्ये आदिवासी क्षेत्र उप-योजनेंतर्गत इमारतींच्या बांधकामावर खर्च केलेल्या ₹ 1,268.72 कोटींचा समावेश आहे. वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली खर्च ₹ 5,293.66 कोटी आहे, ज्यामध्ये रुग्णालयांसाठी यंत्रसामग्री आणि उपकरणे खरेदीसाठी ₹ 266.63 कोटी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांचे बळकटीकरण आणि सुधारणा यासाठी ₹ 1,022.36 कोटी खर्च करण्यात आले.

कोविड-19 महामारीमुळे आर्थिक ताण सहन करणाऱ्या राज्यांना आधार देण्यासाठी केंद्र सरकारने ऑक्टोबर 2020 मध्ये 'भांडवली खर्चासाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना' सुरू केली. राज्यांना भांडवली खर्चाला चालना देण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेची उत्पादक क्षमता वाढविण्यात मदत करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत, राज्यांना 50 वर्षांच्या परतफेड कालावधीसह व्याजमुक्त कर्ज प्रदान केले गेले. 2024-25 मध्ये, महाराष्ट्र राज्याला या योजनेंतर्गत ₹ 6,726.64 कोटी प्राप्त झाले. यापैकी ₹ 3,194.96 कोटी 'रस्ते आणि पूल प्रकल्पां'साठी वापरण्यात आले, तर ₹ 747.78 कोटी 'प्रमुख शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्याचा हिस्सा' यासाठी खर्च करण्यात आले.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, 2018 च्या कलम 144 एफ (3) च्या तरतुदींनुसार, "राज्य शासनाने, दरवर्षी या संदर्भात अधिनियमाने केलेल्या योग्य विनियोगानंतर, अधिसूचित प्रकल्प हाती घेतलेल्या महापालिकेला किंवा अभिकरणाला अधिभार आकारलेल्या आणि जमा केलेल्या अधिभाराच्या रक्कमेइतके अनुदान देणे आवश्यक आहे." नगरविकास विभागांतर्गत भांडवली खर्चामध्ये अधिसूचित प्रकल्प असलेल्या शहरांमध्ये स्थित स्थावर मालमत्तांच्या संदर्भात जमा करण्यात आलेल्या महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमांतर्गत आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कावरील अतिरिक्त एक *टक्का*


अधिभारासाठी ₹ 2,487.54 कोटी (2023-24 मध्ये ₹ 4,100 कोटी) समाविष्ट आहेत. तथापि, राज्य शासनाने या हस्तांतरणाचा अर्थ अनुदान (महसूल खर्च) ऐवजी भांडवली खर्च म्हणून केला. यामुळे 2024- 25 मध्ये भांडवली खर्चात ₹ 2,487.54 कोटींनी (2023-24 दरम्यान ₹ 4,100 कोटी) उनोक्ती झाली आहे आणि त्याच रकमेने महसुली खर्च कमी झाला.

बी. कंपन्या, महामंडळे आणि इतर संस्थांमधील गुंतवणुकीची गुणवत्ता


31 मार्च 2025 पर्यंत, राज्य शासनाची कंपन्या, महामंडळे आणि इतर संस्थांमध्ये गुंतवणूक ₹ 2,51,173.99 कोटी होती, ज्यात शासकीय कंपन्या (₹ 20,238.62 कोटी), सहकारी संस्था (₹ 4,902.76 कोटी), वैधानिक महामंडळे (₹ 2,25,778.27 कोटी), इतर संयुक्त भांडवली कंपन्या आणि भागीदारी (₹ 46 लाख), ग्रामीण बँका (₹ 253.56 कोटी) आणि दिवाळखोर ठरलेल्या कंपन्या (₹ 32 लाख) यांचा समावेश आहे.

कंपन्या, महामंडळे आणि सहकारी बँका आणि सोसायट्यांमध्ये वर्षाच्या शेवटी गुंतवणूकीचा कल आणि या गुंतवणुकीवरील परतावा **आलेख 1.25** मध्ये दर्शविला आहे. शासकीय कर्जावरील व्याजदराच्या तुलनेत केलेल्या गुंतवणुकीवरील परताव्याचा दर (लोक ऋणांवर आधारित) **आलेख 1.26** मध्ये दर्शविला आहे.

आलेख 1.25: गुंतवणूक आणि परतावा



आलेख 1.26: शासकीय कर्जावरील सरासरी व्याजदर आणि गुंतवणुकीवरील परतावा दर



स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

सी. राज्य शासनाद्वारे कर्ज आणि अग्रिमे

सहकारी संस्था, महामंडळे आणि कंपन्यांमधील गुंतवणुकीव्यतिरिक्त राज्य शासन अनेक संस्थांना/ संघटनांना कर्ज व अग्रिमे देखील प्रदान करत आहे. **तक्ता 1.22** मध्ये 31 मार्च 2025 रोजी थकीत कर्ज आणि अग्रिमांची स्थिती आणि गेल्या पाच वर्षांतील राज्य शासनाने घेतलेल्या कर्जावरील व्याज देयकांच्या तुलनेत व्याज जमा दर्शविली आहे.

तक्ता 1.22: 2020-25 दरम्यान वितरित आणि वसूल झालेल्या कर्जाचे प्रमाण

(₹ कोटीत)

कर्जाचे प्रमाण/व्याज जमा/ कर्जावरील खर्च	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
थकीत कर्जाची प्रारंभिक शिल्लक	26100.55	26830.05	28087.20	32109.00	36340.95
वर्षभरात दिलेली अग्रिमे	2341.85	2436.03	4664.41	4974.16	12135.06
वर्षभरात वसूल केलेली रक्कम	1612.35	1178.88	642.62	742.20	694.39
थकीत कर्जाची अंतिम शिल्लक	26830.05	28087.20	32109.00	36340.95	47781.62
निव्वळ वाढ	729.50	1257.15	4021.79	4231.96	11440.68
प्राप्त व्याज	315.87	202.05	180.85	167.59	155.41
शासनाने दिलेल्या कर्जे व अग्रिमांवरील व्याजदर[5]	1.19	0.74	0.60	0.49	0.37
शासकीय कर्जावरील व्याजाचा सरासरी दर *(टक्के)*	7.19	6.96	6.58	6.47	6.57
देय व्याज दर आणि जमा व्याज यातील फरक *(टक्के)*	(-)6.00	(-)6.22	(-)5.98	(-)5.98	(-)6.20
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे					

वर्ष 2023- 24 मध्ये राज्य शासनाने ₹ 4,974.16 कोटींची कर्जे दिली होती, त्यात लक्षणीय वाढ होऊन ते वर्ष 2024-25 मध्ये ₹ 12,135.06 कोटींवर पोहोचली. सहकारी संस्थांच्या कर्जातील वाढ हे या वाढीतील प्रमुख योगदान आहे, जे 2023- 24 मधील ₹ 592.32 कोटी वरून 2024- 25 मध्ये ₹ 3,699.61 कोटी पर्यंत वाढले आहे. यामध्ये सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भांडवलासाठी प्राथमिक हिस्सा (मार्जिन मनी) म्हणून देण्यात आलेल्या ₹ 3,681 कोटी कर्जाचा समावेश आहे. वर्ष 2024- 25 मध्ये महाराष्ट्र शासनाने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला ₹ 1,757 कोटी व्याजमुक्त दुय्यम कर्ज म्हणून आणि मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला ₹ 1425.59 कोटी व्याजमुक्त कर्ज दिले.

थकीत कर्जात भरीव वाढ होऊनही व्याज जमा 2020-21 मधील ₹ 315.87 कोटींवरून घटून 2024- 25 मध्ये ₹ 155.41 कोटींवर आली. शासनाने भारत सरकारच्या लेखा मानकांच्या आवश्यकतांचे उल्लंघन करून कायमस्वरुपी कर्ज म्हणून मंजूर केलेली कर्जे, ज्यासाठी अटी व शर्ती अद्याप निश्चित केल्या गेल्या नाहीत अशी कर्जे आणि कर्जाची थकबाकी असलेल्या संस्थांना दिलेली कर्जे अशा कर्जासह नवीन कर्ज आणि अग्रिमांची अनिवार्य माहिती दिली नाही.

1.3 आकस्मिक निधी

महाराष्ट्र शासनाचा आकस्मिक निधी हा राज्य विधिमंडळाद्वारे अधिकृत होईपर्यंत अनपेक्षित खर्चाची पूर्तता करण्यासाठी अग्रिमे प्रदान करण्याच्या हेतूने निर्माण करण्यात आला आहे. विधिमंडळाने अतिरिक्त खर्चास मान्यता दिल्यानंतर हा निधी वसूल केला

5 शासनाने दिलेल्या कर्जावरील आणि अग्रिमांवरील व्याजदर = जमा व्याज/{(प्रारंभिक शिल्लक + कर्ज आणि अग्रिमांची अंतिम शिल्लक)/2}*100

जातो. या निधीचे भांडवल ₹ 150 कोटीचा असतो. 2024-25 दरम्यान निधीतून कोणतीही रक्कम काढण्यात आली नव्हती. 31 मार्च 2025 पर्यंत, आकस्मिक निधीमध्ये ₹ 150 कोटी शिल्लक होते.

1.4 लोक लेखा

अल्प बचत, भविष्य निर्वाह निधी, राखीव निधी, ठेवी, निलंबने, वित्तप्रेषण इत्यादि विशिष्ट व्यवहारांच्या संदर्भातील जमा आणि संवितरणे, जे एकत्रित निधीचा भाग नसतात, ते संविधानाच्या अनुच्छेद 266 (2) अंतर्गत स्थापिलेल्या लोक लेख्यात ठेवले जातात आणि राज्य विधिमंडळाद्वारे दत्तमत-अधीन नसतात. वर्षभरातील संवितरणानंतरची उर्वरित रक्कम ही शासनाकडे विविध उद्देश्यांसाठी वापरण्याकरीता उपलब्ध असलेला निधी असतो.

1.4.1 निव्वळ लोक लेखा शिल्लक

राज्याच्या लोक लेख्यातील घटक-निहाय निव्वळ शिल्लक **तक्ता 1.23** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.23: लोक लेख्यातील घटक-निहाय निव्वळ शिल्लक

(₹ कोटीत)

क्षेत्र	उपक्षेत्र	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
अल्प बचत, भविष्य निर्वाह निधी, इत्यादि	अल्प बचत, भविष्य निर्वाह निधी	739.89	966.64	576.44	526.53	363.03
राखीव निधी	(अ) व्याजधारक राखीव निधी	657.53	156.33	712.25	2114.00	1260.67
	(ब) व्याज विरहीत राखीव निधी	4512.62	8527.48	5247.20	7671.17	7274.07
ठेवी आणि अग्रिमे	(अ) व्याजधारक ठेवी	5674.11	2105.43	1170.28	1461.75	2413.44
	(ब) व्याजविरहीत ठेवी	333.23	500.73	2553.55	8609.51	21188.39
	(क) अग्रिमे	(-)1.20	(-)2.51	(-)1.40	7.40	0.66
निलंबने आणि संकीर्ण	(अ) निलंबने	(-)329.48	112.51	(-)29.85	15.69	114.37
	(ब) अन्य लेखे	29.13	7065.46	10737.42	(-)6870.60	(-)5308.40
	(क)विदेशी सरकारकडील लेखे	0.00	(-)1.60	0.00	0.00	0.00
	(ड) संकीर्ण	0.00	1.60	(-)1.15	-1.53	0.05
वित्तप्रेषणे	(अ) धनप्रेष आणि इतर वित्तप्रेषणे	2128.66	(-)595.18	524.50	(-)390.79	3015.67
	(ब) आंतर-शासकीय समायोजन लेखे	(-)0.81	6.45	4.00	1.57	0.56
एकूण		**13743.68**	**18843.34**	**21493.24**	**13144.70**	**30322.49**

टीप: +ve डेबिट शिल्लक दर्शविते आणि -ve क्रेडिट शिल्लक दर्शविते #निम्न पूर्णांकन

स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

2024-25 मध्ये लोक लेख्यातील निव्वळ शिल्लक ₹ 17,176.68 कोटी (130.67 *टक्के)* ने लक्षणीय वाढली. ही तीव्र वाढ प्रामुख्याने वैयक्तिक ठेवी अंतर्गत शिल्लक रकमेतील लक्षणीय वाढीमुळे झाली, जी 2023-24 मधील ₹ 5,127.49 कोटी वरून 2024-25 मध्ये ₹ 21,287.54 कोटी पर्यंत वाढली. विशेष म्हणजे, यापैकी केवळ आभासी वैयक्तिक ठेवी लेख्यांतर्गत शिल्लक ₹ 20,993.06 कोटी होती, ज्यावरून हे सूचित होते की लोक लेख्यांतील शिलकीतील वाढ जवळजवळ संपूर्णपणे आभासी वैयक्तिक ठेवी लेख्यांतर्गत भर घातल्यामुळे झाली होती.

1.4.2 राखीव निधी

राज्य शासनाच्या लोक लेख्यांतर्गत विशिष्ट आणि परिभाषित कारणांसाठी राखीव निधी निर्माण केले जातात. हे निधी एकत्रित निधीकडून किंवा बाहेरील अभिकरणांकडून योगदान किंवा अनुदानातून निर्माण केले जातात. यात व्याजसहित राखीव निधी आणि व्याजरहीत राखीव निधी समाविष्ट आहेत. 31 मार्च 2025 पर्यंत यांत सात व्याजसहित राखीव निधी आणि 16 व्याजरहीत राखीव निधी समाविष्ट आहेत. या राखीव निधींमध्ये 31 मार्च 2025 रोजी शिल्लक असलेला निधी **तक्ता 1.24** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.24: मुख्य राखीव निधीचे तपशील

(₹ कोटीत)

	राखीव निधीचे नाव	प्रारंभीची शिल्लक	वर्षभरातील जमा	व्याज जमा	वर्षभरातील परतफेड	31 मार्च 2025 रोजीची शिल्लक
अ.	**व्याजसहित राखीव निधी**					
1.	रस्ते वाहतूक विभाग घसारा निधी	0.27	0	0	0	0.27
2.	रस्ते वाहतूक विभाग सुधारणा निधी	0.08	0	0	0	0.08
3.	शासकीय वाणिज्यिक विभाग/ उपक्रमांचा सामान्य आणि इतर राखीव निधी	3.59	(-)3.52	0	0	0.07
4.	सामान्य विमा निधी	894.76	491.62	0	376.02	1010.35
5	राज्य आपत्ती प्रतिसाद निधी	1095.99	3978.40	0	3996.28	1078.10
6	राज्य भरपाई वनीकरण निधी	3033.72	692.89	0	526.60	3200
7	राज्य आपत्ती निवारण निधी	2606.35	1172.20	0	172.00	3606.55
ब.	**व्याजरहीत राखीव निधी**					
1.	कर्ज निवारण निधी	67621.07	7185.59	0	0	74806.67
2.	शैक्षणिक उद्देशांसाठी विकास निधी	72.04	191.65	0	191.65	72.04
3	वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य हेतूंसाठी विकास निधी	0.09	0	0	0	0.09
4	पशुपालनासाठी विकास निधी	0,11	0	0	0	0.11
5	दूध पुरवठा विकासासाठी निधी	1.09	0	0	0	1.09

	राखीव निधीचे नाव	प्रारंभीची शिल्लक	वर्षभरातील जमा	व्याज जमा	वर्षभरातील परतफेड	31 मार्च 2025 रोजीची शिल्लक
6	रोजगार हमी निधी	5852.49	0	0	465.31	5387.18
7	ग्राहक कल्याण निधी	2.35	0	0	0	2.35
8	हमी राखीव निधी	23.36	0	0	0	23.36
9	राज्य रस्ते वाहतूक विकास निधी	0.23	0	0	0	0.23
10	विकास योजनेसाठी निधी	8.94	0.01	0	0	8.95
11	ग्राहक संरक्षण निधी	9.71	0.32	0	0.87	9.16
12	महाराष्ट्र खाण विकास निधी	242.22	0	0	0	242.22
13	शासकीय वाणिज्यक उपक्रमांचा सामान्य राखीव निधी	0.46	0	0	0	0.46
14	हमी विमोचन निधी	1669.39	554.24	0	0	2223.63
15	भरपाई वनीकरण निधीसाठी विशेष निधी	38.33	0	0	0	38.33
16	अन्नधान्य राखीव निधी	3.65	0.10	0	0	3.75

स्रोत: वित्तीय लेखे 2024-25

कर्ज निवारण निधी, हमी विमोचन निधी आणि आपत्ती निवारण निधी मधील संचय विवेकी वित्तीय व्यवस्थापन आणि जोखीम तरतूद प्रतिबिंबित करते. त्याच वेळी, अनेक अल्प राखीव निधींमधील मर्यादित हालचाली त्यांच्या निरंतर प्रासंगिकता, वापर कार्यक्षमता किंवा एकत्रीकरणाचे पुनरावलोकन करण्याची आवश्यकता दर्शवू शकतात. आकृतीबंध सूचित करतो की मोठ्या जोखीम-संबंधित राखीव निधीचे सक्रियपणे व्यवस्थापन केले जात असताना, अनेक वारसा किंवा क्षेत्र-विशिष्ट निधी मोठ्या प्रमाणात निष्क्रिय आहेत.

1.4.3 रोख शिल्लक

भारतीय रिझर्व्ह बँकेसोबत झालेल्या करारानुसार राज्य शासनाला बँकेकडे किमान ₹ 5.58 कोटींची रोख शिल्लक ठेवावी लागेल. जर शिल्लक या किमान मर्यादेपेक्षा कमी झाली तर ही तूट भारतीय रिजर्व बँकद्वारे वेळोवेळी सुधारित केलेल्या सामान्य अर्थोपाय अग्रिमे/विशेष अर्थोपाय अग्रिमे/विशेष आहरण सुविधा/अधिकर्षसारख्या साधनांद्वारे अर्थोपाय अग्रिमांच्या मर्यादेवर भरून काढली जाते.

नियोजित राखीव निधीसह अतिरिक्त रोख शिल्लक राज्य शासन भारत सरकारच्या रोखे आणि कोषागार देयकांमध्ये गुंतवते. या गुंतवणुकीतून मिळणारी जमा '0049-व्याज जमा' अंतर्गत जमा केली जाते. राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात न वापरलेली रोख रक्कम ठेवून बाजारातून कर्जे घेणे अनिष्ट आहे, कारण यामुळे उत्पादक वापराऐवजी निष्क्रिय निधी निर्माण होतो. 2023- 24 आणि 2024- 25 साठीची रोख शिल्लक आणि गुंतवणुकीचे तपशील **तक्ता 1.25** मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 1.25: रोख शिल्लक आणि त्यांची गुंतवणूक

(₹ कोटीत)

	01 एप्रिल 2024 रोजी आरंभिची शिल्लक	**31 मार्च 2025 रोजी अखेरची शिल्लक**
अ. सर्वसाधारण रोख शिल्लक		
कोषागारातील रोख रक्कम	0.04	0.04
भारताच्या रिझर्व बँकेतील ठेवी	-3154.46	423.23
संक्रमणातील वित्त प्रेषणे -- स्थानिक	65.98	65.98
एकूण	**-3088.44**	**489.25**
रोख शिल्लक गुंतवणूक लेख्यातील गुंतवणुकी	23221.7	19640.97
एकूण (अ)	**20133.26**	**20130.22**
ब. इतर रोख शिल्लक व गुंतवणूक		
विभागीय अधिकारी जसे की सार्वजनिक बांधकाम, वन अधिकारी इत्यादी यांच्याकडील रोख रक्कम	222.38	433.82
विभागीय अधिकाऱ्यांकडील आकस्मिक खर्चासाठीची स्थायी अग्रिमे	0.67	0.67
नियोजित निधीतील गुंतवणूक	68890.43	76623.61
एकूण (ब)	**69113.48**	**77058.1**
एकूण (अ + ब)	**89246.74**	**97188.32**
प्राप्त झालेले व्याज	**5785.11**	**1272.90**
स्त्रोत : 2024-25 चे वित्तीय लेखे		

गेल्या पाच वर्षांतील रोख शिल्लक गुंतवणूक लेख्याचा तपशील **तक्ता 1.26** मध्ये दर्शविला आहे.

***तक्ता* 1.26: रोख शिल्लक गुंतवणूक लेखा (प्रधान शीर्ष -8673)**

(₹ कोटीत)

वर्ष	**प्रारंभीची शिल्लक**	**अंतिम शिल्लक**	**वाढ (+) / घट (-)**	**प्राप्त व्याज**
2020-21	14743.48	29293.49	14550.01	977.12
2021-22	29293.49	22109.76	(-)7183.73	1191.16
2022-23	22109.76	32785.36	10675.60	1498.98
2023-24	32785.36	23221.71	(-)9563.65	902.28
2024-25	23221.71	19640.97	(-)3580.74	1272.90
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे				


राज्य शासनाच्या रोख शिल्लकीच्या गुंतवणुकीच्या कलाच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास आले की गेल्या पाच वर्षांत म्हणजेच 2020-21 ते 2024-25 दरम्यान गुंतवणुकीत आंतर-वार्षिक तफावत दिसून आली आहे. चालू वर्षात म्हणजेच 2024-25 मध्ये, रोख शिल्लक गुंतवणूक लेख्यातील गुंतवणुकीतून राज्याला मिळालेले व्याज ₹ 1,272.90 कोटी होते.

एकूण रोख शिल्लकांमधील वाढ मुख्यत्वे वापरण्यायोग्य रोख रकमेच्या वाढीऐवजी राखून ठेवलेल्या गुंतवणुकीत राखून ठेवलेल्या निधीमुळे झाली. सर्वसामान्य रोख शिल्लक स्थिर करणे आणि भारताच्या रिजर्व बँकेच्या ऋण शिलकांचे निर्मूलन सुधारित तरलता व्यवस्थापन दर्शविते. तथापि, निर्धारित गुंतवणुकींमध्ये निधीचा सतत संचय, तसेच व्याज उत्पन्नात घसरण यामुळे रोख आणि गुंतवणूक व्यवस्थापनाची कार्यक्षमता आणि उत्पन्नाचा आढावा घेण्याची गरज आहे.

1.5 वित्तीय शाश्वतता


वित्तीय शाश्वतता ही शासनाची महसूल आणि खर्चाचे अशा प्रकारे व्यवस्थापन करण्याची क्षमता आहे जी हे सुनिश्चित करते की ते सार्वजनिक सेवा, पायाभूत सुविधा आणि कर्जाची परतफेड यासारख्या सध्याच्या आणि भविष्यातील जबाबदाऱ्या जास्त कर्ज न घेता किंवा अशाश्वत कर्ज जमा न करता. पूर्ण करू शकतात आणि याचा अर्थ दीर्घ मुदतीसाठी महसूल निर्मिती आणि खर्च यांच्यात स्थिर संतुलन राखणे होय. **आलेख 1.27** आणि **आलेख 1.28** अनुक्रमे वित्तीय वर्ष 2020-25 दरम्यान राज्याच्या स्थूल उत्पन्नाची टक्केवारी आणि खर्च दर्शवितो.

आलेख 1.27: राज्याची जमा



स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

आलेख 1.28 राज्याचा खर्च




स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

राज्याचे स्वतःच्या महसूल स्त्रोतांवरील अवलंबित्व वाढले, तर केंद्रीय हस्तांतरणात केवळ माफक वाढ दिसून आली. किरकोळ वार्षिक चढ-उतार असूनही, कर्ज वगळता एकूण जमा स्थूलमानाने स्थूल राज्य उत्पन्नाच्या 9.5-11.5 *टक्क्यांच्या* आसपास स्थिर राहिली. स्थूल राज्य उत्पन्नाची *टक्केवारी* म्हणून राज्याच्या जमा आणि खर्चाचे विश्लेषण असे दर्शविते की 2020-21 ते 2024- 25 दरम्यान एकूण खर्च सातत्याने महसूल जमेपेक्षा (कर्ज वगळता) जास्त आहे, जे वित्तीय तफावतीसाठी कर्जावर अवलंबून असल्याचे दर्शवते.

1.5.1 लोक दायित्वे व्यवस्थापन

वर्ष 2020-21 ते 2024-25 या वर्षासाठी राज्याची थकीत जबाबदारी आणि त्याची स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी **आलेख 1.29** मध्ये दर्शविली आहे.



स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

राज्याचे थकीत दायित्व 2020-21 मधील ₹ 5,36,199.46 कोटींवरून वाढून 2024-25 अखेर ₹ 8,59,097.13 कोटी झाले. 2024-25 मध्ये थकीत कर्ज आणि स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तर 18.96 *टक्के* म्हणजेच राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमाने (25 *टक्के*) निर्धारित केलेल्या मर्यादेत होते. दहा वर्षांच्या कालावधीत (2015-16 ते 2024-25) थकीत दायित्वांचा कल आणि त्याचे स्थूल राज्य उत्पन्नाशी गुणोत्तर **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविले आहे.

1.5.1.1 दायित्वे रूपरेषा: घटक

राज्य शासनाच्या एकूण दायित्वांमध्ये सामान्यत: राज्याचे अंतर्गत कर्ज (बाजार कर्ज, रिजर्व बँकेकडून अर्थोपाय अग्रिमे, राष्ट्रीय अल्प बचत निधीला जारी केलेले विशेष कर्ज रोखे आणि वित्तीय संस्थांकडून कर्ज इ.), केंद्र सरकारकडून कर्ज व अग्रिमे आणि लोक लेखे दायित्वे यांचा समावेश असतो. 2020- 21 पासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी राज्याचे घटक-निहाय दायित्व कल **तक्ता 1.27** मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 1.27: घटक-निहाय लोक दायित्वाचा कल

(₹ कोटीत)

वित्तीय दायित्वाचे घटक	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
एकूण थकीत दायित्वे (अ+ब)	**536199.46**	**580535.90**	**634994.37**	**732501.59**	**859097.13**
लोक ऋण (अ)	416504.78	457275.94	507182.99	592353.68	694182.81
अंतर्गत ऋण	*408036.24*	*445079.61*	*485782.24*	*562854.45*	*653262.89*
*भारत सरकारकडून मिळालेली कर्जे**	*8468.54*	*12196.33*	*21400.75*	*29499.23*	*40919.92*
लोक लेखा दायित्वे (ब)	**119694.68**	**123259.96**	**127811.38**	**140147.91**	**164914.32**
(i)अल्प बचत, भविष्य निर्वाह निधी	*28190.29*	*29156.93*	*29733.37*	*30259.90*	*30622.93*
(ii)व्याज धारक राखीव निधी	*4642.62*	*4798.95*	*5511.20*	*7624.75*	*8885.42*
(iii) व्याजरहित राखीव निधी	*7665.02*	*7501.17*	*7040.07*	*6665.25*	*6206.14*
(iv)व्याजधारक ठेवी	*57753.45*	*59858.88*	*61029.16*	*62490.91*	*64904.35*
(v)व्याजरहित ठेवी	*21443.30*	*21944.03*	*24497.58*	*33107.10*	*54295.48*
थकीत दायित्वाच्या वाढीचा दर (*टक्के*)	14.23	8.27	9.38	15.36	17.28
स्थूल राज्य उत्पन्न	**2610651**	**3143821**	**3641543**	**4055847**	**4531518**
एकूण थकीत दायित्व/स्थूल राज्य उत्पन्न (*टक्के*)	20.54	18.47	17.44	18.06	18.96
कर्ज आणि इतर दायित्वे					
एकूण जमा	171674.22	156649.53	162828.08	212042.17	295140.27
एकूण परतफेड	103396.91	98530.72	108369.61	114534.96	168544.73
उपलब्ध निव्वळ निधी	68277.31	58118.81	54458.47	97507.21	126595.54
परतफेड / जमा (टक्के)	60.23	62.90	66.55	54.02	57.11

*वस्तु व सेवा कर भरपाईच्या तुटीच्या बदल्यात लागोपाठ कर्ज म्हणून प्रदान करण्यात आलेली ₹ 25,759.36 कोटी (2020-21 मध्ये मिळालेले ₹ 11,977 कोटी आणि 2021-22 मध्ये मिळालेले ₹ 13,782.36 कोटी) भारत सरकारकडून देण्यात आलेली कर्जे वगळण्यात आली आहेत, जी राज्य शासनाने स्वतःच्या स्त्रोतांकडून परतफेड करायची नाहीत. 2024-25 दरम्यान, या लागोपाठ कर्जाची थकबाकी ₹ 7,982.17 कोटींच्या परतफेडीनंतर ₹ 17,777.19 कोटी इतकी कमी करण्यात आली आहे, जी 2023-24 च्या लेख्यांमध्ये समायोजित करण्यात आली (2024-25 च्या वित्त लेख्यात केलेली उपचारात्मक सुधारणा)

स्रोत: वित्तीय लेखे

राज्याची एकूण दायित्वे 2020-21 मधील ₹ 5,36,199.46 कोटी वरून वाढून 2024-25 मध्ये ₹ 8,59,097.13 कोटी झाली आहे, 60.22 टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. मुख्यतः अंतर्गत कर्ज (₹ 2,45,226.65 कोटी) मध्ये 60.10 *टक्क्यांनी* आणि लोक लेखे दायित्वात (₹ 45,219.64 कोटी) 37.78 *टक्क्यांनी* वाढ झाली. 2020-21 ते 2024-25 दरम्यान भारत सरकारच्या कर्जात मोठी वाढ ही भांडवली खर्च/गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजनेअंतर्गत भारत सरकारने जारी केलेल्या विशेष सहाय्यामुळे (50 वर्षांसाठी व्याजमुक्त कर्ज) होती.


राज्याच्या वित्तीय दायित्वांचा संपूर्णपणे विस्तार झाला, जो प्रामुख्याने अंतर्गत कर्जे आणि मोठ्या प्रमाणावरील लोक लेखे शिल्लकांद्वारे केला गेला.

20 *टक्क्यांच्या* खाली दायित्व-ते-स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तर नियंत्रणात ठेवणे हे सूचित करते की कर्जाची वाढ नियंत्रणात राहिली आहे. तथापि, अलिकडच्या वर्षांतील

दायित्वांच्या वाढीचा दर, वाढीव निव्वळ कर्जासह, कर्ज शास्वतता राखण्यासाठी महसूल उत्प्लावकता आणि कार्यक्षम भांडवली खर्च टिकवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

वर्ष 2024-25 च्या अखेरीस थकीत एकूण दायित्वांची आकडेवारी **आलेख 1.30** मध्ये दर्शविली आहे.


आलेख 1.30: 2024-25 अखेरीस थकीत एकूण दायित्वांची विभागणी



(स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25)

आलेख 1.31 मध्ये पाच वर्षांच्या कालावधीत म्हणजेच 2020-25 दरम्यान घेतलेल्या अंतर्गत ऋणाचे प्रमाण आणि परतफेड दर्शविली आहे.

आलेख 1.31: घेतलेल्या अंतर्गत ऋणाच्या तुलनेत केलेली परतफेड



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

गेल्या दोन वर्षांतील घटते परतफेडीचे प्रमाण (2023-24 मध्ये 33 *टक्के* आणि 2024-25 मध्ये 31 *टक्के*) सूचित करते की राज्याची भविष्यातील परतफेडीची जबाबदारी वाढत आहे. एकंदरीत कल परतफेडीची क्षमता कमी होण्याबरोबरच कर्ज घेण्यावरील वाढत्या अवलंबित्वाचे प्रतिबिंब दर्शवितो.

1.5.1.2 कर्जाऊ घेतलेल्या निधीचा वापर

कर्ज घेतलेल्या निधीचा वापर भांडवल निर्मिती आणि विकासात्मक कामांसाठी करणे आवश्यक आहे. सध्याचा खर्च भागविण्यासाठी आणि थकीत कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी कर्जाऊ घेतलेल्या निधीचा वापर करणे ह निरोगी कल नाही. **तक्ता 1.28** आणि **आलेख 1.32** अनुक्रमे 2020- 25 दरम्यान घेतलेल्या निधीचा वापर आणि कल दर्शवितो.

तक्ता 1.28: कर्जाऊ घेतलेल्या निधीचा वापर


(₹ कोटीत)

वर्ष		2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
एकूण कर्जे*	**2**	**75379.65**	**76705.82**	**87572.84**	**125820.67**	**143634.90**
यापूर्वीच्या कर्जाची परतफेड (मुद्दल)	3	26427.28	35934.66	37665.79	40649.98	41805.78
निव्वळ भांडवली खर्च	4	29686.70	46670.39	61643.61	72573.40	82773.31
निव्वळ कर्जे व अग्रिमे	5	729.50	1257.15	4021.79	4231.96	11440.66
उपलब्ध निव्वळ कर्जामधून भागविलेल्या महसुली खर्चाचा हिस्सा	6=2-3-4-5	30513.17	6625.98	(-)15758.35	8365.33	7615.15

**वस्तु व सेवा कर नुकसानभरपाईच्या तुटीच्या बदल्यात* 2020-21 *आणि* 2021-22 *या कालावधीत केंद्र सरकारकडून देण्यात आलेली लागोपाठ कर्ज म्हणून अनुक्रमे* ₹ 11,977 *आणि* ₹ 13,782.36 *कोटी वगळता, जी वस्तू व सेवा कर नुकसानभरपाईच्या तुटीच्या बदल्यात राज्याने त्याच्या स्त्रोतांकडून भरावयाची नव्हती.*

स्रोत: वित्त लेखे

आलेख 1.32: कर्जाऊ निधीच्या वापराचा कल




(स्रोत: वित्तीय लेखे)

कर्जाच्या वापराचे विश्लेषण असे दर्शविते की गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत राज्याचे कर्जाऊ निधीवरील अवलंबित्व झपाट्याने वाढले, एकूण कर्ज 2020-21 मधील ₹ 75,379.65 कोटींवरुन वाढून 2024-25 मध्ये ₹ 1,43,634.90 कोटी झाले आहे. या कर्जाचा बराचसा भाग भांडवली खर्चासाठी वापरला जात असला तरी, राज्याने कर्जाचा काही भाग महसुली खर्चासाठी वापरणे सुरू ठेवले, जे वित्तीय तणाव सूचित करते.

1.5.1.3 ऋणाची रूपरेषा: परिपक्वता आणि परतफेड

ऋणाची परिपक्वता आणि परतफेड रूपरेषा हे ऋण परतफेड किंवा कर्ज सेवेसाठी शासनाची बांधिलकी दर्शविते. राज्याची ऋण परिपक्वता रूपरेषा **आलेख 1.33** मध्ये दर्शविली आहे.



(स्रोत: वित्तीय लेखे 2024-25)

प्रलंबित लोक ऋणांच्या परिपक्वता रूपरेषेवरुन असे निदर्शनास येते की एकूण प्रलंबित लोक ऋणांपैकी 51.97 *टक्के* (₹ 3,23,179.82 कोटी) ज्यासाठी परिपक्वता तपशील उपलब्ध आहेत (₹ 6,21,880.97 कोटी) पुढील सात वर्षांत परतफेड करावयाचे आहेत, ज्यामुळे त्या कालावधीत शासकीय अर्थसंकल्पावर ताण येऊ शकतो. राज्य शासनाला विचारपूर्वक कर्ज परतफेडीची रणनीती आखावी लागेल आणि स्वत:चे कर आणि करेतर महसूल संसाधने वाढवावी लागतील.

1.5.1.4 वित्तीय तुटीची वित्तपुरवठा संरचना

तक्ता 1.29 मध्ये 2020-25 मधील वित्तीय तुटीची वित्तपुरवठा पद्धत दर्शविली आहे.

तक्ता 1.29: वित्तीय तुटीचे घटक आणि त्याच्या वित्तपुरवठ्याची पद्धत

(₹ कोटीत)

	तपशील	2020-21	2021-22	2022-23	2023-24	2024-25
वित्तीय तूट		**71558.05**	**64301.86**	**67601.87**	**90559.36**	**124208.74**
महसुली तूट (-)/आधिक्य (+)		(-)41141.85	(-)16374.32	(-)1936.47	(-)13754.00	(-)29994.76
निव्वळ भांडवली खर्च		(-)29686.70	(-)46670.39	(-)61643.61	(-)72573.40	(-)82773.32
निव्वळ कर्जे आणि अग्रिमे		(-)729.50	(-)1257.15	(-)4021.79	(-)4231.96	(-)11440.66
वित्तीय तुटीच्या वित्तपुरवठ्याची पद्धत*						
1	बाजारातील कर्जे	50020.38	40781.64	42810.77	79737.41	90917.90
2	भारत सरकारकडून मिळालेली कर्जे	14025.39#	17510.15#	9204.43	8098.48	11420.69
3	राष्ट्रीय अल्प बचत निधीला जारी करण्यात आलेले विशेष रोखे	(-)5380.71	(-)5380.71	(-)5380.71	(-)5380.71	(-)5380.71
4	वित्तीय संस्थांकडून कर्जे	2264.29	1642.44	3272.58	2715.51	4871.25
5	अल्प बचती, भविष्यनिर्वाह निधी इत्यादी.	739.88	966.64	576.44	526.53	363.03
6	राखीव निधी	5170.15	8683.81	5959.45	9785.17	8534.74
7	ठेवी आणि अग्रिमे	6006.13	2603.65	3722.43	10078.66	23601.18
8	निलंबने आणि संकीर्ण	(-)300.30	7177.97	10706.40	(-)6856.44	(-)5193.98
9	प्रेषणे	2127.85	(-)588.73	528.50	(-)389.22	3015.11
10	परतफेड न झालेला आकस्मितता निधी	(-)1000.00	0	0	0	0
11	आकस्मितता निधीत/निधीतून विनियोजन	10000.00	0	0	0	0
12	**सर्वंकष तूट**	**83673.06**	**73396.86**	**71400.29**	**98315.39**	**132150.32**
13	रोख रकमेतील वाढ (+)/ घट(-)	(-)12115.01	(-)9095.00	(-)3798.42	(-)7756.03	(-)7941.58
14	**एकंदर वित्तीय घट**	**71558.05**	**64301.86**	**67601.87**	**90559.36**	**124208.74**

स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

* सर्व आकडेवारी संबंधित वर्षातील वितरणाची निव्वळ आकडेवारी आहे

यामध्ये वस्तु व सेवा कर भरपाईच्या बदल्यात भारत सरकारकडून प्राप्त झालेल्या लागोपाठ कर्जाचा (2020-21 साठी ₹ 11,977 कोटी आणि 2021-22 साठी ₹ 13,782.36 कोटी) समावेश आहे. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागानुसार, विशेष खिडकी अंतर्गत घेतलेले कर्ज (2020-21 साठी ₹ 11,977 कोटी आणि 2021-22 साठी ₹ 13,782.36 कोटी) वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे कर्ज मानले गेले नाही.

2020-21 ते 2024-25 दरम्यान राज्याची वित्तीय स्थिती अस्थिर परंतु एकूणच विस्तारत असलेल्या वित्तीय असमतोलाचे प्रतिबिंब दर्शवते. एकूण वित्तीय तूट 2020-21 मधील ₹71,558 कोटींवरून 2021-22 आणि 2022-23 मध्ये तात्पुरता बदल झाल्यानंतर 2024-25 मध्ये ₹1,24,208.74 कोटी पर्यंत वाढली आहे. प्रामुख्याने निरंतर महसुली तूट आणि वाढत्या भांडवली खर्चामुळे होती, तसेच अलिकडच्या वर्षांत निव्वळ कर्जे आणि अग्रिमांच्या वाढत्या घटकामुळे वित्तीय तूट होती. वित्तपुरवठ्याच्या बाजूने, बाजारातील कर्जे ही तूट भरून काढण्याचा प्रमुख स्रोत आहे, ज्यास भारत सरकारकडून

कर्ज, ठेवी आणि अग्रिमे, राखीव निधी आणि इतर दायित्वांची जोड दिली गेली. 2023- 24 आणि 2024-25 मध्ये कर्ज आणि इतर वित्तपुरवठा साधनांवरील वाढते अवलंबित्व हे वाढते वित्तीय ताण आणि राज्याच्या वित्तपुरवठ्यात संसाधनांमधील वाढती तफावत दर्शवते.

1.5.2 लेखापरीक्षणोत्तर तूट निर्देशक

2024-25 या वित्तीय वर्षासाठी राज्याच्या वित्त लेख्यानुसार राज्याची महसुली तूट ₹ 29,994.76 कोटी होती. (0.66 स्थूल राज्य उत्पन्नाच्या *टक्के),* वित्तीय तूट ₹ 1,24,208.74 *कोटी* (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 2.74 *टक्के)* होती, तर प्राथमिक तूट ₹ 70,753.63 *कोटी* (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 1.56 *टक्के*) होती.

तक्ता 1.30 मध्ये 2024-25 मध्ये राज्य शासनाद्वारे निधीमध्ये कमी योगदान/ योगदान न देणे आणि चुकीचे वर्गीकरण/नोंदणी विचारात घेतल्यानंतर वास्तविक अधिशेष/तुटीचे मूल्यांकन केले आहे.

तक्ता 1.30: 2024-25 दरम्यान महसुली तूट आणि वित्तीय तुटीवर विशिष्ट व्यवहारांचा परिणाम

तपशील	महसुली तुटीवर परिणाम (उनोक्ती (+)/ अत्योक्ती (-) (₹ कोटींत)	वित्तीय तुटीवर परिणाम (उनोक्ती) (+) (₹ कोटीत)	परिच्छेद संदर्भ
आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पबाहय वित्तीय व्यवहार उदा. राज्य सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या, एसपीव्ही आणि इतर समकक्ष साधने द्वारे कर्जे, एमएसआरडीसीद्वारे कर्ज जेथे मुद्दल आणि/किंवा व्याजाची भरणी राज्याच्या अर्थसंकल्पातून करायची आहे तेथे एकूण कर्ज ओळखण्याच्या पूर्णतेचा मुद्दा		(+)18440	3.1
महसूल आणि भांडवली खर्च यांच्यातील चुकीचे वर्गीकरण	(+)4,069.91		2.5.6
राखीव निधी आणि व्याज असलेल्या ठेवींवर व्याजाचे समायोजन न करणे	(+)762.49	(+)762.49	3.2.1
उपकर/शुल्क/अधिभार हस्तांतरित न करणे	(+)1,515.23	(+)1,515.23	3.2.3.1
एकूण	**6347.63**	**20717.72**	
स्रोत: वित्तीय लेखे 2024-25 आणि लेखापरीक्षणोत्तर विश्लेषण			

तक्ता 1.30 मध्ये दर्शविलेल्या व्यवहारांचा विचार केला तर वास्तविक महसूल तूट आणि वित्तीय तूट अनुक्रमे ₹ 36,342.29 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 0.80 *टक्के)* आणि ₹ 1,44,926.46 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 3.20 *टक्के*) होईल.

लेखापरीक्षणोत्तर - एकूण लोक ऋण

महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम - 2005 नुसार एकूण दायित्वे म्हणजे राज्याच्या एकत्रित निधी आणि राज्याच्या लोक लेख्यांतर्गत

असलेली दायित्वे. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम 2006 नुसार 'अर्थसंकल्पबाहय कर्ज' म्हणजे अशी अर्थसंकल्पबाहय जमा , जिची परतफेड व्याज आणि मुद्दलाच्या माध्यमातून करणे आवश्यक असते आणि ज्या दायित्वाचे स्वरूप आकस्मिक नसते. त्यांना शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रित सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा विभागीय व्यावसायिक उपक्रमांद्वारे वित्तपुरवठा केला जातो, जे शासनाच्या वतीने बाजारातून कर्ज घेऊन संसाधने वाढवतात. तथापि, शासनाने कर्जाची परतफेड करणे आणि/ किंवा कर्ज सेवा स्वत:च्या अर्थसंकल्पातून करणे आवश्यक असते.

खर्चाची गुणवत्ता संतुलित करण्यासाठी आणि अंदाजपत्रकीय निधीचा कमी वापर होणे कमी करण्यासाठी योग्य खर्चाच्या पातळीसाठी सर्व संभाव्य खर्चाचे अनुकूलन करण्यासाठी अर्थसंकल्पीय प्रस्तावांद्वारे प्रयत्न केला पाहिजे. खर्च करणाऱ्या घटकांद्वारे वेळेवर प्रत्यार्पण करणे ही मंजूर अर्थसंकल्पात इष्टतम पुनर्वाटपासाठी एक महत्त्वाची यंत्रणा आहे.

(ए) प्रत्यार्पण पश्चात बचती

अनुदान आणि विनियोगाच्या विश्लेषणावरून असे दिसून आले की 2024-25 या वर्षात दोन प्रकरणांमध्ये, **तक्ता 2.8** मध्ये दर्शविल्याप्रमाणे बचत (प्रत्यार्पित केल्यानंतर) प्रत्येक प्रकरणात ₹ 100 कोटीपेक्षा जास्त होती.

तक्ता 2.8: 2024-25 मध्ये प्रत्यार्पणानंतर मोठ्या बचती (₹ 100 कोटीपेक्षा जास्त) दर्शविणारी अनुदाने/विनियोजने यांचे विवरणपत्र

(₹ कोटीत)

अ. क्र.	अनुदान क्र.	अनुदानाचे नाव	एकूण अंदाज	प्रत्यक्ष खर्च	बचती	प्रत्यार्पण	प्रत्यार्पणानंतर बचती
1	एच 05	रस्ते व पूल	7140.88	5720.91	1419.96	938.27	481.69
2	एच 08	सार्वजनिक बांधकामाच्या प्रशासकीय व कार्यचालन इमारतींवरील भांडवली खर्च	7653.89	4090.74	3563.14	3437.17	125.97
स्रोत: 2024-25 चे विनियोजन लेखे							

2024-25 या वर्षासाठी अनुदान आणि विनियोजनांच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास आले की 80 अनुदानांमध्ये, बचत (प्रत्यार्पण वगळता) प्रत्येक प्रकरणात ₹ 100 कोटीपेक्षा जास्त होती (**परिशिष्ट 2.6**). तसेच, असे निदर्शनास आले की दोन अनुदाने आणि पाच विनियोजनांमध्ये, प्रत्येक प्रकरणात ₹ दोन कोटीपेक्षा जास्त तरतुदी असूनही, **तक्ता 2.9** मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणताही खर्च केला गेला नाही.

तक्ता 2.9: 2024-25 मधील विना-वापर पडून राहिलेली संपूर्ण अनुदाने

(₹ कोटीत)

अ.क.	अनुदान क्र.	अनुदानाचे नाव	रक्कम
1	सी 08	स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे	10.00
2	एम 02	अन्न, साठवण व वखार	26.80
2	ओ 04	इतर ग्रामविकास कार्यक्रम	100.08
3	ओ 06	इतर वैज्ञानिक संशोधन	38.00
4	ओ12	सर्वसाधारण वित्तीय व व्यापारी संस्थांमधील गुंतवणूक	20.00
5	क्यु 06	शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे	3.46
6	झेडआय 01	व्याज प्रदाने	11.00
स्रोत: 2024-25 चे विनियोजन लेखे			

अनुदान वाय-02 आणि सी-07 च्या अनुदान पुनरावलोकनादरम्यान दस्तावेजांच्या छाननीत असे निदर्शनास आले की **तक्ता 2.10** मध्ये दर्शविलेल्या खालील चार

उपशीर्षांमध्ये, संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद 31 मार्च 2025 रोजी प्रत्यार्पित करण्यात आली होती.

तक्ता 2.10: अनुदान सी 07 आणि वाय 02 अंतर्गत संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित दर्शविणारा तपशील

(₹ कोटीत)

अ.क्र.	तपशील	मूळ आणि पुरवणी अनुदान	पुनर्विनियोजित केलेली रक्कम	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च
1	2215 107(04)(05) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची अंमलबाजवणी, प्रचार, प्रसिद्धी व बक्षीस योजना	20.00	20.00	0	0
मार्च 2025 मध्ये ₹ 20.00 कोटीची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध वित्त विभागाद्वारे अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरील निधी मंजूर न केल्याशी जोडण्यात आला.					
2	2215 196(02)(01) मराठवाडा विभागाकरिता एकात्मिक जाळे पद्धतीने पाणी पुरवठा योजनेसाठी सहायक अनुदान	5.0	5.0	0	0
मार्च 2025 मध्ये ₹ 5.00 कोटींची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून निधीची मागणी न केल्याशी जोडण्यात आला.					
3	2215 196(02)(02) तिलारी प्रकल्पावर आधारित पाणी पुरवठा योजना	5.00	5.00	0	0
मार्च 2025 मध्ये संपूर्ण ₹ 5.00 कोटीची तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध या योजनेंतर्गत अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून निधीची मागणी न केल्याशी जोडण्यात आला.					
4	2406 (003(00)(04) शिक्षण व प्रशिक्षण- विद्यार्थी हरित सेना	40.00	40.00	0	0
मार्च 2025 मध्ये वरील उपशीर्षामधून ₹ 40.00 कोटींची संपूर्ण तरतूद रिक्त पदे न भरणे, खर्चात कपात, देयके प्राप्त न झाल्याने आणि योजनेनुसार काम पूर्ण न झाल्यामुळे प्रत्यार्पणाद्वारे काढून घेण्यात आली होती.					
स्रोत: विनियोजन लेखे 2024-25					

तसेच, मार्च 2025 मध्ये **तक्ता 2.11** मध्ये नमूद केल्यानुसार अनुदान क्र. वाय-02 आणि सी-07 च्या नऊ उपशीर्षांतर्गत ₹ दोन कोटी आणि त्याहून अधिक आणि एकूण तरतूदीच्या 21.15 *टक्के* ते 91.51 *टक्के* दरम्यान बचत प्रत्यार्पित करण्यात आली.

तक्ता 2.11: अनुदान सी 07 आणि वाय 02 अंतर्गत उपशीर्ष-निहाय लक्षणीय बचत

(₹ कोटीत)

अ. क्र.	संगणक सांकेतांक	तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष	बचती	बचतीची टक्केवारी
1	2215 01 196 (01) (05)	नियमित आस्थापना	282.28	222.58	59.70	21.15
मार्च 2025 मध्ये ₹ 59.70 कोटींची तरतूद प्रत्यार्पण करण्याचा संबंध जिल्हा परिषदांकडून अंदाजापेक्षा कमी मागणी आणि कंत्राटी सेवेअंतर्गत पदे न भरल्याशी जोडण्यात आला.						
2	2215 01 001 (01) (04)	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना वेतन आणि इतर भत्ते यांच्या प्रदानासाठी सहाय्यक अनुदान	252.87	164.29	88.58	35.03
बचतीचा संबंध महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या कर्मचाऱ्यांना 7[व्या] वेतन आयोगाची थकबाकी प्रदान करण्यास मंजुरी न मिळाल्यामुळे आणि भरती प्रक्रिया अंतिम न केल्याशी जोडण्यात आला. पुनर्विनियोजित रक्कम ₹ 88.58 कोटी मार्च 2025 मध्ये प्रत्यार्पित करण्यात आली.						
3	2215 02 107(02) (05)	स्वच्छ भारत अभियान (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा)	541.10	71.39	469.71	86.81
4	2215 02 107(02) (10)	स्वच्छ भारत अभियान (केंद्र हिस्सा) (केंद्र पुरस्कृत योजना)	1262.00	107.09	1154.91	91.51
मार्च 2025 मध्ये ₹ 1624.62 कोटींची तरतूद प्रत्यार्पित केल्याचा संबंध प्राप्त झालेल्या केंद्राच्या हिश्श्याच्या प्रमाणात राज्याचा हिस्सा जारी करण्याशी जोडण्यात आला. 107(02)(10) या शीर्षाखाली ₹ 0.10 कोटीची अजून झालेल्या बचत करण्याची कारणे सादर केलेली नाहीत (जुलै-2025).						
5	2406 02 110 (00) (03)	वन्यजीव आश्रयस्थानांचा एकात्मिक विकास (60% केंद्र हिस्सा)	22.50	3.11	19.39	86.18
6	2406 02 110 (00) (04)	व्याघ्र प्रकल्प (अनावर्ती खर्च) (60% केंद्र हिस्सा)	45.00	14.59	30.41	67.57
7	2406 02 110 (00) (16)	वन्यजीव आश्रयस्थानांचा एकात्मिक विकास (40% राज्य हिस्सा)	15	2.14	12.86	85.73
मार्च 2025 मध्ये वरील उपशीर्षामधून ₹ 62.67 कोटीचा निधी प्रत्यार्पित करण्यात आला. विभागाने नमूद केले की, रिक्त पदे न भरणे, खर्च कमी होणे, देयके प्राप्त न झाल्याने आणि योजनेनुसार काम पूर्ण न झाल्यामुळे निधी प्रत्यर्पित करण्यात आला.						
8	2415 06 277 (00) (02)	वन विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी, कुंडल (वचनबध्द)	10.03	5.74	4.29	42.77
9	2415 06 277 (00) (03)	वन विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपुर	45.00	21.65	23.35	51.89
मार्च 2025 मध्ये वरील उपशीर्षामधून ₹ 27.64 कोटीचा निधी प्रत्यार्पित करण्यात आला. विभागाने नमूद केले की देयके प्राप्त न झाल्यामुळे, रिक्त पदे न भरल्यामुळे आणि प्रशिक्षणार्थींचा सहभाग कमी झाल्याने हा निधी प्रत्यर्पित करण्यात आला.						
स्रोत: विनियोजन लेखे 2024-25						

(बी) सातत्यपूर्ण बचती

"सातत्यपूर्ण बचती" म्हणजे दरवर्षी वितरित केलेल्या निधीचा पूर्ण वापर न करण्याची सातत्यपूर्ण प्रथा. गेल्या तीन वर्षात बचतीमधील सातत्यावरुन असे निदर्शनास आले की विभागांमधील अर्थसंकल्पीय नियंत्रणे प्रभावी नव्हती आणि वर्षासाठी निधीचे वाटप करताना मागील वर्षांचे कल विचारात घेतले गेले नाहीत. असे निदर्शनास आले की 2022-23 ते 2024-25 या कालावधीत 52 अनुदानांमध्ये, प्रत्येक प्रकरणात ₹ 100 कोटीपेक्षा जास्त बचत झाली **(परिशिष्ट 2.7)**.

नगर विकास, पोलिस प्रशासन, जल संपदा, ग्रामीण विकास, शिक्षण, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता आणि सामाजिक सुरक्षा यामध्ये मोठी आणि वारंवार होणारी बचत दिसून येते, यावरून असे सूचित होते की कमी वापर केवळ परिपूरक किंवा निम्न-प्राधान्य क्षेत्रांपुरता मर्यादित नाही. पाटबंधारे, रस्ते आणि पूल, ऊर्जा, ग्रामीण विकास आणि सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च यासारखी भांडवल-केंद्रित अनुदाने सातत्याने उच्च बचत दर्शवितात, जे अंमलबजावणीत विलंब, जमीन/मंजुरी समस्या किंवा कमकुवत प्रकल्प तयारी दर्शवितात.


काही अनुदाने अनेक वर्षांत अत्यंत उच्च बचत गुणोत्तर (50-100 *टक्के*) दर्शवितात (उदा. इतर वित्तीय आणि विविध सेवा, गृहनिर्माण, अल्पसंख्याक विकास, पाणीपुरवठा आणि स्वच्छता) दर्शवितात ज्यावरून अर्थसंकल्पातील तरतुदी शोषक क्षमतेपेक्षा जास्त असल्याचे सूचित होते .

अनेक मोठ्या विभागांमध्ये *(उदा. पोलिस प्रशासन, नगर विकास,* जल संपदा*)* बचतीची संपूर्ण रक्कम वर्षागणिक वाढत गेली, जेथे बचतीची टक्केवारी मोठ्या प्रमाणात स्थिर राहिली आणि वित्तीय परिणाम वाढला. प्रमुख आणि लोककल्याणकारी योजनांमधील बचतीची पुनरावृत्ती सूचित करते की धोरणात्मक हेतू आणि अर्थसंकल्पीय प्राधान्यक्रम हे विभागीय आणि क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्यायोग्य योजनांमध्ये पुरेसे रूपांतरित होत नाहीत. तीन वर्षांत समान बचत पद्धती चालू ठेवणे हे दर्शविते की मागील बचतीने नंतरच्या अर्थसंकल्पीय अंदाजांची पुरेशी माहिती दिली नाही, जे अर्थसंकल्प प्रक्रियेतील कमकुवत माहितीची शृंखला प्रतिबिंबित करते.

(सी) अर्थसंकल्पीय वाटपाच्या उपयोगितेची टक्केवारी

महाराष्ट्र अंदाजपत्रक नियमावलीच्या परिच्छेद 173 मध्ये असे नमूद केले आहे की वितरण किंवा नियंत्रण अधिकाऱ्यांनी इतर शीर्षाखाली संभाव्य अनपेक्षित अतिरिक्त रक्कम भागविण्यासाठी किंवा नवीन खर्च भागविण्यासाठी बचत राखीव ठेवू नये, जी सामान्यत: पुढील वर्षाच्या अंदाजात प्रदान केली जाईल. जेव्हा ते लक्षात येतील तेव्हा सर्व बचती त्वरित प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे. ज्या तरतुदी फायदेशीर वापरल्या जाऊ शकत नाहीत त्या प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे. 2024-25 मधील एकूण बचतीसह वापराच्या टक्केवारीनुसार समूह केलेल्या अनुदानाचा तपशील **परिशिष्ट 2.8** आणि **आलेख 2.4** मध्ये दर्शविला आहे.

आलेख 2.4: एकूण बचतीशी बचतीच्या टक्केवारीनुसार गटबद्ध केलेली अनुदाने/विनियोजनांच्या संख्येची विभागणी




स्रोत: विनियोजन लेखे

(डी) बचती प्रत्यार्पित केल्या नाहीत

असे निदर्शनास आले की 17 अनुदानांतर्गत ₹ 10.03 कोटी **(परिशिष्ट 2.9)** ची बचत अजिबात प्रत्यार्पित केली गेली नाही. मार्च 2025 च्या अखेरच्या दिवशी प्रत्यार्पित केलेल्या बचतीचा तपशील (प्रत्येक प्रकरणात ₹ 10 कोटींपेक्षा अधिक) **परिशिष्ट 2.10** मध्ये दिला आहे.

आलेख 2.5: वर्ष 2024-25 साठीच्या बचती व प्रत्यार्पित



स्रोत: विनियोजन लेखे

आलेख 2.5 च्या विश्लेषणावरून असे उघड झाले की 2024-25 मध्ये एकूण प्रत्यापित केलेली ₹ 1,69,072.88 कोटी रकमेपैकी ₹ 1,66,662.47 कोटी (98.57 *टक्के*) 31 मार्च 2025 रोजी प्रत्यार्पित करण्यात आले. वर्षाच्या अखेरीस बेहिशेबी राहण्याऐवजी बचतीला मोठ्या प्रमाणात मान्यता देण्यात आली आणि औपचारिकपणे प्रत्यार्पित केले गेले, यांच्याशी याचा जवळचा संबंध असल्याचे सूचित होते.

तथापि, प्रत्यार्पणाची वेळ हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रत्यार्पित केलेल्या एकूण रकमेपैकी ₹ 1,66,662.47 कोटी (सुमारे 99 *टक्के*) 31 मार्च 2025 रोजी म्हणजेच वित्तीय वर्षाच्या शेवटच्या दिवशी प्रत्यार्पित करण्यात आले. अशी वर्ष अखेरची एकत्रितपणे प्रत्यार्पित बचत बचतीची ओळख पटविण्यास विलंब करण्याकडे लक्ष वेधते, इतर प्राधान्य गरजांसाठी वर्षभरात निधी पुन्हा तैनात करण्याची संधी मर्यादित करते.

2.5.5 महसुली खर्च व भांडवली खर्च यामध्ये चुकीचे वर्गीकरण

सहायक अनुदाने म्हणजे एका शासनाने दुसऱ्या शासन, संस्था, संस्था किंवा व्यक्तीला केलेली मदत, देणग्या किंवा योगदानाच्या स्वरूपातील प्रदाने असतात. मालमत्ता बांधणीसह संस्थेला सहाय्य करण्याच्या विशिष्ट हेतूसाठी अनुदान दिले जाते.

भारतीय शासकीय लेखा मानक-2 नुसार, अनुदानदात्याने अनुदानधारकाला वितरीत केलेल्या सहायक अनुदानाचे वर्गीकरण केले जाईल आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींनी विशेषत्वाने अधिकृत केले आहे, फक्त अशी प्रकरणे वगळता कोणत्या कारणासाठी निधि वितरित केला याची पर्वा न करता, महसुली खर्च म्हणून गणला जाईल.

2024-25 या वित्तीय वर्षात राज्य शासनाने भांडवली खर्च म्हणून ₹ 1,39,561.99 कोटीची नोंदणी केली होती. लेखापरीक्षणाने या रकमेशी संबंधित मंजुरी आदेश आणि खर्च प्रमाणकांची तपासणी केली आणि असे निदर्शनास आले की ₹ 4,069.91 कोटी **(परिशिष्ट 2.11)** रकमेपैकी महसुली स्वरूपाच्या खर्चाची भांडवली खर्चाअंतर्गत नोंद करण्यात आली होती. अशा प्रकारे, ₹ 4,069.91 कोटींचे चुकीचे वर्गीकरण करण्यात आले, ज्यामुळे त्या प्रमाणात महसुली तुटीचे प्रमाण कमी झाले. लेखापरीक्षणानंतर, वित्तीय वर्ष 2024-25 साठी परिणामी भांडवली खर्च ₹ 1,35,492.08 कोटी होता.

2.5.6 अर्थसंकल्पातील प्रमुख धोरणात्मक घोषणा आणि अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी त्यांना प्रत्यक्ष निधी

वर्ष 2024-25 मध्ये राज्य शासनाने अनेक धोरणात्मक उपक्रम/योजना (₹ 10 कोटी आणि त्याहून अधिक) हाती घेतल्या. 2024-25 या वर्षासाठीच्या वित्त लेखा विषयक परिशिष्ट XI, खंड II मध्ये अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेल्या नवीन योजनांसह वर्षभरात घेतलेल्या प्रमुख धोरणात्मक निर्णयांचे तपशील दिले आहेत. 2024-25 मध्ये, ₹ 600.50 कोटीच्या नवीन भांडवली योजना आणि एकूण ₹ 7,246.79 कोटी महसुली योजना सुरू करण्यात आल्या. या नवीन योजनांवर झालेल्या एकूण ₹ 7,907.29 कोटींच्या खर्चापैकी ₹ 7,551.55 कोटी राज्याचा हिस्सा होता, तर ₹ 355.74 कोटी केंद्राचा हिस्सा होता. वर्षभरात राज्य शासनाने हाती घेतलेल्या प्रत्येकी ₹ 10 कोटीपेक्षा जास्त खर्चाच्या 15 नवीन योजनांचा तपशील. **परिशिष्ट 2.12** मध्ये दर्शविला आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना

राज्यातील महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यासाठी, त्यांचे आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी आणि कुटुंबात त्यांची निर्णायक भूमिका बळकट करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने 28 जून 2024 रोजी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" सुरू करण्यास मान्यता दिली. या योजनेंतर्गत 21 ते 65 वर्षे वयोगटातील पात्र महिलांना थेट लाभ हस्तांतरणाद्वारे दरमहा ₹ 1,500 चा आर्थिक लाभ मिळणार आहे. महिला व बालविकास विभागामार्फत या योजनेची अंमलबजावणी केली जाते.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी ₹ 26,200 कोटीचा निधी पुरवणी अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध करून देण्यात आला. याव्यतिरिक्त, 'लेक लाडकी योजने'मधून ₹ 3,490.75 कोटी विनियोजित करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ₹ 29,693.09 कोटीचे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. या बदल्यात, विभागाने ₹ 33,237.24 कोटी खर्च केला, परिणामी ₹ 3,541.16 कोटी अतिरिक्त खर्च झाला, ज्याचे विभागाने कोणतेही विशिष्ट स्पष्टीकरण दिले नाही.

योजनेशी संबंधित एकूण ₹ 29,732.01 कोटी, रकमेच्या ₹1,000 कोटी वरील जास्त प्रमाणकांच्या चाचणी-तपासणीत, असे निदर्शनास आले की जानेवारी ते मार्च 2025 दरम्यान आहरण केलेले ₹ 15,586 कोटी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या आभासी स्वीय ठेवी लेख्यांमध्ये (VPDA) हस्तांतरित करण्यात आले होते. यावरून असे दिसून येते की हा निधी त्वरित वापरासाठी आवश्यक नव्हता आणि अर्थसंकल्पीय शिस्त आणि आर्थिक औचित्याच्या तत्त्वांच्या विरुद्ध वास्तविक खर्चाची गरज न घेता तो काढला गेला होता.

लक्षणीय अतिरिक्त खर्च स्प्ष्टीकरणाशिवाय होऊन मोठ्या रकमेची रक्कम त्वरित आवश्यकता न घेता आभासी स्वीय ठेवी लेख्यांमध्ये जमा केली गेली. हे कमकुवत अंदाज, अपुरे आर्थिक नियंत्रण प्रतिबिंबित करते.

2.5.7 खर्चाच्या तिमाही मर्यादेचे पालन न करणे


सामान्य वित्तीय नियमांच्या नियम 62 (3) मध्ये अशी तरतूद आहे की विशेषत: वित्तीय वर्षाच्या शेवटच्या महिन्यांमध्ये खर्चाची घाई आर्थिक औचित्याचे उल्लंघन मानले जाते आणि ते टाळले पाहिजे. वर्षभरात खर्चाचा एकसमान प्रवाह ही योग्य अर्थसंकल्पीय नियंत्रणाची प्राथमिक आवश्यकता आहे. मुंबई वित्तीय अधिनियम, 1959 नुसार वित्तीय वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्चाची घाई टाळणे आवश्यक आहे.

तक्ता 2.12: वित्तीय वर्ष 2024-25 मध्ये खर्चाची घाई

	रक्कम *(₹ कोटीत)*	वर्षातील एकूण खर्चाची टक्केवारी
वर्षातील शेवटची तिमाही (जानेवारी ते मार्च-2025)	260268.6	39.34
वर्षाचा शेवटचा महिना (मार्च-25)	154813.14	23.40
वर्षाचा शेवटचा दिवस (31मार्च 2025)	14848.12	2.24
स्रोत: मासिक नागरी लेखे 2024-25		

वित्तीय वर्ष 2024-25 मध्ये एकूण मासिक जमा (महसुली जमा, भांडवली जमा आणि रोख शिल्लक) आणि खर्चाचा कल **आलेख 2.6** आणि **आलेख 2.7** मध्ये दर्शविला आहे.


आलेख 2.6: जमांचे कल विश्लेषण (महिना-निहाय)



स्रोत: मासिक नागरी लेखे 2024-25

2024-25 मधील एकूण जमांची महिनानिहाय रचना महसुलाच्या ओघातील लक्षणीय असमानता दर्शवते. मासिक जमा ₹ 32,241.87 कोटी ते ₹ 88,557.78 कोटी दरम्यान होती, वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत जमा झालेल्या वार्षिक जमांचा एक मोठा भाग आहे. एकट्या मार्च 2025 मध्ये एकूण जमांपैकी 14.14 *टक्के* महसूल प्राप्त झाला, जो वर्षातील सर्वाधिक आहे, तर मे 2024 मध्ये जमा सर्वात कमी 5.15 *टक्के* होती. शेवटच्या महिन्यांत जमांचे केंद्रीकरण महसूल प्रवाहाचे एकत्रीकरण दर्शविते, जे प्रभावी रोख व्यवस्थापनावर परिणाम करते आणि वर्षभरात संसाधनांच्या उपलब्धतेचा अंदाज कमी करते.

आलेख 2.7: खर्चाचे कलविश्लेषण (महिना निहाय)




स्रोत: मासिक नागरी लेखे 2024-25

महिनानिहाय खर्चाचा कल वित्तीय वर्षाच्या अखेरीस लक्षणीय वाढ दर्शवतो. एप्रिल ते जून या कालावधीत खर्च कमी राहिला आणि प्रत्येक महिन्यातील खर्चाचा हिस्सा वार्षिक खर्चाच्या पाच *टक्क्यांपेक्षा* कमी होता. जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत खर्चात हळूहळू वाढ दिसून आली असली तरी नोव्हेंबरमध्ये त्यात मोठी घट झाली. मार्चमध्ये खर्चात लक्षणीय वाढ दिसून आली, जेव्हा वार्षिक खर्चाच्या 24.84 *टक्के* म्हणजे ₹ 1,61,130 कोटी खर्च झाले. वर्षाच्या शेवटच्या महिन्यात वार्षिक खर्चाच्या सुमारे एक चतुर्थांश केंद्रित खर्च हे कमकुवत खर्चाचे नियोजन आणि अपुऱ्या संनियंत्रणाचे द्योतक आहे. वर्षाच्या अखेरच्या खर्चाचा असा दबाव प्रभावी आर्थिक व्यवस्थापनाला कमकुवत करतो आणि निधीच्या घाईघाईने किंवा कमी वापराचा धोका वाढवतो. आर्थिक शिस्त सुधारण्यासाठी मासिक खर्च नियंत्रणे मजबूत करणे आणि वर्षभर खर्चाचे सुरळीत विभाजन सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

अनुदान वाय-02 पाणी पुरवठा व स्वच्छता अंतर्गत महिनानिहाय खर्च

आलेख 2.8 पाणी पुरवठा आणि स्वच्छता क्षेत्र (वाय-02) अंतर्गत चित्रित केलेला खर्चाची महिनानिहाय रचना वित्तीय वर्षाच्या अखेरीस लक्षणीय एकत्रितपणा दर्शविते. एप्रिल ते जुलै या कालावधीत हा खर्च नगण्य राहिला, जो उपक्रम विलंबाने सुरू झाल्याचे दर्शवतो. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये खर्चात वाढ झाली होती तरी ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये त्यात मोठी घट झाली. शेवटच्या तिमाहीत खर्चात लक्षणीय वाढ दिसून आली, विशेषत: मार्चमध्ये, जेव्हा ₹ 2,127 कोटी खर्च झाले होते. शेवटच्या महिन्यांत वार्षिक खर्चाच्या मोठ्या प्रमाणात एकाग्रता हे कमकुवत नियोजन आणि योजनेच्या अंमलबजावणीवर अपुरे नियंत्रण दर्शवते.

आलेख 2.8: अनुदान वाय-2 पाणीपुरवठा आणि स्वच्छता अंतर्गत वर्ष 2024-25 साठी महिना-निहाय खर्च



तसेच, विनियोजन लेख्यांच्या छाननीतून असे निदर्शनास आले की **परिशिष्ट 2.13** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 12 अनुदानांमध्ये, ₹ 524.77 कोटीचा संपूर्ण खर्च मार्च 2025 मध्ये करण्यात आला होता. त्यातील आकडेवारीवरून असे निदर्शनास आले की, जे वित्तीय

वर्षाच्या अखेरीस खर्चाचे महत्त्वपूर्ण केंद्रीकरण दर्शवते. हा खर्च मुख्यत्वे भांडवली आणि विकासात्मक योजनांशी संबंधित आहे जसे की शैक्षणिक पायाभूत सुविधा, पूर नियंत्रण, औद्योगिक पायाभूत सुविधा, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य सुविधा आणि भाग भांडवल अंशदान जेथे आधीच्या काही महिन्यांत कोणताही खर्च झाला नव्हता. मार्चमधील खर्चाचे केंद्रीकरण, अधिक चांगले खर्चाचे टप्पे तयार करणे मंजुरीला आधी अंतिम रूप देणे आणि अंमलबजावणीच्या वेळापत्रकासह निधी मुक्त करण्याची आवश्यकता अधोरेखित करते.

खर्चाची स्थिर गती राखणे हा चांगल्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापनाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे कारण यामुळे वित्तीय असंतुलन आणि तात्पुरती रोख टंचाई टाळता येते. राज्य शासनाने वर्षभरात होणाऱ्या खर्चाची तिमाहीनिहाय टक्केवारी निर्धारित केलेली नाही. सर्व अनुदानांवर झालेल्या खर्चाचा त्रैमासिक तपशील **परिशिष्ट 2.14** मध्ये दर्शविला आहे. एकंदरीत, तिमाहीनिहाय कल सूचित करतात की अर्थसंकल्पाची अंमलबजावणी शेवटच्या महिन्यांकडे झुकलेली आहे, सुधारित नियोजन, वेळेवर मंजुरी आणि वित्तीय वर्षाच्या चक्राशी खर्चाचे जवळून संरेखन करण्याची गरज अधोरेखित करते.

अनुदान वाय-02- पाणी पुरवठा आणि स्वच्छता यांच्या लेखापरीक्षण छाननीत वित्तीय वर्षाच्या अखेरीस खर्चात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले. उपशीर्ष-निहाय खर्चाच्या तपासणीत असे दिसून आले की अनेक प्रकरणांमध्ये, मार्च 2025 मध्ये एकूण खर्चापैकी 56 ते 100 *टक्के* खर्च झाला होता, ज्याचा तपशील **तक्ता 2.13** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 2.13: अनुदान वाय-02 आणि सी-07 मध्ये उपशीर्ष स्तरावर खर्चाची घाई

(₹ कोटित)

अनु. क्र.	उपशीर्ष सांकेतांक	उपशीर्ष तपशील	मार्च 2025 मधील खर्चित रक्कम (₹ कोटीत)	प्रगमनशील खर्च (₹ कोटीत)	मार्च मधील खर्चाची टक्केवारी
वाय-02					
1.	2215-01-196-A19	आकस्मिक पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या तात्पुरत्या उपाय योजनांसाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान (अनिवार्य)	231.17	338.51	**68.29**
2.	2215-01-102-208	नळाद्वारे पाणी पुरवठा योजना- देखभाल व दुरूस्ती यासाठी अनुदान	40.00	40.00	**100.00**
विभागाने नमूद केले की, वित्तीय वर्ष 2024-25 मध्ये, शासकीय निर्णयाच्या अनुषंगाने (मार्च 2025) बहु कौशल्य पूर्व प्रशिक्षण मान्यता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी 2024 या वित्तीय वर्षात, प्रधान शीर्ष 2215 पाणीपुरवठा आणि स्वच्छता, उपशीर्ष 2082 अंतर्गत ₹ 40.00 कोटी वितरित करण्यात आले.					

अनु. क्र.	उपशीर्ष सांकेतांक	उपशीर्ष तपशील	मार्च 2025 मधील खर्चित रक्कम (₹ कोटीत)	प्रगमनशील खर्च (₹ कोटीत)	मार्च मधील खर्चाची टक्केवारी
ही रक्कम राज्य जल आणि स्वच्छता अभियानाला आभासी स्वीय ठेवी लेख्याद्वारे मागणी क्रमांक वाय-02, लेखा शीर्ष 2215-2082, तपशीलवार शीर्ष 31- सहाय्यक अनुदान (वेतनेतर) (राज्य हिस्सा - कार्यक्रम) अंतर्गत वितरित करण्यात आली. आभासी स्वीय ठेवी लेख्यांच्या कार्यचालनावर नियंत्रण ठेवणाऱ्या तरतुदींनुसार, आभासी स्वीय ठेवी लेख्यामध्ये जमा केलेला निधी अंतिम खर्च नसतो. खर्च न केलेली कोणतीही शिल्लक आभासी स्वीय ठेवी लेख्यांमध्ये निधी आहरणाच्या/जमा करण्याच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर किंवा मंजुरी आदेशात निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत, यापैकी जे आधी असेल ते, राज्याच्या एकत्रित निधीत परत जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार, मंजूर रकमेचा वापर झाल्यानंतर आभासी स्वीय ठेवी लेख्यांमध्ये शिल्लक राहिलेली रक्कम निर्धारित मुदतीत नियुक्त केलेल्या एकत्रित निधी/एकत्रित निधीमध्ये परत हस्तांतरित केली जाईल.					
3.	2215-01-102-994	मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम -ग्रामीण क्षेत्रासाठी शुद्ध पेयजल पुरविण्यासाठी	65.84	65.84	**100.00**
4.	2215-01-102-997	जल जीवन अभियान-सहाय्यीकृत बाबी व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणासाठी अर्थसाहाय्य (राज्य हिस्सा 40%)	162.58	289.99	**56.06**
2024-25 या वित्तीय वर्षात भारत सरकारने या योजनेसाठी ₹ 5352.93 कोटीच्या अंदाजित वाटपाला मान्यता दिली. तथापि, वर्षभरात भारत सरकारकडून ₹1605.00 कोटी निधी प्राप्त झाला, त्यापैकी ₹ 112.41 कोटी सहाय्यक उपक्रम आणि पाण्याच्या गुणवत्तेशी संबंधित होते. वर्षभरात भारत सरकारने मंजूर केलेले संपूर्ण अंदाजित वाटप वितरित केले नसल्यामुळे, राज्य शासनाने योजनेच्या अंमलबजावणीत सातत्य राखण्यासाठी आणि चालू उपक्रमांमध्ये व्यत्यय येऊ नये यासाठी मार्च 2025 मध्ये एक विशेष उपाय म्हणून ₹ 289.99 कोटी जारी केले. उर्वरित केंद्रीय सहाय्य प्राप्त होण्याची अपेक्षा म्हणून आणि निधी जारी करण्याच्या विद्यमान तरतुदींनुसार हे वितरण करण्यात आले. त्यानुसार, मार्च 2025 मध्ये निधी जारी करणे केंद्रीय निधीतील तुटवड्यामुळे आवश्यक होते आणि तो टाळता येण्याजोगा किंवा अनियमित खर्च दर्शवत नाही. निधीचा वापर विहित मार्गदर्शक तत्वांनुसार भारत सरकारकडून भविष्यात जारी करण्यात येणाऱ्या निधीच्या तुलनेत समायोजित केला जाईल.					
5.	2215-01-199- A05	महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाचे लाभ मंजूर करण्यासाठी सहायक अनुदान (अनिवार्य)	351.12	351.12	**100.00**
स्रोत: विनियोजन लेखे					

2.6 निवडलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी

केंद्र पुरस्कृत योजना भारताच्या सहकारी संघराज्यवादाचा एक महत्वाचा घटक आहे, ज्यामध्ये केंद्र सरकार सामाजिक क्षेत्रातील कार्यक्रमांसाठी राज्यांना अनुदान प्रदान करते. निधीच्या ओघाची कार्यक्षमता सुधारण्यासाठी सुधारणा करूनही - जसे की एकल नोडल अभिकरण[2] नमूना, एकल नोडल अभिकरण-स्पर्श प्लॅटफॉर्म आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली आणि एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे अगदी वेळेवर मुक्तता (जस्ट-इन-टाइम रिलीझ) - अर्थसंकल्प, लेखांकन आणि केंद्र आणि राज्य हिश्श्यामध्ये समेट करण्यातील आव्हाने कायम आहेत. केंद्र सरकारने राज्यांना कामगिरीवर आधारित अनुदानाद्वारे या सुधारणांचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे, डिजिटल साधनांचा अवलंब करण्यास आणि वित्तीय प्रणालींच्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन दिले आहे.

प्रत्यक्ष खर्चावर आधारित 2024-25 मधील पाच मुख्य योजना खाली तपशीलवार दिल्या आहेत:

तक्ता 2.14: प्रत्यक्ष खर्चावर आधारित पाच मुख्य योजना

(₹ कोटीत)

भारत सरकार योजना	राज्य योजना	राज्य कोषागाराला भारत सरकारने वितरित केले	राज्याचा प्रमाणातील हिस्सा	कोषागाराकडुन एकल नोडल अभिकरणास केंद्राचा हिस्सा	कोषागाराकडुन एकल नोडल अभिकरणास राज्याचा हिस्सा	कोषागाराकडुन एकल नोडल अभिकरणास एकूण वितरित केलेले	खर्च	अखर्चित शिल्लक
प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण	इंदिरा आवास योजना	4860.58	3240.39	4860.58	3240.39	8100.97	5220.88	4107.69
प्रजोत्पत्ती व बाल आरोग्य आणि स्वास्थ्य प्रणाली बळकटीकरण राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य	राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान-राज्य आरोग्य संस्थेला सहायक अनुदान	1515.02	1010.01	1256.37	1446.96	2703.33	3227.89	65.45

[2] भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने (मार्च 2021) प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेसाठी एकल नोडल अभिकरणाद्वारे निधी वितरित करणे आणि त्यांच्या वापरावर लक्ष ठेवणे अनिवार्य केले आहे. प्रत्येक एकल नोडल अभिकरणाचे अधिकृत शेड्युल्ड वाणिज्य बँकेत समर्पित बँक खाते असणे आवश्यक आहे. प्राप्त झालेला केंद्राचा हिस्सा, संबंधित राज्य शासनांच्या हिश्श्यासह संबंधित राज्य शासनाच्या खात्यात हस्तांतरित करणे आवश्यक आहे

भारत सरकार योजना	राज्य योजना	राज्य कोषा गाराला भारत सरकारने वितरित केले	राज्याचा प्रमाणा तील हिस्सा	कोषागारा कडुन एकल नोडल अभिकरणास केंद्राचा हिस्सा	कोषागारा कडुन एकल नोडल अभिकरणास राज्याचा हिस्सा	कोषागारा कडुन एकल नोडल अभिकरणास एकूण वितरित केलेले	खर्च	अखर्चित शिल्लक
अभियान यासाठी परिवर्तनशील संकल्प								
सक्षम अंगणवाडी आणि पोषण 2	पौगंडावस्थेतील मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी योजना	1368.84	1537.74	1487.31	1225.35	2712.66	3248.93	307.61
समग्र शिक्षा	समग्र शिक्षा अभियान-संस्कार भारत कार्यक्रम	1126.27	750.85	1128.67	1105.96	2234.63	2475.13	290.63
प्रधान मंत्री पोषण शक्ति निर्माण	इतर महानगरपालिका, नगरपालिकांसाठी शालेय पोषण कार्यक्रम	1054.08	702.72	1054.08	930.51	1984.59	1838.68	369.07

स्रोत: एकल नोडल अभिकरण 01 अहवाल

एकल नोडल अभिकरण यंत्रणेद्वारे संचालित केंद्र पुरस्कृत योजना वितरण आणि वापर यांच्यातील लक्षणीय विसंगती दर्शवितात, परिणामी वर्षाच्या शेवटी मोठ्या प्रमाणात अखर्चित शिल्लक राहते.

- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत, राज्य कोषागारातून एकल नोडल अभिकरणाला वितरित करण्यात आलेल्या एकूण ₹ 8,100.97 कोटी पैकी खर्च ₹ 5,220.88 कोटी होता, ज्यायोगे ₹ 4,107.69 कोटी इतकी मोठी अखर्चित शिल्लक राहिली, जी केंद्र आणि राज्य हिस्से पूर्ण हस्तांतरण करूनही कमकुवत शोषण क्षमता दर्शवते.
- राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या बाबतीत (प्रजोत्पत्ती व बाल आरोग्य आणि आरोग्य प्रणाली बळकट करण्यासाठी परिवर्तनशील पूल) वर्षभरात खर्च करण्यात आलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च झाला, तरीही अखर्चित शिल्लक ₹ 65.45 कोटी

होती, जी पूर्वीच्या शिल्लकी पुढे नेल्याचे दर्शविते आणि एकल नोडल अभिकरण स्तरावर अपुरे निधी व्यवस्थापन दर्शविते.

- सक्षम अंगणवाडी आणि पोषण 2 साठी, वितरित केलेल्या ₹ 2,712.66 कोटीपैकी ₹ 3,248.93 कोटी खर्च झाला, तर ₹ 307.67 कोटी अखर्चित शिल्लक राहिली, जी मागील वर्षांच्या संचित शिलकीच्या उपलब्धतेकडे लक्ष वेधते.
- समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत, झालेला खर्च (₹ 2,475.13 कोटी) चालू वर्षाच्या वितरणापेक्षा (₹ 2,234.63 कोटी) पेक्षा जास्त झाला, ज्यामध्ये ₹ 290.63 कोटींची अखर्चित शिल्लक होती, जी पूर्वीच्या कालावधीतील निधीचा उपयोग तसेच अपूर्ण आहरण दर्शवते.
- प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माणमध्ये, वितरित केलेल्या ₹ 1,984.59 कोटी तुलनेत ₹ 1,838.68 कोटी खर्च करूनही, वर्ष अखेरीस अखर्चित शिल्लक ₹ 369.07 कोटी होती.

वरील विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की एकल नोडल अभिकरण चौकटीद्वारे राबविण्यात येणाऱ्या अनेक केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत, राज्य कोषागारातून देण्यात आलेला निधी पूर्णपणे वापरला गेला नाही, परिणामी वर्षअखेरीस मोठ्या प्रमाणात अखर्चित शिल्लक राहिली. काही योजनांमध्ये, खर्च चालू वर्षात वितरित केलेल्या निधीपेक्षा अधिक होता, ज्याचा अर्थ मागील वर्षांच्या संचित शिलकीचा वापर होऊन शिल्लक अखर्चित असणे कायम राहते.

अनुदान वाय-02 मध्ये महाराष्ट्रातील जल जीवन अभियान आणि स्वच्छ भारत अभियान-ग्रामीण या दोन केंद्र पुरस्कृत योजना आहेत, या योजनांचा तपशील एकल नोडल अभिकरण-01 अहवालात दिसून आला, जो केंद्र आणि राज्याचा हिस्सा, वास्तविक खर्च आणि न खर्च केलेली शिल्लक यांच्यातील लक्षणीय असमतोल दर्शवितो.

जल जीवन अभियान अंतर्गत, भारत सरकारने ₹ 1,605.88 कोटी मुक्त केले, जे पूर्णपणे थेट एकल नोडल अभिकरण तृतीय पक्ष खात्यात (एस्क्रो) जमा केले गेले, ज्यामध्ये केंद्र आणि राज्य यांच्यात हिश्श्याचे गुणोत्तर 50:50 निर्धारित केले गेले. या तुलनेत, राज्य कोषागारातून एकल नोडल अभिकरणाला एकूण ₹ 4,051.99 कोटी वितरित करण्यात आले, तर प्रत्यक्ष खर्च ₹ 5,894.79 कोटी झाला, जो मागील वर्षांच्या भरीव संचित रकमेचा वापर दर्शवतो. तसेच, अखर्चित ₹ 1,987.33 कोटीची मोठी रक्कम 31 मार्च 2025पर्यंत एकल नोडल अभिकरणाच्या बँक खात्यात शिल्लक होती. यावरून राज्याच्या एकत्रित निधीच्या बाहेर निधीची सतत साठवणूक आणि निधी वितरण, खर्चाचे नियोजन आणि वापर यातील कमकुवत संरेखन दिसून येते.

स्वच्छ भारत अभियान-ग्रामीणच्या संदर्भात, केंद्र आणि राज्य यांच्यात 60:40 च्या हिश्श्याच्या गुणोत्तरासह भारत सरकारने राज्य कोषागाराला ₹ 115.82 कोटी वितरित केले. प्रमाणबद्ध आवश्यकतेच्या तुलनेत, कोषागारामधून एकल नोडल अभिकरणाला

वितरित केलेला केंद्राचा हिस्सा ₹ 89.71 कोटी होता, तर राज्याचा हिस्सा ₹ 59.80 कोटी होता, परिणामी कोषागाराने एकल नोडल अभिकरणाला एकूण ₹ 149.52 कोटी वितरित केले. झालेला प्रत्यक्ष खर्च ₹ 262.31 कोटी होता, त्यापैकी ₹ 223.88 कोटी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे आणि ₹ 38.42 कोटी थेट लाभ हस्तांतरण प्रदानाद्वारे झाले, जे पुन्हा आधीच्या कालावधीतील शिलकीचा वापर दर्शवितात. तथापि, वर्ष अखेरीस एकल नोडल अभिकरण खात्यात ₹ 4.14 कोटीची अखर्चित शिल्लक आहे.

महाराष्ट्र शासनाने जुलै 2025 पासून केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधीचे व्यवस्थापन आणि वितरण करण्यासाठी औपचारिकपणे एकल नोडल अभिकरण-स्पर्श प्रणाली स्वीकारली आहे. विविध योजनांसाठी योग्य एकल नोडल अभिकरण आणि राज्य योजना व्यवस्थापक नियुक्त केले आहेत आणि आरबीआय ई-कुबेर खात्यांचा वापर करून नवीन निधी हस्तांतरण यंत्रणा स्थापित केली जात आहे.

2.6.1 एकल नोडल अभिकरण

भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेसाठी एकल नोडल अभिकरणाद्वारे निधी वितरित करणे आणि त्यांच्या वापरावर लक्ष ठेवणे अनिवार्य केले आहे (मार्च 2021). प्रत्येक एकल नोडल अभिकरणाचे अधिकृत शेड्युल्ड वाणिज्य बँकेत समर्पित बँक खाते असणे आवश्यक आहे. प्राप्त झालेला केंद्राचा हिस्सा, संबंधित राज्याच्या हिश्श्यासह संबंधित राज्य शासनाच्या लेख्यात वर्ग करणे आवश्यक आहे.

लेखापरीक्षणाने प्रमाणक स्तरीय संकलन (व्हीएलसी) विदा आणि एकल नोडल अभिकरण, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली अहवालाचे विश्लेषण केले आणि असे निदर्शनास आले की **तक्ता 2.15** मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकल नोडल अभिकरण खात्यांमध्ये केंद्र आणि राज्य हिस्सा हस्तांतरणाच्या विदामध्ये विसंगती होती.

तक्ता 2.15: केंद्र आणि राज्य हिस्सा हस्तांतरणामध्ये विसंगती

(₹ कोटीत)

विदा स्त्रोत	केंद्राचा प्राप्त हिस्सा	केंद्राचा हस्तांतरित हिस्सा	राज्याचा हस्तांतरित हिस्सा	राज्याने कमी वितरित केलेली रक्कम
व्हिएलसी	21061.18	19140.82	14434.98	1920.36
एकल नोडल अभिकरण सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली अहवाल	18501.60	16546.00	17013.22	1955.60
फरकाची रक्कम	**2559.58**	**2594.82**	**2578.24**	**35.24**
स्रोत: वित्तीय लेखे				

राज्य शासन/एकल नोडल अभिकरण 01 च्या अहवालानुसार, राज्य शासनाला त्यांच्या कोषागार खात्यात केंद्राचा हिस्सा म्हणून ₹ 18,501.60 कोटी प्राप्त झाले. 31 मार्च 2025 पर्यंत, शासनाने केंद्राचा हिस्सा ₹ 16,546.60 कोटी आणि राज्याचा

हिस्सा ₹ 17,013.22 कोटी एकल नोडल अभिकरणाकडे हस्तांतरित केले. संपूर्ण ₹ 33,559.82 कोटी रक्कम सहायक अनुदान देयकांद्वारे हस्तांतरित करण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्चाची तपशीलवार प्रमाणके आणि समर्थन दस्तऐवज/कागदपत्रे प्रधान महालेखाकार कार्यालयाला एकल नोडल अभिकरणाकडून प्राप्त झाले नाहीत. एकल नोडल अभिकरणाच्या अहवालानुसार, 31 मार्च 2025 पर्यंत एकल नोडल अभिकरणाच्या बँक खात्यांमध्ये एकूण ₹ 12,843.07 कोटी अखर्चित पडून आहेत.

2.6.2 एकल नोडल अभिकरण-स्पर्श

केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत वितरित करण्यात आलेल्या निधीची उपलब्धता आणि वापर यावरील देखरेख वाढविण्यासाठी, व्यय विभागाने निधी ओघ प्रक्रियेसाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे सादर केली. केंद्र आणि राज्य या दोन्ही पातळ्यांवर अधिक कार्यक्षम रोख व्यवस्थापन सुनिश्चित करून, प्रदानासाठी "अगदी वेळेवर वितरण" (जस्ट-इन-टाइम रिलीझ)' या तत्त्वाची अंमलबजावणी करणे हे या मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, केंद्र पुरस्कृत योजना निधीच्या एकात्मिक आणि जलद हस्तांतरणासाठी एक वास्तविक -वेळ प्रणाली, एकल नोडल अभिकरण-स्पर्श ही पर्यायी निधी ओघ यंत्रणा सुरू करण्यात आली. ही प्रणाली सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली, राज्य एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन माहिती प्रणाली आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर यांना एकत्रित करून कार्यक्षम आणि पारदर्शक निधी वितरण सुलभ करते.

अर्थ मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या सुधारित प्रक्रियेनुसार, राज्य शासनांनी निधीचा केंद्र व राज्य हिस्सा दोन्हीला एकल नोडल अभिकरण-स्पर्श मॉडेल अंतर्गत एकल नोडल अभिकरण खात्यात निधी हस्तांतरित करणे आवश्यक आहे. एकल नोडल अभिकरण-स्पर्श मॉडेल अंतर्गत, प्रत्येक राज्याने केंद्र पुरस्कृत योजनेशी संबंधित प्रत्येक राज्य-संलग्न योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकल नोडल अभिकरण नियुक्त करणे आवश्यक आहे आणि सर्व निधी केवळ सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे वितरित केला जाईल. हे सक्षम झाल्यावर विद्यमान एकल नोडल अभिकरण खाती बंद करून अखर्चित शिल्लक भारताच्या एकत्रित निधीमध्ये केंद्राचा हिस्सा आणि राज्याचा हिस्सा संबंधित राज्य एकत्रित निधीमध्ये वर्ग करणे आवश्यक आहे. तसेच, सर्व एकल नोडल अभिकरण आणि अंमलबजावणी अभिकरण राज्य एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन माहिती प्रणाली मध्ये नोंदणीकृत असणे आवश्यक आहे आणि स्वीय ठेव खाती किंवा इतर मध्यस्थ खात्यांद्वारे मार्गी न लावता थेट लाभार्थी किंवा विक्रेत्यांना वेळेवर निधी वितरित केला जावा, ज्यामुळे सुधारित रोख व्यवस्थापन आणि पारदर्शकतेला चालना मिळेल.

महाराष्ट्र शासन जुलै 2025 पासून एकल नोडल अभिकरणा स्पर्शची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेत आहे.

2.7 आकस्मिक निधी

मुंबई आकस्मिक निधी अधिनियम, 1956 अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या आकस्मिक निधीची स्थापना करण्यात आली आणि राज्य शासनाने महाराष्ट्र आकस्मिक निधी अधिनियम, 1956 तयार केले. आकस्मिक खर्चाची पूर्तता करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या आकस्मिक निधीतून पैसे काढणे आणि त्याच्या प्रदानाची जबाबदारी घेण्याशी संबंधित सर्व बाबींचे नियमन करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र आकस्मिक निधी नियम, 1956 तयार केले. राज्य विधिमंडळाने अतिरिक्त खर्चास अधिकृत केल्यावर निधी वळता केला जातो. या निधीचा संग्रह ₹ 150 कोटी असतो.

2.7.1 आकस्मिक निधीमधून अग्रिमे

आकस्मिक निधीतून केवळ अनपेक्षित व आकस्मिक स्वरूपाच्या खर्चासाठी अग्रिमे दिली जातात, विधिमंडळाकडून त्याची परवानगी मिळेपर्यंत ती पुढे ढकलणे इष्ट नसते.

वित्तीय वर्ष 2024-25 दरम्यान, योजना/कार्यक्रमांच्या संदर्भात आकस्मिक निधीतून कोणतीही रक्कम आगाऊ रक्कम म्हणून काढण्यात आली नव्हती.

2.8 निष्कर्ष

- 2024-25 मधील राज्याच्या अर्थसंकल्पीय कामगिरीवरून वास्तववादी अर्थसंकल्प आणि खर्च नियंत्रणातील निरंतर कमतरता दिसून येतात. ₹ 8,29,831.20 कोटीच्या एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत राज्याने 297 अनुदाने आणि विनियोजनांत ₹ 6,61,548.43 कोटी खर्च केले, परिणामी एकूण ₹ 1,68,282.77 कोटीची (20.28 *टक्के*) बचत झाली. बचतीच्या तुलनेत दोन अनुदाने आणि चार भारित विनियोजनांत ₹ 763.05 कोटी अतिरिक्त खर्च झाला, ज्यासाठी भारतीय संविधानाच्या कलम 205 अंतर्गत नियमितीकरण आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, 2017-18 ते 2023-24 या कालावधीसाठी 61 अनुदाने आणि 19 विनियोजाने यांच्या संदर्भात ₹ 3025.76 कोटीचा अतिरिक्त खर्च मार्च 2025 पर्यंत नियमितीकरणासाठी प्रलंबित राहिला.

- तसेच, ₹ 1,37,163.68 कोटीची पुरवणी तरतूद, जी मूळ तरतुदींच्या 19.80 *टक्के* होती, अनावश्यक ठरली, कारण ₹ 6,61,548.43 कोटीचा प्रत्यक्ष खर्च मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीपर्यंतही पोहोचला नाही.

- 2024-25 मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अर्थसंकल्पीय अंदाज, खर्च नियंत्रण आणि आर्थिक व्यवस्थापनात लक्षणीय त्रुटी दिसून आल्या. एकूण ₹ 29,693.09 कोटींच्या अनुदानापैकी, विभागाने ₹ 33,237.24 कोटी इतका खर्च केला, परिणामी ₹ 3,541.16 कोटींचा अतिरिक्त खर्च झाला, जो अन्यायकारक राहिला. तसेच, वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत ₹ 15,586 कोटी आहरीत करण्यात आले आणि त्याचा त्वरित वापर न करता आभासी स्वीय ठेवी लेख्यांत त्याचे हस्तांतरण, निधीची तरतूद आणि खर्चाची

आवश्यकता लक्षात न घेता आहरण दर्शवते. अशा पद्धती अर्थसंकल्पीय शिस्त, आर्थिक औचित्य आणि सार्वजनिक वित्तावर कायदेशीर नियंत्रण या तत्वांना कमकुवत करतात.

2.9 चांगला प्रघात

- राज्य शासनाने 2024-25 दरम्यान राज्य आकस्मिक निधीतून पैसे काढले नाहीत. यावरून असे दिसून येते की मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये अनपेक्षित किंवा आपत्कालीन खर्चाचे प्रभावीपणे व्यवस्थापन केले गेले.
- गेल्या पाच वर्षांत (2021-25) कोणत्याही अनुदानाखाली सतत अतिरिक्त खर्च झाला नाही. यावरून अर्थसंकल्पीय नियंत्रणांचे पालन आणि प्रभावी खर्च व्यवस्थापन दिसून येते.

2.10 शिफारशी

i. अर्थसंकल्पाची योग्य अंमलबजावणी आणि देखरेखीची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने योग्य नियंत्रण यंत्रणा स्थापित करणे आवश्यक आहे, जेणेकरून बचत कमी होईल, अनुदान/विनियोजन मधील मोठ्या बचतीवर नियंत्रण ठेवले जाईल आणि अपेक्षित बचत ओळखली जाईल आणि विशिष्ट मुदतीत प्रत्यार्पित केली जाईल.

ii. अर्थसंकल्पातील तरतुदीपेक्षा अतिरिक्त खर्चाच्या आणि प्रलंबित नियमितीकरणाच्या सर्व प्रकरणांना प्राधान्य दिले जावे.

iii. मोठ्या थेट लाभ हस्तांतरण योजनांसाठी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना विभागाने लाभार्थी व्याप्ती आणि निधीच्या आवश्यकतेचे वास्तववादी निर्धारण सुनिश्चित करणे आवश्यक आहे, जेणेकरून अतिरिक्त खर्च आणि पूरक मागण्या टाळता येतील. निधी आहरीत करणे हे वास्तविक आणि त्वरित खर्चाच्या गरजांशी काटेकोरपणे जोडलेले असून आर्थिक नियमांचे पालन करून आभासी स्वीय ठेवी लेख्यांच्या किंवा तत्सम खात्यांमध्ये निधी जमा करणे टाळणे आवश्यक आहे.

प्रकरण III

वित्तीय प्रतिवेदन पद्धती

प्रकरण III: वित्तीय प्रतिवेदन पद्धती

हे प्रकरण राज्य शासनाच्या विविध प्राधिकरणांद्वारे सादर केलेल्या राज्य शासकीय लेख्यांची गुणवत्ता आणि विहित वित्तीय नियम, कार्यपद्धती आणि निर्देशांचे पालन करण्याच्या स्थितीबद्दल व्यापक दृष्टीकोन प्रदान करते.

वित्तीय नियम, कार्यपद्धती आणि निर्देशांचे पालन तसेच अशा अनुपालनाच्या स्थितीवरील अहवालाची पूर्णता, समयबद्धता आणि गुणवत्ता वित्तीय अहवालांमध्ये सादर केलेल्या माहितीची प्रासंगिकता आणि विश्वासार्हता वाढविते.

लेख्यांच्या पूर्णतेशी संबंधित समस्या

3.1 शासनाच्या मालकीच्या सार्वजनिक उपक्रम/प्राधिकरणांद्वारे अर्थसंकल्पबाह्य कर्जे

अर्थसंकल्पबाह्य कर्ज म्हणजे राज्य सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या, विशेष उद्देश वाहने आणि इतर समतुल्य साधनांद्वारे घेतलेले कर्ज, जिथे मुद्दल आणि/किंवा व्याज राज्याच्या अर्थसंकल्पातून दिले जाते. अशा प्रकारे, कर्ज सेवा अर्थसंकल्पाद्वारे केली जाते परंतु सरकारी मालकीच्या कंपन्या/वैधानिक संस्थांद्वारे कर्ज तरतुदीच्या बाहेर दिले जाते. अशा कर्जांचा महसुली तूट आणि राजकोषीय तूट यावर परिणाम होतो आणि त्यामुळे राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिनियमांतर्गत राजकोषीय निर्देशकांसाठी निश्चित केलेल्या उद्दिष्टांपेक्षा जास्त परिणाम होतो. भारतीय संविधानाच्या कलम 293(3) नुसार, राज्य शासनाच्या कर्जासाठी भारत सरकारची संमती अनिवार्य आहे जर भारत सरकारकडून कोणतेही थकीत कर्ज किंवा हमी असेल. शिवाय, पंधराव्या वित्त आयोगाने शिफारस केली आहे की 2023-24 ते 2025-26 या कालावधीसाठी राज्य शासनांना सामान्य निव्वळ कर्ज मर्यादा स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन *टक्के* निश्चित केली जाऊ शकते.

विविध राज्य शासकीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/महामंडळे/इतर संस्थांना अर्थसंकल्पीय तरतुदीबाहेर कर्जाद्वारे निश्चित केलेल्या निव्वळ कर्ज मर्यादेला उल्लंघून अशा कर्जांच्या परतफेडीची जबाबदारी राज्य शासनावर असून, वित्तीय आरोग्य आणि शासकीय वित्तव्यवस्थेतील पारदर्शकतेला मोठा धोका निर्माण होतो. राज्य शासनाने वित्तीय वर्षासाठी कर्ज घेण्याची मर्यादा आता भारत सरकारकडून अर्थसंकल्पबाह्य कर्जाच्या प्रमाणात कमी केली जात आहे.

महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिनियम, 2004 मध्ये असे नमूद केले आहे की राज्य शासन सार्वजनिक हितासाठी त्यांच्या वित्तीय कामकाजात अधिक पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी योग्य उपाययोजना करेल आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, विशेष उद्देश वाहने आणि इतर समतुल्य साधनांद्वारे

अर्थसंकल्पाबाह्य कर्जांमधून उद्‌भवणाऱ्या प्रत्यक्ष दायित्वांचा खुलासा करेल जिथे परतफेडीची जबाबदारी राज्य शासनाच्या वाटपांवर आहे. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा आणि नियम (2006, 2008 मध्ये सुधारित) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, राज्य शासनाने त्या विशिष्ट वर्षाच्या मध्यम-मुदतीच्या राजकोषीय धोरण विवरणपत्राच्या फॉर्म बी-6 मध्ये अर्थसंकल्पबाह्य दायित्वांसह त्यांच्या दायित्वांचे संपूर्ण प्रकटीकरण करणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पीय दस्तावेजांसह विधिमंडळासमोर सादर केलेल्या रकमेत महसुली तूट, राजकोषीय तूट आणि राज्य शासनाच्या एकूण थकित कर्जासंदर्भात पाच वर्षांचे बदलते लक्ष्य समाविष्ट असेल.

2024-25 या वर्षासाठी, मध्यम-मुदतीच्या राजकोषीय धोरण विवरणपत्राच्या अंतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या 18.47 *टक्के* आणि महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिनियमांतर्गत 25 *टक्क्यांपेक्षा* कमी कर्जाचा साठा करण्याचे उद्‌दिष्ट ठेवण्यात आले होते. याशिवाय, भारत सरकारने 2024-25 मध्ये राज्यासाठी ₹ 1,17,238 कोटी (स्थूल राज्य उत्पन्नाच्या 2.59 *टक्के*) कर्ज घेण्याची मर्यादा निश्चित केली होती.

राज्य शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात त्यांच्या अर्थसंकल्पीय कर्जाचा तपशील दिला नाही. याशिवाय, राज्य शासनाने दिलेल्या माहितीनुसार/अर्थसंकल्पातील खुलाशानुसार, 31 मार्च 2025 पर्यंत, ₹ 23,010 कोटींचे कर्ज थकीत होते, त्यात 2023-24 मध्ये घेतलेल्या ₹ 13,000 कोटीच्या[1] कर्जाचा समावेश होता.

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी दिलेल्या माहितीनुसार राज्य शासनाच्या वतीने दोन संस्थांनी 31 मार्च 2025 पर्यंत ₹ 28,640 कोटींचे अर्थसंकल्पीय कर्ज घेतले होते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने भूसंपादनाच्या कामांसाठी गृहनिर्माण आणि शहरी विकास महामंडळाकडून ₹ 11,140 कोटींचे कर्ज घेतले होते, त्यापैकी ₹ 10,825 कोटी थकीत होते. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ बोगदा मर्यादितने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाकडून प्रामुख्याने भूसंपादन आणि संबंधित कामांसाठी ₹ 17,500 कोटी घेतले आणि संपूर्ण रक्कम 31 मार्च 2025 पर्यंत थकीत राहिली. ही कर्जे जरी शासकीय लेख्यांच्या बाहेर उभारली गेली असली तरी राज्य शासनावर ₹ 28,325 कोटींची दायित्वे निर्माण झाली. 31 मार्च 2025 रोजी अर्थसंकल्पबाह्य कर्जाचे तपशील खालील **तक्ता 3.1** मध्ये तपशीलवार दिले आहेत.

[1] मध्यम-मुदतीच्या राजकोषीय धोरण विधान 2025-26 नुसार, 2024-25 मध्ये उभारलेले अर्थसंकल्पबाह्य कर्ज ₹ 23,200 कोटी दर्शवण्यात आले आहे, ज्यामध्ये 2023-24 मध्ये उभारलेल्या ₹ 1300 कोटी रकमेचा समावेश आहे, जी मध्यम-मुदतीच्या राजकोषीय धोरण विधान 2024-25 मध्ये उघड करण्यात आली नव्हती आणि महाराष्ट्र शासनाच्या 2023-24 वर्षासाठी राज्याच्या वित्तव्यवस्थेवरील भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या अहवालात ती निदर्शनास आणून देण्यात आली हो.

तक्ता 3.1: 31 मार्च 2025 रोजी अर्थसंकल्पबाह्य कर्जाचा तपशील

(₹ कोटीत)

शासनाच्या वतीने कर्ज घेतलेल्या संस्था	कर्ज देणारी वित्तीय संस्था	मंजूर कर्ज	31 मार्च 2025 पर्यंत वितरीत केलेले कर्ज	कर्जाचा उद्देश	31 मार्च 2025 रोजी थकीत कर्ज
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित	गृहनिर्माण आणि शहरी विकास महामंडळ मर्यादित	11140	11140	भूसंपादन	10825
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ बोगदे मर्यादित	ग्रामीण विद्युतीकरण कंपनी मर्यादित	17500	17500	भूसंपादन आणि इतर	17500
		28640	28640		28325
स्रोत: सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी सादर केलेली माहिती					

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतलेल्या कर्जावरील ₹ 2,089.48 कोटी (2024-25 मध्ये ₹ 1456.48 कोटी आणि 2023-24 मध्ये ₹ 633 कोटी) आणि ₹ 315 कोटी (2024-25 मध्ये ₹ 250 कोटी आणि 2023-24 मध्ये ₹ 65 कोटी) व्याज राज्य शासनाने फेडले. ही परतफेड प्रधान शीर्ष 5054 - रस्ते आणि पुलांवरील भांडवली खर्चाच्या अंतर्गत नोंदविण्यात आली, परिणामी भांडवली खर्चाची अत्योक्ती झाली, कारण या प्रदानांमुळे कोणतीही भांडवली मालमत्ता निर्माण झाली नाही. 31 मार्च 2025 रोजी व्याज भरण्यासाठी आणि मुद्दलाची परतफेड करण्यासाठी सहाय्याचे तपशील **तक्ता 3.2** मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 3.2: 31 मार्च 2025 रोजी व्याज प्रदानासाठी आणि मुद्दलाची परतफेड करण्यासाठी सहाय्याचा तपशील

(₹ कोटीत)

अनु.क्र.	संस्थांचे नाव	व्याजाची रक्कम भरण्यासाठी सहाय्य	मुद्दल रकमेची परतफेड करण्यासाठी सहाय्य
1	महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ - गृहनिर्माण आणि शहरी विकास महामंडळ	714.51	315
2	महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ - ग्रामीण विद्युतीकरण कंपनी मर्यादित	1374.97	0
स्रोत: सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी सादर केलेली माहिती			

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडून प्राप्त झालेली माहिती आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या तपशीलानुसार 2020- 21 ते 2024-25 या कालावधीत थकीत अर्थसंकल्पबाह्य कर्जाचा तपशील **तक्ता 3.3** मध्ये दर्शविला आहे.


तक्ता 3.3: 2020-21 ते 2024-25 या कालावधीत थकीत अर्थसंकल्पबाह्य कर्जाचा तपशील

(₹ कोटीत)

वर्ष	आरंभीची शिल्लक	अर्थसंकल्पबाह्य कर्ज वितरित केले	राज्याच्या अर्थसंकल्पातून मुद्दलाची परतफेड	अखेरची शिल्लक
2020-21	51	0	31	20
2021-22	20	0	0	20
2022-23	20	2500	20	2500
2023-24	2500	7700	65	10135
2024-25	10135	18440	250	28325
स्त्रोत: वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिलेली माहिती				

एकूण थकीत अर्थसंकल्पबाह्य कर्जाची देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार **आलेख 3.1** मध्ये दर्शविली आहे

आलेख: 3.1 31 मार्च 2025 मध्ये देशांतर्गत स्थूल राज्य उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार थकबाकी कर्ज



स्रोत: महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिलेली माहिती

अर्थसंकल्पबाह्य कर्जातील तीव्र वाढ ही अर्थसंकल्पीय चौकटीला बगल देऊन अर्थसंकल्पबाह्य संसाधनांवर वाढलेले अवलंबित्व दर्शवते. अशी कर्जे,जरी शासनाने कर्ज सेवा दिली असली तरी अर्थसंकल्पात पारदर्शकपणे जाहीर केली जात नाही, त्यामुळे वित्तीय तूट आणि कर्जाची स्थिती अधोरेखित केली जाते.

ही पद्धत महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमात नमूद केलेल्या वित्तीय पारदर्शकतेच्या तत्वांशी विसंगत आहे आणि कथित वित्तीय निर्देशकांच्या विश्वासार्हतेशी तडजोड करते.

3.2 शासनाची अपूर्ण दायित्वे

नियुक्त संस्थांना एकत्रित केलेला उपकर हस्तांतरित न करणे किंवा राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये अल्प प्रेषण इत्यादीसारख्या अपूर्ण दायित्वांचे दीर्घकालीन वित्तीय आणि प्रशासनावर लक्षणीय परिणाम होऊ शकतात. या न फेडलेल्या जबाबदाऱ्या कालांतराने साचत जातात, ज्यामुळे लपलेल्या जबाबदाऱ्या निर्माण होतात ज्या राज्याच्या खऱ्या वित्तीय स्थितीला विकृत करतात. शिवाय, उपकर हस्तांतरणातील विलंबामुळे अपेक्षित विकास किंवा कल्याणकारी परिणामांना अडथळा येतो, ज्यामुळे अशा शुल्क आकारले

गेलेल्या उद्देशाला अपयश येते. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये अल्प हस्तांतरण केवळ वैधानिक वचनबद्धतेचे उल्लंघन करत नाही तर कर्मचाऱ्यांच्या वित्तीय सुरक्षेशीही तडजोड करते. वर्षानुवर्षे अशा पद्धती विश्वास कमी करू शकतात, कायदेशीर दायित्वे वाढवू शकतात आणि भविष्यातील खर्चाची जबाबदारी वाढवू शकतात, ज्यामुळे वित्तीय कक्षेवर मर्यादा येते आणि वित्तीय स्थिरता कमकुवत होते. अशा प्रकरणांची पुढील परिच्छेदात चर्चा केली आहे.

3.2.1 न फेडलेली व्याज दायित्वे

व्याजयुक्त ठेवी/राखीव निधीतील रकमेवर व्याज तरतूद करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, **तक्ता 3.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 1 एप्रिल 2024 पर्यंत व्याजयुक्त ठेवी/राखीव निधीअंतर्गत असलेल्या ₹ 11,703.01 कोटीच्या शिल्लक रकमेवर ₹ 762.49 कोटी व्याज म्हणून देणे आवश्यक होते. व्याज दायित्वाचा भरणा न केल्यामुळे महसुली तूट आणि वित्तीय तूट यांची उनोक्ती झाली.

तक्ता 3.4: व्याज देणाऱ्या रकमेच्या बाबतीत न भरलेल्या व्याज दायित्वाचे तपशील ठेवी/राखीव निधी

(₹ कोटीत)

अनु. क्र.	व्याज देणाऱ्या ठेवीचे नाव/ शीर्ष	1 एप्रिल 2024 रोजी आरंभीची शिल्लक	व्याज गणनेसाठी आधार	तरतूद नसलेली व्याजाची रक्कम
1.	शासकीय कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना	4,405.73	सामान्य भविष्य निर्वाह निधीवरील देय व्याज दरानुसार केलेली व्याजाची गणना (म्हणजेच 7.10 *टक्के*).	233.24
2.	राज्य प्रतिपूरक वनीकरण निधी	3,033.72	वर्ष 2024-25 साठी पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार 3.35 *टक्के*	106.69
3.	राज्य आपत्ती प्रतिसाद निधी/ राज्य आपत्ती शमन निधी	3,702.34	राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अधिकर्षासाठी लागू सरासरी रेपो दर अधिक (+) दोन *टक्के* (म्हणजेच 8.46 *टक्के*) यानुसार व्याजाची परिगणना केली.	409.37
4.	व्याज देणाऱ्या इतर ठेवी	561.22	वर्ष 2024-25 साठी व्याजाची परिगणना 14 दिवसांच्या कोषागार देयक गुंतवणुकीसाठी लागू होणाऱ्या दराने म्हणजेच रिव्हर्स रेपो दर - 3.35 *टक्के* वजा एक *टक्का* म्हणजे 2.35 *टक्के* दराने व्याजाची परिगणना केली.	13.19
एकूण		**11,703.01**		**762.49**

स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25

व्याजासहित असलेल्या ठेवींवर - जसे की परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना, राज्य प्रतिपूरक वनीकरण निधी, राज्य आपत्ती प्रतिसाद/शमन निधी आणि इतर व्याजसहित असलेल्या ठेवी - ₹ 762.49 कोटी व्याजदराची तरतूद न केल्याने महसुली खर्च कमी दाखवण्यात आला आणि लोकलेख्यांतील शिल्लक रकमेचे प्रमाण जास्त दर्शविण्यात आले, ज्यामुळे राज्याची खरी वित्तीय स्थिती विस्कळीत झाली. **तक्ता 3.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2024-25 दरम्यान ₹ 11,703.01 कोटीच्या प्रारंभिक शिल्लक असलेल्या ठेवींवर हे अपरिचित दायित्व निर्माण झाले, ज्यामध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद/शमन निधीशी संबंधित सर्वात मोठे न भरलेले व्याज (₹ 409.37 कोटी) होते, त्यानंतर परिभाषित अंशदान निवृत्ती योजना (₹ 233.24 कोटी) होते. अनेक निधींमध्ये अशा गैर-तरतुदीची पुनरावृत्ती लेखा आणि तरतूदी पद्धतींमधील पद्धतशीर तफावत दर्शवते आणि संचयित व्याजाची वेळेवर ओळख आणि अंदाजपत्रक तयार करण्याची गरज अधोरेखित करते.

3.2.2 राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणालीमध्ये अल्प योगदान

नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाने सेवेत भरती होणाऱ्या सर्व नवीन कर्मचाऱ्यांना लागू असलेली 'राष्ट्रीय निवृत्तीवेतनप्रणाली' शासनाने सुरू केली. हे योगदान सुरुवातीला लोकलेख्यांत हस्तांतरित केले जाते (प्रधान शीर्ष '8342- 117-परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतनयोजना' राष्ट्रीय निवृत्तीवेतनप्रणालीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुढील गुंतवणूकीसाठी नियुक्त प्राधिकरणाकडे म्हणजेच राष्ट्रीय सुरक्षा ठेवी मर्यादित/न्यास बँकेकडे कर्मचारी आणि नियोक्त्याचे दोन्ही हिस्से जमा करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. राज्य शासन राष्ट्रीय सुरक्षा ठेवी मर्यादितमध्ये निधी हस्तांतरित करण्यापूर्वी निधी साठविण्यासाठी विश्वस्त बँकेत चालू खाते उघडते.

महाराष्ट्र शासनाने (ऑक्टोबर 2005) राष्ट्रीय निवृत्तीवेतनप्रणाली रचना स्वीकारली आणि 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर भरती झालेल्या राज्य शासन कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतनयोजना लागू केली. मान्यताप्राप्त आणि अनुदानित शैक्षणिक संस्था, बिगर-कृषी विद्यापीठे आणि संलग्न अशासकीय महाविद्यालये आणि कृषी विद्यापीठे, जिल्हा परिषदा इत्यादींच्या सेवांमध्ये भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना देखील परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतनयोजना लागू होते ज्यांच्यासाठी विद्यमान निवृत्तीवेतन योजना आणि सामान्य भविष्य निर्वाह निधी योजना लागू होती.

राज्य शासन, जिल्हा परिषद, मान्यताप्राप्त आणि अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी/बिगर-कृषी विद्यापीठे आणि संलग्न अशासकीय महाविद्यालये, जलसंपदा विभागांतर्गत महामंडळांमध्ये 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर भरती झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी ऑगस्ट 2014 मध्ये राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तीवेतनप्रणाली लागू केली. या योजनेनुसार कर्मचारी त्याच्या/तिच्या मूळ वेतन व महागाई भत्त्याच्या 10 *टक्के* अंशदान देतात आणि मूळ वेतन आणि महागई भत्त्याच्या 14 *टक्के* अंशदान राज्य शासनातर्फे दिले जाते. 31 जानेवारी 2019 रोजीच्या वित्त मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार नियोक्त्याचा अंशदान दर 1 एप्रिल 2019 पासून 14 *टक्क्यां*पर्यंत वाढवण्यात आला.

ही संपूर्ण रक्कम राष्ट्रीय सुरक्षा ठेवी मर्यादित/ न्यास बँकेमार्फत नियुक्त निधी व्यवस्थापकाकडे हस्तांतरित केली जाते.

अर्थ मंत्रालय, भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (सप्टेंबर 2008) तात्पुरता उपाय म्हणून प्रधान शीर्ष '8342-117' खाली कोणतेही अंशदान ठेवू नये. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की **परिशिष्ट 3.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 31 मार्च 2025 पर्यंत वरील प्रधान शीर्षाखाली ₹ 3,277.58 कोटी जमा होते.

2024-25 या वर्षात, राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली मध्ये एकूण योगदान ₹ 5,843.20 कोटी होते {कर्मचाऱ्यांचे योगदान ₹ 2,578.43 कोटी (टियर-1 ₹ 2,491.24 कोटी अधिक टियर II ₹ 87.19 कोटी) आणि शासनाचे योगदान ₹ 3,264.77 कोटी}. प्रधान शीर्ष 8342-117 परिभाषित योगदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत लोक लेख्यात ₹ 7,071.02 कोटी हस्तांतरित केले, ज्यामध्ये ₹ 99.67 कोटी व्याजाच्या रकमेचा समावेश आहे. परदेश सेवेतील कर्मचाऱ्यांच्या योगदानापोटी ₹ 65.67 कोटींची रक्कम देखील लोक लेख्यात जमा करण्यात आली. राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली मध्ये शासनाचे योगदान ₹ 222.97 कोटी कमी होते, त्यामुळे महसुली खर्चाचे प्रमाण कमी होते. 31 मार्च 2025 पर्यंत, ₹ 3,277.58 कोटी एकत्रित शिल्लक अद्याप राष्ट्रीय सुरक्षा ठेवी महामंडळ कडे हस्तांतरित व्हायची आहे.

राष्ट्रीय सुरक्षा ठेवी मर्यादितकडे त्वरित हस्तांतरित करण्याऐवजी लोक लेख्यात भरीव राष्ट्रीय निवृत्तीवेतनप्रणाली अंशदान अडवून ठेवल्यास त्याचे अनेक प्रतिकूल परिणाम होतात. याचा परिणाम भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन न करणे, राष्ट्रीय निवृत्तीवेतनप्रणाली संरचनेची अखंडता कमी करणे आणि कर्मचारी आणि सरकारी योगदानाच्या गुंतवणूकीस विलंब करणे, संभाव्यत: ग्राहकांना वेळेवर बाजार-संलग्न परताव्यापासून वंचित ठेवणे. शासनाच्या अंशदानाच्या ₹ 222.97 कोटी अल्प हस्तांतरणामुळे महसुली खर्चाची उनोक्ती झाली, ज्यामुळे राज्याची वित्तीय स्थिती विस्कळीत झाली.

3.2.3 इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर

इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, 1996 च्या कलम 3(1) नुसार आणि 17 जून 2010 रोजी जारी केलेल्या शासकीय निर्णयानुसार, जमिनीची किंमत आणि कामगार भरपाई कायदा, 1923 अंतर्गत देय असलेला कोणतीही भरपाई वगळून, नियोक्ते/बांधकाम व्यावसायिकांनी केलेल्या बांधकाम खर्चाच्या एक *टक्के* दराने कामगार उपकर वसूल करायचा होता. सर्व विभाग, मंडळे, स्वायत्त संस्था आणि स्थानिक प्राधिकरणांना ₹ 10 लाख किंवा त्याहून अधिक किमतीच्या मंजूर निवासी इमारतीच्या योजना असलेल्या व्यक्तींकडूनही सर्व बांधकाम उपक्रमांवर हा उपकर वसूल करण्याचे आणि तो राज्यांच्या इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे जमा करण्याचे निर्देश देण्यात आले. संकलित केलेला उपकर थेट मंडळाच्या खात्यात जमा केला जातो आणि शासकीय लेख्यांमधून मार्गस्थ होत नाही. संकलित केलेला उपकर

राज्यातील बांधकाम कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांसाठी वापरला जातो.

महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, 2023-24 मध्ये वसूल केलेला उपकर ₹ 3808.75 कोटी होता. 2024-25 वर्षाचे हिशेब अद्याप निश्चित झालेले नाहीत. मंडळाने एक निधी तयार केला आहे ज्यामध्ये वसूल केलेला उपकर जमा केला जातो. विभागाने या निधीतून झालेल्या खर्चाचा तपशील आणि 31 मार्च 2025 पर्यंत उपलब्ध शिल्लक रक्कम सादर केलेली नाही.

2024-25 च्या लेख्यांचे अंतिमीकरण न होणे आणि कामगार उपकर निधीच्या वापराबद्दल माहितीचा अभाव यामुळे बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी असलेल्या संसाधनांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणि जबाबदारी यांत कमीपणा येतो .खर्च आणि वर्षअखेरीच्या शिल्लक रकमेबाबत तपशिलांच्या अभावी, (2023-24 दरम्यान संकलित केलेला भरीव उपकर ₹ 3808.75 कोटी) सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांसाठी प्रभावीपणे आणि वेळेवर वापरला गेला की नाही हे निश्चित करता येत नाही. यामुळे कायदेशीर देखरेख कमकुवत होते, निष्क्रिय निधी जमा होण्याचा धोका निर्माण होतो आणि पात्र बांधकाम कामगारांना लाभ मिळण्यास विलंब होऊ शकतो किंवा ते नाकारले जाऊ शकतात.

3.2.4 उपकर हस्तांतरित न करणे

2024-25 या वर्षात, शासनाने ₹ 1,515.23 कोटी (2023-24: ₹ 906.53 कोटी) वसूल केले, जे उपकर (कामगार उपकर वगळता) म्हणून जमा झाले होते, ज्यामध्ये महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962 (सुधारित केल्यानुसार) अंतर्गत ₹ 1,454.43 कोटी इतकी मोठी रक्कम समाविष्ट होती, जी शिक्षणाच्या प्रचारासाठी आणि रोजगार हमी योजनांना वित्तपुरवठा करण्यासाठी निधी निर्माण करण्याकरिता आकारली जाते; महानगरपालिका क्षेत्रातील जमिनी आणि इमारतींवर स्थानिक कर/उपकर म्हणून वसूल केले जाते. एकूण ₹ 1,515.23 कोटीचा महसूल नियुक्त निधीत हस्तांतरित करण्यात आला नाही. राज्य शासनाने प्रधान शीर्ष 8229-00-101 अंतर्गत केवळ शिक्षण व रोजगार हमी (उपकर) कायद्यासाठी नियुक्त निधी तयार केला होता. ₹ 1,515.23 कोटीचा उपकर हस्तांतरित न केल्याने महसूल खर्चाची उनोक्ती झाली.

3.2.5 राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास निधी

राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यासाची स्थापना ऑगस्ट 2015 मध्ये खाण आणि खनिजे (विकास आणि नियमन) - खाण आणि खनिजे (विकास आणि नियमन), अधिनियम, 1957 च्या कलम 9 सी (1) (2015 मध्ये सुधारणा करून समाविष्ट केलेले) अंतर्गत करण्यात आली. अधिनियमाच्या कलम 9 सी (4) मध्ये असे नमूद केले आहे की खाण भाडेपट्टा किंवा खनिज सवलत धारकाने केंद्र शासनाने विहित केलेल्या पद्धतीने दुसऱ्या अनुसूचीनुसार भरलेल्या स्वामित्वधनाच्या दोन *टक्के* समतुल्य रक्कम न्यासाला द्यावी. राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास नियम, 2015 च्या नियम 7 (6) मध्ये असे नमूद केले

आहे की अशा प्रकारे जमा केलेली रक्कम न्यास निधीत जमा करण्याची आणि केंद्र शासनासोबत सामायिक करण्यासाठी आवश्यक खाती ठेवण्याची जबाबदारी राज्य शासनाची असेल. पुढे, नियम 7 (7) मध्ये असे नमूद केले की राज्य शासन अधिनियमाच्या कलम 9 सी च्या उप-कलम (4) नुसार भरलेल्या रकमेची आणि भारतीय खाण मंडळास स्वामित्वधन देयकांची माहिती मासिक आधारावर प्रदान करण्यात येईल.

लेखा प्रक्रियेनुसार, स्वामित्वधन प्राप्त झाल्यानंतर राज्य शासन संपूर्ण जमेचे प्रधान शीर्ष 0853 - 102- प्रमुख खनिज सवलत शुल्क, भाडे आणि स्वामित्वधन अंतर्गत वर्गीकरण करते. त्यानंतर, आवश्यक रक्कम प्रधान शीर्ष 8449 - 123 - राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास अंतर्गत राज्याच्या लोक लेख्यात हस्तांतरित केली जाते. त्यानंतर वेळोवेळी ही रक्कम भारताच्या लोक लेख्यांतर्गत राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यासाकडे हस्तांतरित केली जाते. राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास निधी हा भारताच्या लोक लेख्यांतर्गत तयार केलेला व्यपगत न होणारा व्याज-मुक्त निधी आहे.

2024-25 या वर्षात, प्रधान शीर्ष 8449-इतर ठेवी-123- राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास ठेव अंतर्गत ₹ 63.51 कोटी जमा करण्यात आले. राज्य शासनाने मागील ₹ 28.13 कोटींची शिल्लक रकमेसह ₹ 91.64 कोटी राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यासाकडे हस्तांतरित केले.

राष्ट्रीय स्तरावर खनिज उत्खनन उपक्रमांना वित्तपुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास निधीचे वेळेवर संकलन आणि हस्तांतरण अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रधान शीर्ष 8449-123 अंतर्गत गोळा केलेल्या रकमेच्या राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यासाला हस्तांतरणात कोणताही विलंब किंवा विसंगती झाल्यास मंजूर केलेल्या अन्वेषण प्रकल्पांसाठी निधीची उपलब्धता मर्यादित होऊ शकते आणि केंद्रीय स्तरावरील नियोजनावर परिणाम होऊ शकतो. 2024-25 मध्ये राज्य शासनाने मागील वर्षाच्या शिल्लक रकमेसह ₹ 91.64 कोटी हस्तांतरित केले असले तरी, चालू वर्षाच्या संकलन आणि हस्तांतरणांमधील फरक नियमित सामंजस्य, वेळेवर पैसे पाठवणे आणि राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास नियमांनुसार भारतीय खाण मंडळाला अचूक मासिक अहवाल देण्याची आवश्यकता अधोरेखित करतो.

3.2.6 राज्य खनिज अन्वेषण न्यास /राज्य खनिज विकास निधी

भारत सरकारच्या खाण मंत्रालयाने 19 नोव्हेंबर 2024 रोजीच्या पत्राद्वारे सर्व राज्य शासनांना राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यासाच्या आधारावर राज्य खनिज अन्वेषण न्यास/राज्य खनिज विकास निधी स्थापन करण्याचा सल्ला दिला, जो खाण व खनिज (विनियम व विकास) अधिनियम, 1957 च्या कलम 15 च्या उप-कलम (ए) च्या कलम (जी) अंतर्गत अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खाण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना कळविण्यात आले (जून 2025). राज्य खनिज अन्वेषण न्यासाच्या स्थापनेबाबतची माहिती आजपर्यंत (नोव्हेंबर 2025) प्राप्त झालेली नाही.

3.2.7 प्रलंबित परतफेड प्रकरणे

परतफेड प्रकरणे निकाली काढण्यात तत्परता हा संबंधित विभागाच्या कामगिरीचा एक महत्त्वाचा निर्देशक आहे. विक्री कर/मूल्यवर्धित कर, राज्य उत्पादन शुल्क आणि मोटार वाहन विभागांनी (नोव्हेंबर 2025) परतफेड प्रकरणांच्या प्रलंबिततेबद्दल विदा सादर केला नाही.

संबंधित विभागांनी दिलेल्या अहवालानुसार 2024-25 या वर्षात वस्तू व सेवाकर विभागाच्या परतावा प्रकरणांचा तपशील **तक्ता 3.5** मध्ये दिला आहे.

तक्ता 3.5: परतावा प्रकरणांचा तपशील

(₹ कोटींत)

अनु. क्र.	तपशील	वस्तू व सेवा कर		विक्री कर/ मूल्यवर्धित कर		राज्य उत्पादन शुल्क		वाहनांवरील कर	
		प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम
1.	वर्षाच्या सुरूवातीस थकीत दावे	3878	710.32	0	0	37	4.70	496	3.20
2.	वर्षभरात प्राप्त झालेले दावे	29685	16615.60	0	0	48	5.88	2981	19.61
3.	वर्षभरात केलेला परतावा	29336	9745.12	0	0	18	1.21	2609	26.83
4.	वर्षभरात नाकारलेले परतावे	2655	1460.12	0	0	0	0	53	0.16
5.	वर्षाच्या अखेरीस थकबाकी	6038	4690.35	0	0	67	9.37	816	4.22

स्रोत: महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिलेली माहिती

एकंदरीत, वस्तू व सेवा कर विभागाने तुलनेने आकारमानाच्या प्रमाणात चांगली निष्पत्ती क्षमता दर्शविली असली तरी, उच्च-मूल्याच्या परताव्यांची सातत्यपूर्ण प्रलंबितता आणि इतर विभागांकडून विदा सादर न करणे हे पारदर्शकता, देखरेख आणि परतावा दाव्यांचा वेळेवर निपटाऱ्यांतील त्रुटी दर्शविते, ज्यामुळे करदात्यांचा विश्वास आणि रोकड आधारावर संभाव्य परिणाम होऊ शकतात.

3.3 शासकीय लेख्यांबाहेरील निधी

आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यात पडून असलेली अखर्चित रक्कम

राज्य शासनाने (ऑगस्ट 2025) दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील कोषागारांनी 2024-25 दरम्यान 9148 आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या विविध बँक खात्यांमध्ये ₹ 1,27,432.88 कोटी निधी हस्तांतरित केला. तथापि, या हस्तांतरणांचे प्रमाणक-स्तरीय तपशील प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) यांना

उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. या आकडेवारीच्या अधिक तपासणीत असे निदर्शनास आले की, हस्तांतरित केलेल्या निधीपैकी, 33 विभागांशी संबंधित ₹ 15,298.83 कोटी, 31 मार्च 2025 पर्यंत आहरण आणि वितरण अधिकारांच्या बँक खात्यांमध्ये अखर्चित राहिली, जरी तो शासकीय लेख्यांत खर्च म्हणून नोंदवला गेला होता. परिणामी, वित्तीय लेख्यांमध्ये प्रतिबिंबित केलेला खर्च हा अखर्चित शिल्लक रकमेइतका जास्त दाखवला जाऊन आणि वर्षासाठी नोंदवलेला शासकीय खर्च अंतिम नाही.

आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये शासकीय निधी ठेवण्याची पद्धत संविधानाच्या कलम 266(1) चे उल्लंघन करते, ज्यामध्ये राज्याने प्राप्त केलेला सर्व महसूल आणि कर्जे राज्याच्या एकत्रित निधीचा भाग आहे आणि कलम 283(1) चे उल्लंघन आहे, ज्यामध्ये अशी तरतूद आहे की एकत्रित निधीच्या मालकीच्या पैशांचा ताबा, आहरण आणि प्रदाने योग्यरित्या अधिकृत शासकीय प्रक्रियेद्वारे नियंत्रित केली जातील. शासकीय लेख्याबाहेर अखर्चित शिल्लक ठेवणे या संविधानिक तरतुदींना कमकुवत करते.

मागील वित्तीय वर्षांशी संबंधित शिल्लक असलेल्या आहरण आणि वितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांमधून होणारे व्यवहार त्यांना सामान्य अर्थसंकल्पीय प्रक्रियेपासून दूर ठेवतात आणि ज्या वर्षात ते ठेवले जातात त्या वर्षाच्या वित्तीय आणि विनियोजन लेख्यांमध्ये त्यांची नोंद केली जात नसल्याने त्यांना कायदेशीर देखरेखीबाहेर ठेवले जाते, ज्यामुळे अफरातफर/गैरवापराचा धोका वाढतो. अखर्चित शिल्लक रकमेची विभागवार माहिती **परिशिष्ट 3.2** मध्ये दिली आहे.

परिशिष्ट 3.2 मधील आकडेवारीवरून असे निदर्शनास आले की 2024-25 दरम्यान 9,148 आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांना हस्तांतरित केलेल्या ₹ 1,27,432 कोटीपैकी 31 मार्च 2025 पर्यंत ₹ 15,298 कोटी (सुमारे 12 *टक्के*) अखर्चित राहिले, जे विभागीय स्तरावर निधीचे लक्षणीय निष्क्रिय अडकून पडणे दर्शवते. एकट्या नगरविकास विभागाकडे ₹ 7,970.24 कोटी (एकूण अखर्चित शिल्लक रकमेच्या 50 *टक्क्यांहून* अधिक) होते, त्यानंतर ग्रामीण विकास विभाग (₹ 1,752.23 कोटी), महसूल आणि वन विभाग (₹ 1,295.07 कोटी) आणि नियोजन विभाग (₹ 661.10 कोटी) यांचा क्रमांक लागतो, जे काही प्रमुख खर्च विभागांमध्ये अखर्चित शिल्लक रकमेचे केंद्रीकरण दर्शवते.

याउलट, अनेक विभागांनी कमीत कमी अखर्चित रकमेसह तुलनेने कार्यक्षम वापर दाखवला. आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शिल्लक राहणे हे कमकुवत खर्च नियोजन, अकाली किंवा जास्त निधी मुक्तता आणि वर्षभरात अपुरे संनियंत्रण दर्शवते, ज्यामुळे रोख व्यवस्थापनाची कार्यक्षमता कमी होतेच, शिवाय वर्षभरातील इतर प्राधान्य गरजांसाठी निधीची उपलब्धता देखील मर्यादित होते.

पारदर्शकतेशी संबंधित मुद्दे

3.4 उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यास विलंब

मुंबई वित्तीय नियम, 1959, नियम 4 (परिशिष्ट 22, कलम 1) मध्ये असे म्हटले आहे की, ज्या प्रकरणांमध्ये अनुदानाच्या वापराशी विशिष्ट खर्चाच्या उद्दिष्टांच्या तपशीलांच्या स्वरूपात किंवा पैसे खर्च करण्याच्या वेळेच्या किंवा अन्य अटी जोडल्या गेल्या आहेत, त्या प्रकरणांमध्ये, अनुदान जोडण्याच्या अटीची पूर्तता आवश्यक असल्यास, महाराष्ट्राच्या प्रधान लेखापालांना प्रमाणित करण्यासाठी मंजुरी देणारा अधिकारी प्रामुख्याने जबाबदार असेल, जोपर्यंत त्याविरुद्ध कोणताही विशेष नियम किंवा आदेश नसेल. तसेच, सदर तरतुदीच्या नियम 5(i) मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की जर मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याने कोणतीही कालमर्यादा निश्चित केली नसेल तर अनुदान वाजवी वेळेत बाबींवर खर्च केले जाईल. अनुदान मंजूर झाल्याची सूचना जारी केल्याच्या तारखेपासून एक वर्षाचा कालावधी असा सामान्यतः वाजवी कालावधीचा अर्थ लावला पाहिजे, जोपर्यंत अन्यथा स्पष्टपणे नमूद केले नसेल. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने 12 जानेवारी 2023 च्या शासकीय निर्णयाद्वारे सहायक अनुदान आदेशांचे 'सशर्त' आणि 'बिनशर्त' म्हणून वर्गीकृत केले आहे. 'सशर्त' म्हणून वर्गीकृत केलेल्या सहायक अनुदान आदेशांच्या बाबतीतच उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

2024-25 या वर्षात, 31 मार्च 2025 पर्यंतच्या कालावधीसाठी 52,876 थकबाकी असलेल्या उपयोगिता प्रमाणपत्रांशी संबंधित ₹ 1,77,319.84 कोटी थकबाकी होती. त्यापैकी 40,047 थकबाकी असलेल्या उपयोगिता प्रमाणपत्रांशी संबंधित ₹ 1,37,222.25 कोटी थकबाकी मंजूर करण्यात आली. 31 मार्च 2025 पर्यंत, राज्य शासनाच्या 34 विभागांना दिलेल्या सशर्त अनुदानाच्या संदर्भात देय असलेल्या ₹ 40,097.59 कोटीची (केंद्र पुरस्कृत योजनांच्या थकबाकी असलेल्या उपयोगिता प्रमाणपत्रांसह ₹ 805.38 कोटी) 12829 उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात आली नाहीत, जे राज्याच्या एकूण एकत्रित खर्चाच्या (₹ 6,48,615.34 कोटी) 6.18 *टक्के* आहे. उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात झालेल्या विलंबाची कालावधीनुसार माहिती **तक्ता 3.6** मध्ये दिली आहे.

तक्ता 3.6: उपयोगिता प्रमाणपत्रांची कालावधीनुसार प्रलंबितता

(₹ कोटींत)

उपयोगिता प्रमाणपत्रांचे देय वर्ष*	प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रांची संख्या	रक्कम
2019-20 पूर्वी	876	7378.31
2019-20	359	1248.12
2020-21	349	830.03
2021-22	299	956.00
2022-23	784	2515.29
2023-24	1994	8439.75
2024-25	8168	18730.09
एकूण	**12829**	**40,097.59**


• वर नमूद केलेले वर्ष "देय वर्ष" शी संबंधित आहे, म्हणजे, प्रत्यक्ष आहरणाच्या 18 महिन्यांनंतर. (क्षेत्रीय कार्यालय राज्यासाठी लागू असलेल्या वित्तीय नियमांच्या आधारे हे योग्यरित्या सुधारित करू शकते)

स्रोत: वित्तीय लेखे 2024-25 आणि प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) महाराष्ट्र कार्यालय

प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रांमुळे अनुदानाचा वापर योग्य उद्देशासाठी झाल्याची खात्री कमी होते, आणि त्याद्वारे पडून असलेला निधी किंवा गैरवापर दडवला जाऊ शकतो. **आलेख 3.2** मध्ये 31 मार्च 2025 अखेरच्या पाच प्रमुख विभागांची प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे दर्शविली आहेत.

आलेख 3.2: 31 मार्च 2025 रोजी पाच प्रमुख विभागांसंदर्भातील प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे

(₹ कोटीत)



स्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) महाराष्ट्र यांचे कार्यालय

विविध विभागांशी संबंधित एकूण प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे **परिशिष्ट 3.3** मध्ये दर्शविली आहेत. उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्याने गैरवापर होण्याचा धोका असतो, त्यामुळे राज्य शासनाने या पैलूवर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे आणि कालबद्ध पद्धतीने उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी संबंधित व्यक्तींना जबाबदार धरणे अत्यावश्यक आहे.

3.5 संक्षिप्त आकस्मिक देयके

महाराष्ट्र कोषागार नियमावलीच्या नियम 282 (2) नुसार, तात्काळ वाटपाची गरज असल्याशिवाय कोषागारातून निधी काढता येत नाही. महाराष्ट्र कोषागार नियम 1968, याचबरोबर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग विनियमन (फेब्रुवारी 2008) नुसार, आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी अंतिम खर्चाच्या समर्थनार्थ प्रमाणक असलेली प्रतिस्वाक्षरीत तपशीलवार आकस्मिक देयके ही संक्षिप्त आकस्मिक देयके काढल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे आणि कोणत्याही परिस्थितीत, वित्त विभागाच्या संमतीने प्रशासकीय विभागाने अन्यथा परवानगी दिली नसल्यास, अशी अग्रिम रक्कम काढल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

मार्चमध्ये संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या माध्यमातून काढलेल्या लक्षणीय रकमा हे दर्शविते की काढलेल्या रकमा या प्रामुख्याने अर्थसंकल्पातील तरतुदी संपवण्यासाठी

होत्या आणि अपुरे अर्थसंकल्पीय नियंत्रण दर्शविते. विभाग-निहाय तपशीलवार आकस्मिक देयकांची प्रलंबितता **परिशिष्ट 3.4** मध्ये दर्शविण्यात आली आहे. 1,698 संक्षिप्त आकस्मिक देयकांद्वारे काढलेली एकूण ₹ 3532.05 कोटींची तपशीलवार आकस्मिक देयके मार्च 2024 अखेरीस प्रलंबित होती जी **तक्ता 3.7** मध्ये तपशीलवार दर्शविली आहेत.


तक्ता 3.7: आकस्मिक देयकांचे काल निहाय प्रलंबित समायोजन

(₹ कोटीत)

वर्ष	काढलेली संक्षिप्त आकस्मिक देयके		प्राप्त झालेली तपशीलवार आकस्मिक देयके		31 मार्च 2025 पर्यंत प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयके	
	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम
2023-24 पर्यंत	1438	3674.60	471	319.25	967	3355.35
2024-25	1838	260.00	1107	83.30	731	176.70
एकूण	**3276**	**3934.60**	**1578**	**402.55**	**1698**	**3532.05**
स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25						

2024-25 दरम्यान काढण्यात आलेल्या ₹ 260 कोटीच्या एकूण 1838 संक्षिप्त आकस्मिक देयकांपैकी, मार्च 2025 मध्ये ₹ 35.18 कोटी (13.53 *टक्के*) किंमतीची 268 संक्षिप्त आकस्मिक देयके काढण्यात आली होती, जी महाराष्ट्र कोषागार नियम 1968 च्या नियम 302(2) चे उल्लंघन होते. 31 मार्च 2025 रोजी पाच प्रमुख विभागांसंबंधीची थकबाकी तपशीलवार आकस्मिक देयके **आलेख 3.3** मध्ये दर्शविली आहेत.

आलेख 3.3: पाच प्रमुख विभागांशी संबंधित प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयके



स्त्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालय

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादितच्या माध्यमातून औषधे, वैद्यकीय उपकरणे इत्यादींच्या खरेदीसाठी तीन विभागांनी (उदा. सार्वजनिक आरोग्य विभाग, नियोजन विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग) संक्षिप्त आकस्मिक देयकांचा वापर करून रक्कम काढली. अशा खरेदीसंदर्भात, समायोजनासाठी प्रलंबित असलेल्या एकूण संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या 63.03 *टक्के* म्हणजे ₹ 2,226.32 कोटीची 559 संक्षिप्त आकस्मिक देयके वर्ष अखेरीस समायोजित झाली नाहीत.

2017-18 ते 2021-22 या कालावधीत तिन्ही विभागांच्या आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी संक्षिप्त आकस्मिक देयकांवर ₹ 4,298.05 कोटी निधी काढला आणि हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादितच्या खरेदी कक्षाकडे हस्तांतरित केला.

संक्षिप्त आकस्मिक देयकोंद्वारे काढलेला निधी राज्याच्या एकत्रित निधीमधील कार्यात्मक प्रमुख शीर्षकाखाली नोंदवला जातो. तपशीलवार आकस्मिक देयकेद्वारे दिलेल्या वेळेत हिशोब पूर्ण झाल्याशिवाय, तो खर्च अचूक किंवा अंतिम मानला जाऊ शकत नाही. तपशीलवार आकस्मिक देयक सादर न करणे हे विभागांकडून तसेच कोषागाराकडून देखरेखीचा अभाव दर्शवते.

3.6 वैयक्तिक ठेव खाती

महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या नियम 494 आणि मुंबई वित्तीय नियम 1959 च्या नियम 12 नुसार, राज्याच्या महालेखापालांशी सल्लामसलत करून शासनाच्या मान्यतेच्या आधारावर विशिष्ट उद्देशांसाठी कोषागार अधिकाऱ्यांकडे वैयक्तिक ठेव खाती उघडता येतात.

तसेच, महाराष्ट्र कोषागार नियमाच्या नियम 495 नुसार एकत्रित निधीमधून निधी हस्तांतरित करून वैयक्तिक ठेव खात्यात विशिष्ट कारणांसाठी आवश्यक निधी ठेवण्याकरिता महाराष्ट्र शासनाला प्राधिकृत केले आहे. ज्या प्रकरणांमध्ये वैयक्तिक ठेव खाती एकत्रित निधीत खर्ची पडतात, अशा प्रकरणांमध्ये एकत्रित निधीतील संबंधित सेवा शीर्षामध्ये शिल्लक रक्कम उणे खर्ची करून वित्तीय वर्षाच्या अखेरीस ती बंद करावी.

केंद्र आणि राज्यांच्या प्रमुख आणि गौण शीर्षांच्या यादीअंतर्गत, व्याजरहित स्वरूपाच्या 8443-नागरी ठेवी-106-वैयक्तिक ठेवी अंतर्गत उघडलेल्या वैयक्तिक ठेवी आहेत. 31 मार्च 2025 रोजीच्या वैयक्तिक ठेवी खात्यांचा तपशील **तक्ता 3.8** मध्ये दिला आहे.

तक्ता 3.8: 2024-25 मध्ये वैयक्तिक ठेव खात्यांची स्थिती

(₹ कोटीत)

वैयक्तिक ठेवीचा प्रकार/वैयक्तिक वही खाते	1 एप्रिल 2024 रोजी आरंभीची शिल्लक		2024-25 या वर्षात वाढ		2024-25 या वर्षात बंद		अखेरची शिल्लक (31 मार्च 2025 रोजी)	
	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम
पारंपारिक वैयक्तिक ठेव/ वैयक्तिक वही खाते	1248	16381.87	14	29498.21	88	29203.73	1174	16676.35
आभासी वैयक्तिक ठेव खाती/ वैयक्तिक वही खाते		-	1384	65889.44	-	44896.38	1384	20993.06
एकूण	**1,248**	**16381.87**	**1398**	**95387.65**	**88**	**74100.11**	**2558**	**37669.41**

स्त्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालय

आभासी वैयक्तिक ठेव खाती: महाराष्ट्रात, मोठ्या संख्येने आहरण आणि संवितरण अधिकारी अनुदान/ सहायक अनुदान हाताळतात. एकत्रित निधीतून काढलेली वितरित न केलेली सहायक अनुदान रक्कम बहुतेकदा आहरण आणि संवितरण अधिकाऱ्याच्या चालू किंवा बचत खात्यात वारंवार जमा असते. या पद्धतीमुळे शासकीय निधी शासकीय लेख्याबाहेर राहतो, रोख प्रवाह व्यवस्थापन कमकुवत होते, आहरण आणि संवितरण अधिकारी किंवा अंमलबजावणी संस्थांकडील निष्क्रिय शिल्लकांवर देखरेख मर्यादित होते, अखर्चित निधीच्या वास्तविक वेळेची दृश्यमानता प्रतिबंधित करते, अखर्चित शिल्लक परतफेड करण्यास विलंब होतो आणि प्राधान्य योजनांसाठी निधीची उपलब्धता मर्यादित होते. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने 23 मार्च 2024 रोजी शासकीय निर्णय आणि त्यानंतरच्या 25 मार्च 2025 च्या शासकीय निर्णयाद्वारे, वित्त विभागाने परवानगी दिलेल्या तपशीलवार शीर्ष 27, 31, 33, 35, 50, 53 आणि इतर शीर्ष अंतर्गत राज्य योजनांसाठी अनुदान वितरणासाठी आभासी वैयक्तिक ठेव खाती आणि संबंधित प्रक्रियांचा वापर करण्यास मान्यता दिली. या शीर्षकांतर्गत काढलेले निधी आभासी वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक असून ते बँक खात्यांमध्ये ठेवू नयेत. जेव्हा त्वरित निधी वितरण शक्य नसते आणि निधी अन्यथा आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यात असतो, तेव्हा आभासी वैयक्तिक ठेव खाती प्रणाली अनिवार्य होते. अशा प्रकरणांमध्ये, आहरण आणि संवितरण अधिकारी 'शून्य-देयक प्रक्रिये'द्वारे देयक काढतो, रक्कम प्रशासकाच्या आभासी वैयक्तिक ठेवीत हस्तांतरित केली जाते, एकत्रित निधीमध्ये खर्ची केली जाते आणि रोख प्रवाहाशिवाय लोक लेखे 8443-106 अंतर्गत जमा केली जाते. आभासी वैयक्तिक ठेव खाती हे पारंपारिक वैयक्तिक ठेव/ वैयक्तिक वही खाते खात्यांपेक्षा वेगळे आहे कारण आभासी वैयक्तिक ठेव महाराष्ट्र कोषागार नियमांच्या नियम 495 च्या कक्षेबाहेर आहेत, म्हणजेच वर्षअखेरीस मुदतवाढीचे नियम त्यांना लागू होणार नाहीत आणि निधी काढल्याच्या तारखेपासून 365 दिवसांपर्यंत आभासी वैयक्तिक ठेवीमध्ये राहू शकतो. 365 दिवसांपर्यंत कोणताही व्यवहार न झाल्यास आभासी वैयक्तिक ठेव निष्क्रिय होते; उर्वरित शिल्लक नंतर एकत्रित निधीमध्ये परत जमा करणे आवश्यक आहे.

वरील खाती चालू ठेवण्यासाठी वित्त विभागाच्या परवानगीने आभासी वैयक्तिक ठेव प्रशासक घोषित केले जातात आणि प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) यांच्याकडून संमती प्राप्त केली जाते.

महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या नियम 495 नुसार आणि वैयक्तिक ठेव खाते उघडण्याच्या अटींच्या अधीन राहून, एकत्रित निधीतून वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये हस्तांतरित केलेला निधी वित्तीय वर्षाच्या शेवटी किंवा बंद होण्याच्या निर्धारित कालावधीनंतर ज्या खात्यांच्या संबंधित शीर्षांखाली एकत्रित निधीमध्ये जमा केला जातो त्या अंतर्गत एकत्रित निधीमध्ये परत नोंदणी आवश्यक आहे. मार्च 2025 च्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार, आभासी वैयक्तिक ठेवीकडे हस्तांतरित केलेल्या निधीला वरील कलमातून वगळण्यात आले आहेत.

महाराष्ट्र कोषागार नियमपुस्तिका, 1970 च्या नियम 589 नुसार, वैयक्तिक ठेव खात्याच्या 328 प्रशासकांनी (1,174 पैकी) (आभासी वैयक्तिक ठेव प्रशासक वगळता) त्यांच्या शिल्लक रक्कमेची (कोषागारातील) कोषागारातील आकडेवारीशी जुळवून घेतली आणि पडताळणी केली आणि 328 वार्षिक पडताळणी प्रमाणपत्रे त्यांनी कोषागार अधिकाऱ्याला सादर केली. प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) कार्यालयाला कोषागार अधिकाऱ्यांकडून अशी 328 प्रमाणपत्रे प्राप्त झाली. 846 वैयक्तिक ठेव खात्याच्या प्रशासकांनी त्यांच्या शिल्लक रकमेची कोषागारातील आकडेवारीशी जुळवून पडताळणी केली नव्हती.

2024-25 दरम्यान, राज्य शासनाने एकत्रित निधीतून ₹ 89,005.21 कोटी प्रधान शीर्ष 8443-106 अंतर्गत वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये हस्तांतरित केले. यापैकी, ₹ 39,782.13 कोटी केवळ मार्च 2025 मध्ये हस्तांतरित करण्यात आले, ज्यामध्ये 31 मार्च 2025 रोजी ₹ 6,920.71 कोटींचा समावेश होता, हे दर्शविते की हे हस्तांतरण प्रामुख्याने वर्षाच्या अखेरीस अर्थसंकल्पीय तरतुदी रद्द होऊ नयेत म्हणून करण्यात आले होते. शासनाने आभासी वैयक्तिक ठेव सुरू केले ज्याचा उद्देश असा होता की खर्च न झालेल्या निधीवर नियंत्रण सुधारावे आणि त्यांना आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांऐवजी शासकीय लेखा प्रणालीमध्ये ठेवावे, जिथे अशा खात्यांमधून होणारा खर्च कायदेशीर देखरेखीच्या बाहेर जातो. तथापि, प्रत्यक्षात, आभासी वैयक्तिक ठेवीमुळे प्रत्यक्ष वापर न करता लोक लेख्यांमध्ये निधी पडून राहणे सुरू राहिले आहे आणि वर्षाच्या अखेरीस रक्कम अडकून राहण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. वित्तीय वर्षाच्या 31 मार्चच्या नंतर अशा शिल्लक रकमा पुढे नेणे हे वित्तीय शिस्तीच्या मूलभूत तत्त्वांच्या विरुद्ध आहे. जेव्हा वित्तीय वर्षात निधी आभासी वैयक्तिक ठेव खात्यात जमा केला जातो तेव्हा प्रत्यक्ष खर्च केव्हा झाला याची पर्वा न करता खर्च सेवा शीर्षांवर नोंदवला जातो, जरी आभासी वैयक्तिक ठेवी मधून कोणताही खर्च न झाल्यास पुढील वर्षी पैसे परत मिळू शकतात. हे महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या नियम 495 च्या विरुद्ध आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, जिथे वैयक्तिक ठेव खाती एकत्रित निधीमध्ये उणे खर्चाद्वारे जमा केली जातात, तिथे ती वित्तीय वर्षाच्या

अखेरीस एकत्रित निधीतील संबंधित सेवा शीर्षांत शिल्लक रक्कम वजा करून वैयक्तिक ठेव खाती पुढील वर्षी पुन्हा उघडली पाहिजेत, जर आवश्यक असेल तर नेहमीच्या पद्धतीने. मार्च 2025 रोजीचा शासन निर्णय जो आभासी वैयक्तिक ठेवीला या नियमाचे पालन करण्यापासून सूट देतो तो महाराष्ट्र कोषागार नियम 1968 चे उल्लंघन करणारा आहे आणि कायदेशीर हेतूला धक्का देणारा आहे. तसेच, आभासी वैयक्तिक ठेवीमध्ये ठेवलेले अखर्चित पैसे वित्तीय वर्षात शासकीय खात्यात परत केले जात नाहीत, ज्यामुळे महसुली खर्चाचे प्रमाण वाढून प्रत्यक्ष खर्च न होता महसूल तूट देखील वाढते, ज्यामुळे राज्य लेख्यांची पारदर्शकता आणि विश्वासार्हता कमी होते.

2024-25 साठी राज्य शासनाची महसुली तूट ₹ 29,994.76 कोटी होती, जर आभासी वैयक्तिक ठेव खाती मधील ₹ 20,993.06 कोटींची अखर्चित शिल्लक 31 मार्च 2025 रोजी राज्याच्या एकत्रित निधीत परत आणली असती, तर महसुली तूट ₹ 9,001.70 कोटी झाली असती. अशाप्रकारे, 31 मार्च 2025 नंतर आभासी वैयक्तिक ठेव खात्यामध्ये रक्कम ठेवल्याने महसुली तूट ₹ 20,993.06 कोटींनी वाढली.

शासनाने आभासी वैयक्तिक ठेवी खात्यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन आभासी वैयक्तिक ठेवी खात्याच्या चौकटीत राखून ठेवलेल्या रकमेसह वर्षअखेरीस अखर्चित शिल्लक एकत्रित निधीमध्ये परत जमा केली जाईल याची खात्री करावी, जेणेकरून लेखे वास्तविक खर्च दर्शवतील आणि महाराष्ट्र कोषागार नियमांचे पालन होईल.

3.7 गौण शीर्ष-800 उघडणे

'इतर जमा/इतर खर्च' संबंधित सर्वसमावेशक गौण शीर्ष 800 केवळ अशा प्रकरणांमध्येच वापरावयाचे असते जेव्हा लेख्यांमध्ये योग्य गौण शीर्षाची तरतूद प्रधान शीर्षांतर्गत केलेली नसते. अशा घटना नियमितपणे घडत असतील तर प्रधान महालेखापाल (लेखे व अनुज्ञेयता) यांच्याशी चर्चा करून योग्य वर्गीकरणाबाबत सल्ला घेण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. गौण शीर्ष '800- इतर जमा व खर्च' अंतर्गत जमा व खर्चाच्या अविवेकी नोंदी केल्याने व्यवहारांच्या पारदर्शकतेवर व स्वरूपावर परिणाम होतो व लेखे अपारदर्शक होतात.

2024-25 मध्ये राज्य शासनाने ₹ 15,002.06 कोटींच्या खर्चाचे वर्गीकरण 50 महसुली आणि भांडवली प्रधान शीर्षांतर्गत 800-इतर खर्च या गौण शीर्षाखाली केले जे एकूण एकत्रित खर्चाच्या[2] (₹ 5,94,674.51 कोटी) 2.52 *टक्के* होते.

लेखापरीक्षणाने गौण शीर्ष-800 अंतर्गत नोंदणी केलेल्या निवडक 40 प्रकरणांची तपासणी केली ज्यात खर्च ₹ 50 कोटींपेक्षा जास्त होता. 10 प्रधान शीर्षांखालील 20 प्रकरणांमध्ये खर्चाचे वर्गीकरण त्या अंतर्गत योग्य गौण शीर्ष उपलब्ध असूनही गौण शीर्ष-800-इतर खर्च अंतर्गत करण्यात आले, जे **तक्ता 3.9** मध्ये तपशीलवार नमूद केले आहे.

2 कर्जे व अग्रिमे वगळून

तक्ता 3.9: 2024-25 दरम्यान गौण शीर्ष 800-इतर खर्च अंतर्गत चुकीचे वर्गीकरण केलेले खर्च

(₹ कोटींत)

नोंदणी अंतर्गत शीर्षाचा तपशील चुकीच्या पद्धतीने वर्गीकृत करण्यात आला	रक्कम	खर्चाचे स्वरूप	योग्य वर्गीकरण
2202-01-800	168.20	विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे	2202-01-108
2202-80-800	158.74	राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती	2202-80-107
2205-00-800	209.98	साहित्य, कला इत्यादी क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना वित्तीय सहाय्य.	2205-00-102
2210-06-800	129.43	प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयात अद्ययावतीकरण	2210-03-110
2210-06-800	400.93	ट्रॉमा केअर सेंटरची स्थापना- महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा	2210-06-200
2515-00-800	920.24	ग्रामीण भागातील विकास कामांसाठी जिल्हा परिषदांना अनुदान	2515-00-196
2216-02-800	240.00	अनुसूचित जाती आणि नवबौद्धांसाठी घरकुल योजना (शहरी) (अनुसूचीत जाती उपयोजना)	2216-02-789
2216-03-800	875.00	अनुसूचित जाती आणि नवबौद्धांसाठी घरकुल योजना (ग्रामीण) (अनुसूचीत जाती उपयोजना)	2216-03-789
2217-80-800	57.89	दलित वस्तींव्यतिरिक्त शहरी वस्तींमध्ये सुधारणा	2217-05-191
2225-01-800	105.00	डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम (अनुसूचीत जाती उपयोजना)	2225-01-789
3054-04-800	412.44	रस्ते सुधारणेसाठी नगरपरिषदा/ महानगरपालिका इत्यादींना अनुदान - सामान्य रस्ते अनुदान	3054-04-192
3054-04-800	52.18	ग्रामीण रस्त्यांच्या विकास व मजबुतीकरणासाठी जिल्हा परिषदेला अनुदान	3054-04-196
3054-04-800	50.75	ग्रामीण रस्त्यांच्या विकास व मजबुतीकरणासाठी जिल्हा परिषदेला अनुदान	3054-04-196
3054-04-800	81.76	ग्रामीण रस्त्यांच्या विकास व मजबुतीकरणासाठी जिल्हा परिषदेला अनुदान	3054-04-196
3054-04-800	63.06	ग्रामीण रस्त्यांच्या विकास व मजबुतीकरणासाठी जिल्हा परिषदेला अनुदान	3054-04-196
3054-04-800	59.00	ग्रामीण रस्त्यांच्या विकास व मजबुतीकरणासाठी जिल्हा परिषदेला अनुदान	3054-04-196
5054-04-800	69.57	इतर जिल्हा रस्त्यांचा विकास आणि बळकटीकरण	5054-04-337
5054-04-800	71.43	इतर जिल्हा रस्त्यांचा विकास आणि बळकटीकरण	5054-04-337
4070-00-800	252.69	भूसंपादन आणि पोलिसांसाठी इमारतीच्या बांधकामावरील खर्च	4070-00-051
4070-00-800	839.52	महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण बांधकाम	4070-00-051
एकूण	**5217.81**		
स्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) द्वारे वित्तीय लेखे आणि प्रमाणक स्तरीय संकलन विदा			

त्याचप्रमाणे, 53 प्रधान शीर्षांतर्गत ₹ 11,710.20 कोटी, जे एकूण महसुली जमेच्या[3] 2.43 *टक्के* (₹ 4,81,906.43 कोटी) होते, लेख्यांमधील 800- इतर जमा अंतर्गत वर्गीकृत केले गेले.

लेखापरीक्षणाने गौण शीर्ष-800-'इतर जमा' अंतर्गत नोंदणीच्या निवडक 22 प्रकरणांची तपासणी केली ज्यात जमा ₹ 50 कोटीपेक्षा जास्त होती. चार प्रधान शीर्षांतर्गत पाच प्रकरणांमध्ये, योग्य गौण शीर्षांची उपलब्धता असूनही, जमेचे वर्गीकरण गौण शीर्ष- 800- 'इतर जमा' अंतर्गत करण्यात आले, ज्याचे **तक्ता 3.10** मध्ये तपशीलवार वर्णन केले आहे. अशा भरीव आणि आवर्ती खर्चासाठी गौण शीर्ष 800 चा सतत वापर करणे, हे अर्थसंकल्पीय वर्गीकरण आणि लेखांकन शिस्तीतील कमतरता दर्शवते, क्षेत्रनिहाय खर्च अहवालामधील पारदर्शकता कमी करते आणि कार्यक्रम-निहाय खर्च व परिणामांचे अर्थपूर्ण विश्लेषण करण्यास अडथळा निर्माण करते.

तक्ता 3.10: 2024-25 दरम्यान गौण शीर्ष 800-इतर जमा अंतर्गत चुकीच्या पद्धतीने वर्गीकृत केलेली जमा

(₹ कोटींत)

नोंदणी अंतर्गत शीर्षाचा तपशील चुकीच्या पद्धतीने वर्गीकृत करण्यात आला	रक्कम	जमेचे स्वरूप	योग्य वर्गीकरण
0045-00-800	231.96	शिक्षण उपकर	0045-00-108
0049-04-800	401.99	इतर कर्जावरील व्याज	0049-04-112
0049-04-800	78.90	घरबांधणी अग्रिमे	0049-04-118
0217-60-800	346.26	नागरी जमीन (कमाल मर्यादा व नियमन) अधिनियम, 1976 च्या कलम 20 अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनींमधून प्राप्त झालेली शुल्क/प्रीमियम रक्कम.	0217-60-191
0515-00-800	92.38	समुदाय विकास कार्यक्रमांमधून मिळणारी जमा	0515-00-102
एकूण	**1151.49**		

स्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) द्वारे वित्तीय लेखे आणि प्रमाणक स्तरीय संकलन विदा

[3] कर्ज आणि अग्रिमे वगळून.

मोजमापाशी संबंधित मुद्दे

3.8 निलंबन व कर्ज, ठेवी आणि वित्तप्रेषण यांतील प्रधान शीर्षांतर्गत थकीत शिल्लक

कोषागारे/अधिदान व लेखा कार्यालये यांनी समायोजनाचे विवरणपत्र सादर न करणे, रिझर्व्ह बँकेकडून समशोधन ज्ञापन प्राप्त न होणे, प्रमाणके प्राप्त न होणे इत्यादी माहितीच्या अभावामुळे लेख्यांमध्ये अंतिम शीर्षांतर्गत नोंद केली जाऊ शकत नाही अशी जमा आणि प्रदानांचे व्यवहार प्रतिबिंबित करण्यासाठी शासकीय लेख्यांमध्ये "निलंबन शीर्ष" म्हणून ओळखले जाणारे काही मध्यस्थ समायोजन लेखा शीर्ष उघडले जातात. हे व्यवहार अंतिमतः त्यांच्या संबंधित लेखाशीर्षामध्ये नोंदविले गेल्यानंतर हे लेखाशीर्ष उणे खर्ची किंवा उणे जमा याद्वारे बंद केले जातात. जर या रकमा समायोजित केल्या नाही तर निलंबन शीर्षांतर्गत शिल्लक रकमांचा संचय होईल आणि शासकीय जमा आणि खर्च अचूकपणे प्रतिबिंबित होणार नाहीत.

वित्तप्रेषणांमध्ये लेख्याच्या शीर्षांचे समायोजन करणारे सर्व व्यवहार समाविष्ट आहेत आणि या शीर्षाखालील खर्च किंवा जमा अखेरीस संबंधित जमा किंवा खर्चाद्वारे त्याच किंवा लेखांकनाच्या दुसऱ्या आवर्तनात मंजूर केले जातात.

वित्त लेख्यांमध्ये निलंबन आणि वित्तप्रेषण शीर्षाअंतर्गत निव्वळ शिल्लक प्रतिबिंबित होते. या शीर्षाखालील थकबाकी थकित खर्च आणि जमा शिल्लक स्वतंत्रपणे एकत्रित करून काढली जाते. निलंबन आणि वित्तप्रेषण बाबींचे निर्लेखन हे राज्य कोषागार/ बांधकाम आणि वन विभागांनी सादर केलेल्या तपशीलावर अवलंबून असते.

गेल्या तीन वर्षांतील मुख्य निलंबन व वित्तप्रेषण या शीर्षांतर्गत एकूण आकडेवारीची स्थिती **तक्ता 3.11** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 3.11: निलंबन व वित्तप्रेषण शीर्षांतर्गत शिल्लक

(₹ कोटीत)

लेखाशीर्ष		2022-23		2023-24		2024-25	
1		खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)
8658	**निलंबन खाते**						
101	अधिदान व लेखा कार्यालय निलंबन	153.27	10.49	131.36	03.06	106.56	22.22
	निव्वळ खर्च / जमा	खर्च 142.78		खर्च 128.30		खर्च 84.35	
102	निलंबन लेखे- नागरी	34.50	33.08	12.18	13.44	14.02	14.25
	निव्वळ खर्च / जमा	खर्च 1.42		जमा 1.26		जमा 0.23	
109	रिझर्व्ह बँक निलंबन (मुख्यालय)	0.61	18.75	(-)3.56	20.84	(-) 3.81	14.28
	निव्वळ खर्च / जमा	जमा 18.14		जमा 24.40		जमा 18.09	
110	भारतीय रिझर्व्ह बँक निलंबन- (मुख्य लेखा कार्यालय)	381.95	376.14	404.48	365.46	369.30	359.09

लेखाशीर्ष		2022-23		2023-24		2024-25	
	निव्वळ खर्च/ जमा	खर्च 5.81		खर्च 39.02		खर्च 10.21	
112	स्रोतारंभी कर कपात निलंबन	653.76	827.88	(-)33.62	194.21	20.97	300.41
	निव्वळ खर्च / जमा	जमा 174.12		जमा 227.83		जमा 279.44	
8782	**रोख वित्तप्रेषण आणि एकाच लेखा अधिकाऱ्याकडे लेखे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांमधील समायोजन**						
102	सार्वजनिक बांधकाम वित्तप्रेषण	234775.23	236342.95	200239.26	287820.79	339760.24	343884.16
	निव्वळ खर्च / जमा	जमा 1567.72		जमा 87581.53		जमा 4123.92	
103	वने वित्तप्रेषणे	16394.16	16498.86	20252.59	20171.88	24310.78	24484.14
	निव्वळ खर्च / जमा	जमा 104.70		जमा 80.71		जमा 173.36	
8793	**आंतरराज्यीय निलंबन लेखे**	10.18	6.40	8.61	6.39	8.22	6.57
	निव्वळ खर्च / जमा	खर्च 3.78		खर्च 2.21		खर्च 1.65	
स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे							

या शीर्षाखालील थकबाकी निर्लेखित न केल्यामुळे राज्य शासनाच्या विविध लेख्यांच्या (जे वर्षानुवर्षे पुढे नेले जातात) अंतर्गत जमा/खर्चाच्या आकडेवारीच्या अचूकतेवर परिणाम झाला.


3.9 विभागीय आकडेवारीचा ताळमेळ

महसूल/खर्चावर प्रभावी अर्थसंकल्पीय नियंत्रण ठेवण्यासाठी आणि लेख्यांमध्ये अचूकता सुनिश्चित करण्यासाठी, सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांनी, यथास्थिती, प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई किंवा प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-II, महाराष्ट्र, नागपूर किंवा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयांनी नोंदवलेल्या आकडेवारीशी शासनाच्या जमा आणि खर्चाचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. नियंत्रण अधिकाऱ्यांद्वारे आकडेवारीच्या ताळमेळाची स्थिती **तक्ता 3.12** आणि **आलेख 3.4** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 3.12: नियंत्रण अधिकाऱ्यांद्वारे खर्चाच्या आकडेवारीच्या ताळमेळाची स्थिती

वर्ष	नियंत्रण अधिकाऱ्यांची एकूण संख्या	खर्चाचा ताळमेळ घालणाऱ्या नियंत्रण अधिकाऱ्यांची संख्या		
		संपूर्णतः ताळमेळ	अंशतः ताळमेळ	ताळमेळ घेतला नाही
2022-23	7065	6642	273	150
2023-24	7061	6757	186	118
2024-25	7081	6773	236	72
स्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयाद्वारे ठेवलेली माहिती				

आलेख 3.4: 2022-25 दरम्यान जमा व खर्चाच्या ताळमेळाची स्थिती



स्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयाद्वारे ठेवलेली माहिती

3.10 रोख शिल्लक रकमेचा ताळमेळ

प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) यांच्या लेखापुस्तकांनुसार राज्याची रोख शिल्लक आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रतिवेदित केलेली रोख शिल्लक यात कोणतीही तफावत नसावी. 2024-25 या वर्षाच्या लेख्यानुसार व भारतीय रिझर्व्ह बँकेनुसार या वर्षात 31 मार्च 2025 रोजी ताळमेळ न घेतलेला फरक दर्शविणारी रोख शिल्लक **तक्ता 3.13** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 3.13: रोख शिल्लकांचा न जुळणारा फरक

(₹ कोटींत)

प्रधान महालेखाकारांच्या लेखापुस्तकानुसार	भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रतिवेदित केल्यानुसार	फरक (31.03.2024 रोजी)
423.23 (खर्ची)	220.35 (जमा)	202.88 (खर्ची)
स्त्रोत: वित्तीय लेखे 2024-25		

₹ 202.88 कोटींची (जमा) तफावत ही प्रामुख्याने कोषागार/भारतीय रिझर्व्ह बँक/अभिकरण बँक आणि प्रधान महालेखाकार कार्यालय यांच्यामधील प्रलंबित ताळमेळ यामुळे आहे. या तफावतींचा ताळमेळ घेणे चालू आहे आणि 31 मे 2025 पर्यंत ही तफावत ₹ 64.93 कोटी (खर्ची) पर्यंत कमी करण्यात आली होती.

प्रकटनाशी संबंधित मुद्दे

3.11 लेखांकन मानकांचे अनुपालन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 150 नुसार भारताचे राष्ट्रपती भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्यानुसार केंद्र आणि राज्यांच्या लेख्यांचे नमुने विहित करू शकतात. याशिवाय, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी 2002 मध्ये उत्तरदायित्व

कार्यतंत्र वाढविण्यासाठी शासकीय लेखांकन आणि वित्तीय प्रतिवेदन मानके तयार करण्याकरिता शासकीय लेखांकन मानके सल्लागार मंडळ स्थापन केले. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्यानुसार भारताच्या राष्ट्रपतींनी आतापर्यंत चार भारतीय शासकीय लेखांकन मानके अधिसूचित केली आहेत.

भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या त्यांच्या अधिसूचनेनंतर प्रभावी तारखेपासून खालील चार भारतीय शासकीय लेखांकन मानके अनिवार्य झाली.

1. शासनाने दिलेल्या हमी - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 1**
2. सहाय्यक अनुदानाचे लेखांकन व वर्गीकरण - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 2**
3. शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 3**
4. पूर्व कालावधी समायोजन - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 4**

राज्य शासनाकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामुळे भारतीय शासकीय लेखांकन मानकांच्या प्रकटन आवश्यकतांचे कोणत्या मर्यादेपर्यंत पालन केले गेले नाही ते **तक्ता 3.14** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 3.14: लेखांकन मानकांचे अनुपालन

अनु. क्र.	लेखांकन मानके	भारतीय शासकीय लेखांकन मानकांचे सार	राज्य शासनाकडून अनुपालन	कमतरतेचा परिणाम
1.	**भारतीय शासकीय लेखांकन मानक - 1:** *शासनाने दिलेल्या हमी - प्रकटन आवश्यकता*	या मानकानुसार शासनाने वर्षभरात दिलेल्या हमीची जास्तीत जास्त रक्कम आपल्या वित्तीय विवरणपत्रात जाहीर करणे आवश्यक आहे, ज्यात दिलेल्या हमी, वगळलेल्या हमी, लागू केलेल्या हमी, मुक्त केलेल्या हमी आणि वर्षअखेरीस थकीत हमी यांचा तपशील असणे आवश्यक आहे.	अंशत: पालन केले राज्य विधिमंडळाने ज्या मर्यादेत शासन हमी देऊ शकते ती मर्यादा निश्चित केली नाही.	शासकीय हमीवर वैधानिक मर्यादा निश्चित न केल्याने अनियंत्रित आकस्मिक दायित्वे निर्माण होऊ शकतात.
2.	**भारतीय शासकीय लेखांकन मानक - 2:** *सहाय्यक अनुदानाचे लेखांकन आणि वर्गीकरण*	सहाय्यक अनुदानाचा अंतिम वापर काहीही असो, अनुदानकर्त्याच्या लेख्यात महसुली खर्च म्हणून आणि अनुदानग्राहीच्या लेख्यात महसुली जमा म्हणून वर्गीकरण केले जाईल.	अंशतः पालन केले	2024-25 दरम्यान, महाराष्ट्र शासनाने महसुली भांडवली विभागांतर्गत अनुदानाशी संबंधित ₹ 4,068.83 कोटी खर्च चुकीच्या पद्धतीने अंदाजित केला आणि नोंदविला. अनुपालन न केल्याने महसुली तूट त्या प्रमाणात कमी दाखवण्यात आली.
3.	**भारतीय शासकीय**	हे मानक संपूर्ण, अचूक आणि एकसमान लेखांकन पद्धती	राज्य शासनाने संस्थानिहाय	ही तपशील सादर न केल्याने विहित लेखा मानकांचे पालन

अनु. क्र.	लेखांकन मानके	भारतीय शासकीय लेखांकन मानकांचे सार	राज्य शासनाकडून अनुपालन	कमतरतेचा परिणाम
	लेखांकन मानक - 3: *शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे*	सुनिश्चित करण्यासाठी शासनाने दिलेल्या कर्जे आणि अग्रिमांच्या संदर्भात शासनाच्या वित्तीय विवरणपत्रांत मान्यता, मोजमाप, मूल्यांकन आणि अहवाल देण्याशी संबंधित आहे.	कर्ज शिल्लक, थकबाकीतील कर्जाचे तपशील, कर्जाच्या अटी व शर्ती, थकबाकीदार संस्थांना नवीन कर्ज यासंबंधी माहिती दिली नव्हती.	होत नाही, ज्यामुळे राज्य लेख्यांची पारदर्शकता आणि विश्वासार्हता कमी होते.
4	**भारतीय शासकीय लेखांकन मानक -4::** *पूर्व कालावधी समायोजन .*	मानकांचे उद्दीष्ट केवळ आधीच्या कालावधीतील त्रुटींशी संबंधित अशी माहिती उघड करणे नाही तर शासकीय निर्णयांमधील बदलांमुळे उद्भवलेल्या पूर्व कालावधी समायोजनाची आवश्यकता असलेल्या नोंदींचा देखील समावेश करणे आहे ज्यामुळे मागील वर्षांमधील चालू शिल्लक आणि पुरोगामी रकमेवर परिणाम होऊ शकतो ज्यासाठी लेखे बंद केले गेले आहेत.	पालन केले	वर्ष 2024-25 दरम्यान केंद्र शासनाकडून 2020-21 आणि 2021-22 या कालावधीत वस्तू व सेवा कर भरपाईच्या बदल्यात प्राप्त झालेले प्रधान शीर्ष-6004 - कर्ज आणि अग्रीम अंतर्गत जमा झालेली ₹ 25,759.36 कोटी लागोपाठ कर्ज ₹ 7,982.17 कोटींच्या परतफेडीमुळे हे कर्ज आणि अग्रिम ₹ 17,777.19 कोटी पर्यंत कमी झाले आहे व संघलेखे 2023-24 मध्ये समायोजित केले.

3.12 स्वायत्त संस्थांचे लेखे सादर करणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या कलम 19 (3) नुसार, राज्यपाल/प्रशासक हे सार्वजनिक हितासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना विनंती करू शकतात की, यथास्थिती, राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या विधिमंडळाने कायद्याने स्थापन केलेल्या महामंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करावे आणि जर अशी विनंती प्राप्त झाली तर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक अशा महामंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करतील आणि अशा लेखापरीक्षणाच्या हेतूसाठी, त्यांना अशा महामंडळांची पुस्तके आणि लेखे पडताळण्याचा अधिकार असेल.

कलम 19 व्यतिरिक्त, जेथे कोणत्याही कायद्याने किंवा त्याअंतर्गत एखाद्या संस्थेच्या किंवा प्राधिकरणाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपवले गेले नाही, तर यथास्थिती, राष्ट्रपती, किंवा एखाद्या राज्याचे राज्यपाल किंवा विधीमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक यांनी तशी विनंती

केल्यास, अशा संस्थेच्या किंवा प्राधिकरणाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण त्याच्या आणि संबंधित शासन यांच्यामध्ये मान्य होईल अशा अटी व शर्तींवर करतील आणि अशा लेखापरीक्षणाच्या हेतूने, त्या संस्थेची किंवा प्राधिकरणाची पुस्तके आणि लेखे बघण्याचा त्यांना अधिकार असेल (कलम 20).वरील स्वायत्त संस्था आणि प्राधिकरणांच्या बाबतीत लेखापरीक्षण प्रमाणपत्र जारी केले जाते जर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक हे एकमेव लेखापरीक्षक असतील, म्हणून, या संस्था आणि प्राधिकरण यांनी त्यांचे वार्षिक लेखे तयार करणे आणि लेखापरीक्षणासाठी महालेखाकार (लेखापरीक्षण) यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण प्रमाणपत्राव्यतिरिक्त, वित्तीय लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर, लेखापरीक्षण कार्यालय पृथक लेखापरीक्षण अहवाल जारी करते जो लेख्यांवरील लेखापरीक्षण प्रमाणपत्राचा भाग आहे. हे पृथक लेखापरीक्षण अहवाल राज्य विधिमंडळासमोर सादर केले जातात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण, गृहनिर्माण, उद्योग, पाटबंधारे, नगरविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता या क्षेत्रात स्वायत्त संस्था स्थापन केल्या आहेत. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या कलम 19 आणि 20 अन्वये राज्यातील 30 स्वायत्त संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

31 मार्च 2025 पर्यंत, **तक्ता 3.15** मध्ये तपशीलवार दर्शविल्याप्रमाणे, 30 स्वायत्त संस्था बाबत 79 लेखे प्रलंबित होते.

तक्ता 3.15: स्वायत्त संस्थांच्या लेख्यांची 31 मार्च 2025 अखेरची प्रलंबितता

अ. क्र.	संस्थेचे किंवा प्राधिकरणाचे नाव	पासून प्रलंबित खाती	2024-25 पर्यंत प्रलंबित असलेल्या लेख्यांची संख्या
1.	महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग	2018-19	7
2.	महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग	2023-24	2
3.	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ	2024-25	1
4.	महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरण	2023-24	2
5.	महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे	2024-25	1
6.	महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण	2024-25	1
7.	महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई	2024-25	1
8.	महाराष्ट्र स्थावर मालमत्ता नियामक प्राधिकरण	2024-25	1
9.	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई	2024-25	1
10.	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे	2024-25	1
11.	गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर	2022-23	3
12.	विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	2023-24	2
13.	कोकण पाटबंधारे विकास महामंडळ,	2024-25	1
14.	महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर	2022-23	3

अ. क्र.	संस्थेचे किंवा प्राधिकरणाचे नाव	पासून प्रलंबित खाती	2024-25 पर्यंत प्रलंबित असलेल्या लेख्यांची संख्या
15.	महाराष्ट्र राज्य हज समिती	2009-10	16
16.	तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव	2023-24	2
17.	प्रवेश नियमन प्राधिकरण	2017-18	8
18.	शुल्क नियमन प्राधिकरण	2021-22	4
19.	राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग	2024-25	1
20.	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण	2024-25	1
21.	मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे	2023-24	2
22.	महाराष्ट्र वीज नियामक आयोग	2024-25	1
23.	महाराष्ट्र सागरी मंडळ	2024-25	1
24.	प्रतिपूरक वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण	2022-23	3
25.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण	2021-22	4
26.	महाराष्ट्र राज्य जैव-विविधता मंडळ.	2022-23	3
27.	महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई	2023-24	2
28.	महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई	2024-25	1
29.	महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग	2024-25	1
30.	महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई	2023-24	2
	एकूण		**79**

स्त्रोत: प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, मुंबई व महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती

31 मार्च 2025 अखेरीस 30 स्वायत्त संस्थांचे लेखे प्रलंबित होते, 2018-19 ते 2024- 25 या कालावधीसाठी 79 वार्षिक लेखे प्रलंबित होते, ज्याचा तपशील **तक्ता 3.15** मध्ये दर्शविला आहे. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (2018-19 पासून सात लेखे प्रलंबित), प्रवेश नियामक प्राधिकरण (2017-18 पासून आठ लेखे प्रलंबित) आणि महाराष्ट्र राज्य हज समिती (2009-10 पासून 16 लेखे प्रलंबित) यांसारख्या संस्थांमध्ये लक्षणीय विलंब दिसून आला. लेखे तयार करताना सततच्या थकबाकीमुळे या संस्थांच्या कामकाजातील वित्तीय जबाबदारी आणि पारदर्शकता कमी झाली.

पुढील तपासणीत असे निदर्शनास आले की अनेक संस्थांना त्यांचे लेखे अंतिम न करूनही राज्य शासनाकडून भरीव वित्तीय मदत मिळत राहिली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महाराष्ट्र शासनाकडून ₹ 428.89 कोटी (2021-22), ₹ 863.91 कोटी (2022-23), ₹ 545 कोटी (2023- 24) आणि ₹ 1,060.39 कोटी (2024-25) चे अनुदान मिळाले असले तरी 2021-22 पासून आपले लेखे तयार केले नव्हते. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र शासनाकडून वर्ष 2022-23 ते 2024-25 या कालावधीत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने ₹ 2,181.03 कोटी, ₹ 2,700.77 कोटी आणि ₹ 3,520.88 कोटी

आणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने ₹ 1,816 कोटी, ₹ 2,165 कोटी आणि ₹ 2,100 कोटी भरीव भांडवली अंशदान प्राप्त करूनही गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ यांनी 2022-23 पासून लेखेही तयार केलेले नाहीत. लेख्यांमध्ये कायम थकबाकी असलेल्या संस्थांना निधी जारी केल्याने वित्तीय देखरेखीशी तडजोड होते आणि सार्वजनिक पैशाच्या योग्य वापराबाबतची खात्री कमकुवत होते. स्वायत्त संस्थांद्वारे लेखे/लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यात झालेल्या विलंबाचा तपशील **परिशिष्ट 3.5** मध्ये दिला आहे.

3.13 गैरविनियोजन, तोटा, चोऱ्या इ.

मुंबई वित्तीय नियम, 1959 मध्ये अशी तरतूद आहे की, कोषागार किंवा इतर कोणत्याही कार्यालय/विभागात अफरातफर, फसवणुकीने रक्कम काढणे/प्रदान करणे किंवा अन्यथा आढळल्यास त्याची माहिती संबंधित कार्यालयाने तात्काळ पुढील वरिष्ठ प्राधिकाऱ्यास तसेच प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांना द्यावी.

31 मार्च 2025 पर्यंत, ₹ 5218.01 लाखांचा गैरव्यवहार, तोटा, चोरी इत्यादींची 201 प्रकरणे प्रलंबित होती. प्रलंबित प्रकरणांची विभागनिहाय आकडेवारी **तक्ता 3.16** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 3.16: गैरविनियोजन, तोटा, चोरी इत्यादींच्या प्रलंबित प्रकरणांचा तपशील

(₹ लाखात)

विभागाचे / महामंडळाचे नाव	गैरविनियोजन/ तोटा/चोरीची प्रकरणे		गैरविनियोजन, तोटा, चोरी इत्यादींच्या प्रलंबित प्रकरणांचा अंतिम निपटारा करण्यास विलंब होण्याची कारणे					
			विभागीय आणि गुन्हेगारी तपासाच्या प्रतीक्षेत		विभागीय कारवाई सुरू केली पण अंतिम झालेली नाही		गुन्हेगारी/विभागीय कार्यवाही अंतिम टप्प्यात परंतु वसूली/ निर्लेखन प्रलंबित	
	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम
नियोजन विभाग	6	0.64	4	0.53	2	0.11	0	0
जलसंपदा	31	15.46	29	14.71	0	0	2	0.75
कृषी पशुसंवर्धन	42	35.35	29	30.23	6	1.02	7	4.11
ग्रामीण विकास आणि जल संवर्धन	10	130.11	6	61.44	1	63.97	3	4.70
अन्न आणि नागरी पुरवठा	8	28.23	1	6.47	2	13.28	5	8.49
गृह विभाग	25	539.05	5	432.68	9	22.52	11	83.84
सार्वजनिक आरोग्य	7	166.99	2	2.41	3	161.58	2	3
वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये	4	18.51	3	14.98	1	3.53	0	0
वित्त विभाग	10	412.40	4	119.83	6	292.56	0	0
शालेय शिक्षण आणि क्रिडा	1	2.02	0	0	1	2.02	0	0
उच्च शिक्षण आणि तंत्रज्ञान	2	291.76	0	0	1	1.39	1	290.37

विभागाचे / महामंडळाचे नाव	गैरविनियोजन/ तोटा/चोरीची प्रकरणे		गैरविनियोजन, तोटा, चोरी इत्यादींच्या प्रलंबित प्रकरणांचा अंतिम निपटारा करण्यास विलंब होण्याची कारणे					
			विभागीय आणि गुन्हेगारी तपासाच्या प्रतीक्षेत		विभागीय कारवाई सुरू केली पण अंतिम झालेली नाही		गुन्हेगारी/विभागीय कार्यवाही अंतिम टप्प्यात परंतु वसूली/ निर्लेखन प्रलंबित	
	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम
सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य	4	87.92	2	76.41	1	11.34	1	0.18
गृहनिर्माण विभाग	1	0.69	0	0	1	0.69	0	0
सामान्य प्रशासन	2	2.58	0	0	1	1.29	1	1.29
महसूल आणि वने	18	105.61	3	0.48	5	68.04	10	37.09
आदिवासी विकास विभाग	7	12.94	7	12.94	0	0	0	0
पाणी पुरवठा आणि स्वच्छता	1	3.40	0	0	1	3.40	0	0
सार्वजनिक बांधकाम विभाग	4	5.48	0	0	0	0	4	5.48
कायदा आणि न्यायव्यवस्था	11	3250.30	7	3247.88	2	2.16	2	0.26
सहकार पणन व वस्त्रोद्योग	1	0.53	0	0	1	0.53	0	0
उद्योग, ऊर्जा आणि कामगार	2	27.68	0	0	1	22.68	1	5
कौशल्य विकास आणि उद्योजकता	2	17.49	1	17	1	0.49	0	0
महाराष्ट्र विधिमंडळ संचालनालय	2	62.86	0	0	2	62.86	0	0
एकूण	**201**	**5218.01**	**103**	**4037.99**	**48**	**735.46**	**50**	**444.56**

स्त्रोत: विभागीय विदा/माहिती

एकूण 201 प्रकरणांपैकी 48 प्रकरणांमध्ये (₹ 735.46 लाख) विभागीय कारवाई सुरू करण्यात आली होती परंतु अंतिम कारवाई झाली नव्हती, तर 103 प्रकरणांमध्ये (₹ 4,037.99 लाख) विभागीय आणि फौजदारी कारवाई प्रलंबित होती. प्रलंबित प्रकरणांची कालावधीनिहाय रूपरेषा आणि प्रत्येक श्रेणीतील प्रलंबित प्रकरणांची संख्या- चोरी आणि सरकारी साहित्याचा गैरवापर/तोटा गमावणे **तक्ता 3.17** मध्ये सारांशित केले आहे.

तक्ता 3.17: गैरवापर, तोटा, फसवणूक इत्यादींची रूपरेषा

(₹ लाखात)

प्रलंबित प्रकरणांची कालावधी-निहाय माहिती			प्रलंबित प्रकरणांचे स्वरूप	प्रकरणांची संख्या	गुंतलेली रक्कम
वर्षांमध्ये श्रेणी	प्रकरणांची संख्या	गुंतलेली रक्कम			
0-5	7	32.34	शासकीय पैशाचे नुकसान	2	14.47
			चोऱ्या	5	17.87
5-10	17	111.58	शासकीय पैशाचे नुकसान	5	17.60
			चोऱ्या	12	93.98
10-15	26	158.72	शासकीय पैशाचे नुकसान	3	122.64
			चोऱ्या	23	36.08
15 आणि त्याहून अधिक	151	4915.37	शासकीय पैशाचे नुकसान	112	3542.13
			चोऱ्या	39	1373.24
एकूण	**201**	**5218.01**	**एकूण**	**201**	**5218.01**

स्त्रोत: विभागीय विदा/माहिती

एकूण प्रकरणांपैकी, ₹ 1521.17 लाखांची 79 प्रकरणे शासकीय पैसा/भांडार चोरीशी संबंधित होती, तर ₹ 3696.84 लाख शासकीय साहित्याचा गैरवापर/नुकसान याच्याशी संबंधित 122 प्रकरणे दहा वर्षांहून अधिक काळ प्रलंबित होती.

या प्रकरणांमध्ये लक्षणीय प्रमाणात (151 प्रकरणे; 75.12 *टक्के*) 15 वर्षांपेक्षा जास्त जुन्या घटनांशी संबंधित आहेत, ज्यात ₹ 4915.37 लाख एकूण रकमेच्या (94.20 *टक्के)* समाविष्ट आहेत. अशी प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहणे हे अपुरी देखरेख आणि संबंधित विभागांमधील कमकुवत अंतर्गत नियंत्रणे दर्शवते. विलंबित तपास आणि समायोजन केवळ वसुलीमध्ये अडथळा आणत नाही तर उत्तरदायित्व देखील कमकुवत करते आणि अनियमिततेची पुनरावृत्ती होण्याचा धोका वाढवते. विभागांनी आपली अंतर्गत नियंत्रण यंत्रणा मजबूत करणे, विलंबाची जबाबदारी निश्चित करणे आणि सर्व प्रलंबित प्रकरणे, विशेषत: दशकाहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा कालबद्ध निपटारा सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

3.14 राज्य वित्त लेखापरीक्षण अहवालावर पाठपुरावा

वर्ष 2008-09 पासून राज्य वित्तीय लेखापरीक्षण अहवाल विधिमंडळात सादर केला जात आहे. राज्य लोक लेखा समितीने राज्य वित्त लेखा परीक्षा अहवाल 2016-17 च्या प्रकरण I वर चर्चा करून(मे 2019) 37 शिफारशी केल्या (लोक लेखा समिती अहवाल क्रमांक 68). 19 शिफारशींवरील कार्यवाही अहवाल प्राप्त झाले आहेत. 2023-24 दरम्यान लोक लेखा समितीची बैठक आयोजित करण्यात आली नाही. या शिफारशींच्या अंमलबजावणीद्वारे दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आलेल्या त्रुटी वर्षानुवर्षे कायम आहेत आणि आमच्या अहवालात नोंदविल्या जात असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे.

3.15 निष्कर्ष

- राज्याने आपली वित्तीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या 3 *टक्क्यांच्या* महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन मर्यादेत राखली असताना, 2022-23 पासून अर्थसंकल्पबाह्य कर्जावरील वाढत्या अवलंबित्वामुळे वास्तविक

वित्तीय स्थिती भौतिकदृष्ट्या बदलली आहे. 31 मार्च 2025 पर्यंत थकीत दायित्वे झपाट्याने वाढून ₹ 28,640 कोटी झाली असून एकूण दायित्वात लक्षणीय वाढ झाली आहे. ही कर्जे अर्थसंकल्पातून दिली जात नसल्याने ते वित्तीय पारदर्शकता कमी करतात.

- 31 मार्च 2025 पर्यंत ₹ 40,097.59 कोटी असलेली 12,829 उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत, ही संबंधित विभागांच्या वित्तीय देखरेख आणि अंतर्गत नियंत्रण यंत्रणेतील महत्त्वपूर्ण कमकुवतपणा दर्शवते. उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्याने केवळ महाराष्ट्र कोषागार नियम आणि सामान्य वित्तीय नियम अंतर्गत विहित केलेल्या वित्तीय औचित्य आवश्यकतांचे उल्लंघन होत नाही तर निधी त्यांच्या हेतूंसाठी वापरला गेला याची हमी देखील कमी होते.
- 31 मार्च 2025 पर्यंत समायोजनासाठी प्रलंबित असलेल्या ₹ 3,532.05 कोटीची 1,698 संक्षिप्त आकस्मिक देयकाचा संचय अपुरी वित्तीय शिस्त आणि आकस्मिक खर्चावरील कमकुवत अंतर्गत नियंत्रण दर्शवते. 2024-25 मध्ये काढलेल्या 1,838 संक्षिप्त आकस्मिक देयकांपैकी मार्च 2025 मध्येच काढण्यात आलेली ₹ 35.18 कोटींची (13.53 *टक्के*) 268 देयके वर्षअखेरीस निधी खर्च करण्याची केलेली घाई दर्शवितात, ज्यामुळे पारदर्शकता, वित्तीय औचित्य आणि संक्षिप्त आकस्मिक देयके/तपशीलवार आकस्मिक देयके प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणाऱ्या कोषागार नियमांचे उल्लंघन होते.
- आभासी वैयक्तिक ठेव खाती सुरू करूनही, आहारण आणि संवितरण अधिकारी- संचालित बँक खात्यांमध्ये ₹ 15,298.83 कोटी अखर्चित शिल्लक कायम ठेवणे, निधी प्रवाह व्यवस्थापन आणि अंतर्गत नियंत्रणातील प्रणालीगत कमकुवतपणा दर्शवते.
- 2024-25 दरम्यान, राज्य शासनाने एकत्रित निधीतून ₹ 89,005.21 कोटी प्रधान शीर्ष 8443-106 आभासी वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये हस्तांतरित केले. यापैकी ₹ 39,782.13 कोटी मार्च 2025 मध्ये हस्तांतरित करण्यात आले, ज्यात 31 मार्च 2025 रोजी ₹ 6,920.71 कोटी समाविष्ट होते, जे मुख्यतः अर्थसंकल्पीय तरतुदी वर्षाच्या अखेरीस व्यपगत होऊ नये म्हणून हस्तांतरित करण्यात आल्याचे दर्शवते. आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांऐवजी शासकीय लेखा प्रणालीत ठेवून खर्च न केलेल्या निधीवर नियंत्रण सुधारण्याच्या उद्देशाने शासनाने आभासी वैयक्तिक ठेव खाती सुरू केली. तथापि, प्रत्यक्षात, आभासी वैयक्तिक ठेव खात्यामुळे प्रत्यक्ष वापराविना लोक लेख्यामध्ये निधी पडून राहण्याचे प्रमाण सातत्याने वाढले असून, वर्षअखेरीस निधी राखून ठेवण्याच्या प्रवृतीला प्रोत्साहन मिळाले आहे. अशी शिल्लक 31 मार्चच्या पुढे नेणे वित्तीय शिस्तीच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे. हे महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या नियम 495 च्या विरोधात देखील आहे, ज्यात वर्षाच्या शेवटी सर्व अखर्चित वैयक्तिक ठेव शिल्लक एकत्रित निधीत परत करणे आवश्यक आहे. 12 मार्च 2025 रोजी

